
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय ..... निबंध
सं. क्र. 3433

गोल्ला



डॉ. धोंडीराम वाडकर

REFBK-0026939

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

14 AUG 1993

(क्र. मा. पहा)
१००००–११–८९

संदर्भ
निबंध
३५३८
२६९३९
२२१६१९



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

गोल्ला

(गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास)

डॉ. धोंडीराम वाडकर

मराठी विभाग
अहमदनगर महाविद्यालय
अहमदनगर

REFBK-0026939

गौरव
प्रकाशन

प्रकाशक :
दिलीप महाजन
मोरया प्रकाशन
'संपदा', नगरपालिका दवाखान्याजवळ,
शास्त्रीनगर, डोंबिवली (प.)

पुणे शाखा
'अनुश्री' सोसायटी, ४०/१०, एरंडवणा,
इंदिरा हाईट्स्जवळ,
पुणे- ४११ ०३८

प्रथमावृत्ती : जानेवारी १९९३.
© डॉ. धोंडिराम वाडकर

मुखपृष्ठ : मुकुंद तळवलकर

अक्षर जुळणी
प्रकाश एन्टरप्राइझेस्.
४५८/३, सदाशिव पेठ
टिळक रोड, पुणे.
फोन : ४३८३७३/३३४७०३

मुद्रक :

मूल्य : ५०/-

ती. सौ. पार्वती (आई), ती. संभाजीराव (बाबा),
(ऐतलवाड) वाडकर परिवार
व
समस्त गोल्हा समाज
आणि
माझ्यावर पुत्रवत् माया करणाऱ्या
ती. कै. सौ. पद्मा मोरजे
यांच्या चरणी

मनोगत.

लोकसाहित्याच्या अभ्यासाकडे बऱ्याच अभ्यासकांची दृष्टी वळू लागली आहे. लोक अभ्यासाच्या कक्षा आता वाढत आहेत. डोंगरदऱ्यातून, जंगलातून निसर्गाच्या जीवन जगणाऱ्या लोकांना त्यांच्या जीवनातील परंपरा, रूढी आचार-विचार लोकसाहित्यातून घडू लागले. पोटासाठी गावोगाव भटकणाऱ्या या अनेक भटक आपल्या जमातीची सांस्कृतिक, पारंपारिक अशा वैशिष्ट्यांची जपणूक करून दिसतात.

मला विद्यापीठ अनुदान मंडळाची शिष्यवृत्ती मिळाली तेव्हा डॉ.प्रभाकर मांडे म्हणून लाभले. माझा पीएच. डी.चा विषय 'गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोक अभ्यास' (लातूर व नांदेड जिल्ह्यांच्या संदर्भात) हा विषय ठरला. मी गोल्ला असल्यामुळे तिचा पूर्वेतिहास पाहण्याची जिज्ञासा लागली. आपण ज्या जमाती तिचे ऋण थोडेतरी फिटेल त्यासाठी सारा परिसर मी पायाखाली घातला. अनेक मुलाखती घेतल्या.ही जमात उत्तर भारतातून दक्षिणेत का व कशी आली, जास्त काळ स्थाईक होती म्हणून त्याची मातृभाषा तेलुगू दिसून येते. हे लो प्रदेशात राहूनही घरी तेलुगू भाषा बोलतात. सध्या मात्र याचा संबंध मराठी व हिंदी जवळून आल्याने, नव्या पिढीतील गोल्ला समाजाचे लोक तेलुगूमिश्रित मराठी दिसतात. त्यामुळे त्यांची भाषा संमिश्रस्वरूपाची झालेली आढळून येते.

महाराष्ट्रातील लोकसाहित्य आणि लोकजीवनाचे अभ्यासक गुरूवर्य डॉ.प्रभ डॉ.गंगाधर मोरजे. कै. पद्मा मोरजे. डॉ.अनिल सहस्त्रबुध्दे, डॉ.पंडितराव पवार प्रा.अमृतलाल पवार यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यांच्या ऋ राहणे मला आवडेल.

बी.पी.हिवाळे शिक्षण संस्थेचे व अहमदनगर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. डॉ.सौ.एम्.बार्नबस, माजी प्राचार्य जे.बार्नबस, डॉ.सरला बार्नबस, प्राचार्य डॉ.पी या सर्वांच्या प्रेमामुळेच मी हे कार्य करू शकलो. प्राचार्यांनी ग्रंथछपाईसाठ दिले व वेळोवेळी मार्गदर्शन केले. या सर्वांचा शतशः ऋणी आहे.

माझ्या प्रबंध लेखनास व आता ग्रंथ लेखनास ज्यांची मला वेळोवेळ मदत झाली असे अहमदनगर महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.के.सी व माझे सहकारी प्राध्यापक वर्ग आणि मित्रमंडळी यांचा मी आभारी आहे.

माझे माता-पिता आणि माझे समाज बांधव, त्यातील काहींची नावे लिहिणे वाटते. संगमकर खंडेराव गुरूजी, सायन्ना वाघ्या देगलूर, अशोक सायन्ना याद औरंगाबाद, बाबुलाल यादव औरंगाबाद, सोनुभाऊ यादव, सामनलु यादव, यादव, नागन्ना यादव मालेगाव, शंकरराव यादव, चिंतामणी यादव पुणे, माध

(मुंबई), आसाराम कावट, अनिल यादव, दत्तु सकने, तुकाराम कावट, बबनराव वैद्य (नगर), बाबाराव बाचेवाड (चिखली) कंधार, संभाजीराव आयतलवाड आयतलवाड वंजरवाडी ता. उद्गीर लातूर, रामजी केन्नलवाड गादेवाडी लातूर इत जमातीचे अहमदनगर जिल्हा कार्यकर्ते या सर्वांनी बहुमोल सहकार्य केले त्या ऋणी आहे.

प्रबंधावर आधारित गोल्ला समाजावरील माझ्या गोल्ला या ग्रंथप्रकाशना जबाबदारी डोंबिवली येथील मोरया प्रकाशनाचे मा.दिलीप महाजन यांनी आत्मि परिश्रमपूर्वक स्वीकारली व ग्रंथ देखण्या स्वरूपात प्रकाशित केला, त्याबद्दल त मन:पूर्वक ऋणी आहे. त्याचबरोबर मुद्रक आणि मुखपृष्ठ चित्रकार यांचाही मी आहे.

धोंडीराम

शुभेच्छा

प्रा.डॉ.धोंडीराम वाडकर यांनी 'गोल्ला' समाजाच्या लोकसाहित्याचा चिकि अभ्यास करून मराठवाडा विद्यापीठाची पीएच.डी. पदवी संपादन केली. त्य प्रबंधाला मार्गदर्शन करण्याची संधी मला मिळाली. त्यांचे हे संशोधन महत आहे.

'गोल्ला' समाजातील विविध सामाजिक व सांस्कृतिक परंपरांवर यात प्र टाकला आहे. ऐतिहासिक भौगोलिक माहितीच्यादृष्टीने हे संशोधन महत्वाचे अ त्यांच्या या लोकसाहित्य संशोधनाने तौलनिक अभ्यासाच्यादृष्टीने महत्त्वाचा ठ गाठला गेला आहे. मानवी शास्त्राच्या संशोधनाच्यादृष्टीने हे संशोधन मौ आहे.

'गोल्ला' हा ग्रंथ प्रसिध्द होतो आहे याचा विशेष आनंद वाटतो. त्यां या प्रकल्पास माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा आहेत. अहमदनगर महाविद्यालयाने त्यां या संशोधनकार्यास विशेष सहाय्य केल्याने प्रा.डॉ.धोंडीराम वाडकर यांच्या संशोध प्रोत्साहन लाभले आहे. प्रा.डॉ.वाडकर यांना त्यांच्या अंगीकृत संशोधनका उत्तरोत्तर यश लाभेल असा विश्वास वाटतो.

डॉ.प्रभाकर
प्रपाठक - मराठी विभ
मराठवाडा विद्यापीठ औरंगाब

प्रास्ताविक

प्रा.डॉ.धोंडीराम वाडकर यांचा माझा परिचय गेल्या ७-८ वर्षांचा आहे. कॉलेजमध्ये सुरूवातीला ज्युनियर कॉलेजमध्ये मराठीचा व्याख्याता म्हणून ते आले. एक मनमिळाऊ, प्रामाणिक व परिश्रम करणारा एक अभ्यासक म्हणून त्यांच्या ह माझे लक्ष होते. विशेषत: शिक्षणाची परंपरा नसलेल्या एका भटक्या लोकसमूहा चांगला प्राध्यापक होऊ पाहणारा हा तरूण माझे लक्ष वेधून होता. याच मराठीतील लोकसाहित्याचे अभ्यासक मा.डॉ.प्रभाकर मांडे प्रपाठक, मराठवाडा यांच्या मार्गदर्शनाखाली गोल्ला किंवा गोलेवार या त्यांच्या जमातीच्या लोकसाहित्य गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास ते करत होते. आमच्या महावि डॉ.मोरजे हेही एक लोकसाहित्याचे अभ्यासक वेळोवेळी त्यांना प्रोत्साहन देऊ प्रबंध पूर्तीसाठी साहाय्य करीत होते, हेही माझ्या लक्षात आले होते. प्रा.वा परिश्रमाने आपला प्रबंध पुरा केला आणि माझ्या माहितीप्रमाणे तरी त्या व्यक्तिंनी केलेला अशाप्रकारचा हा पहिला प्रबंध असावा. आपल्या जमातीचे प्रकारे डॉ.वाडकरांनी यथाशक्ती उतराई होण्याचा प्रयत्न केला आहे. त्याबद्दल ते पात्र आहे.

अहमदनगर कॉलेजची स्वत:ची अशी परंपरा आहे विविध अभ्यासक्षेत्रातील अ त्यांच्या इच्छेनुसार काम करण्यास मोकळिक देऊन व शक्य तेथे आर्थिक व सहकार्य करून अभ्यासक्षेत्रातील नव्या दिशांचा शोध घेण्यास प्राध्यापकांना - त्या दृष्टीने अहमदनगर कॉलेजच्या Innovative Programme (अभिनव कार्यक्रमांतर्गत डॉ.वाडकर यांच्या ग्रंथप्रकाशनाला अंशिक अनुदान देताना म होत आहे.

गोल्ला जमात ही एक भटकी जमात असून आजही त्या जमातीचे ल म्हशी आणि जनावरे घेऊन गवत चारायच्या शोधार्थ भटकत असतात. अशा ल त्या समूहाबाहेरील लोकांनी अभ्यास करून काही निष्कर्ष मांडणे आणि त्या लो संस्कारात व परिसरात लहानाची मोठी झालेल्या व्यक्तीने हा प्रबंध विषय तफावत आहे. अशी व्यक्ती तो समाज आतून बघू शकते. ते केवळ त त्यांनी अनुभविलेल्या अनुभवांचे विश्लेषण असते आणि म्हणूनच अशा निष्कर्षांन बैठक असते.

लोकसाहित्याच्या अभ्यासाबद्दल महाराष्ट्रात तरी काही ठिकाणी खूप गैरस दिसतात. लोकसाहित्याच्या अभ्यासात मानववंश शास्त्र महत्वाची कामगिरी व तो लोकसाहित्याचा अभ्यास असतो, तो त्या विशिष्ट जमातीचा अभ्यास असतो. लोक अभ्यासात लोकश्रध्दा, लोकपरंपरा, लोक समजुती कशा अस्तित्वात येतात

आणि तो लोकसमूह यांचे परस्पर सबंध समजून घ्यायचे असते. यासदंर्भात यांनी आपल्या प्रबंधात अनेक गोष्टींचा उल्लेख केला आहे. नमुन्यादाखल एकाच उल्लेख करतो. त्या समाजात पोटाला कुंकु लावणे किंवा बालविवाह क रूढी आजही आहे. आजच्या विस्तारलेल्या जगात आपण बालविवाहांना किंव सहज हसतो पण डॉ.वाडकरांनी त्यात त्या सबंधी जी उकल केली आहे ती विचार करण्यासारखी आहे. लहानपणी लग्न लावणे म्हणजे त्या स्त्री-पुरूषात श येतात हा आपला विचार ! वास्तविक मुलगी काय किंवा मुलगा काय आ टोळक्यात मोठया मंडळीच्या नजरेखाली व संरक्षणाखाली वाढत असतात. टोळ्या भटकत असतात. पण त्या मुलीला ती विवाहीत आहे याचे संरक्षण समाजात असते. वयात आल्यानंतर ती एकत्र येतात. आज हे दिसायला जरी चमत्कारीक तरी शीलसंरक्षणाच्याद्दष्टीने समाजाच्या नीतीतत्वातील त्याचे स्थान आजही महत्त्वा थोडक्यात अशा समाजाच्या अभ्यासासाठी त्या समाजाबद्दल एकतर आपुलक मनाचा ओलावा आणि त्याचबरोबर एक तटस्थ निरीक्षक वृत्ती असावी लाग आशा वाटते अशाप्रकारे निरनिराळ्या लोकसमूहातील अभ्यासक जेव्हा नव्या द्दष्टीने आणि तर्काधिष्ठित विचाराने त्या त्या लोकसमूहात संर्वक्षण करून लोक अभ्यास करतील तेव्हा भारतातील अनेकविध छोट्या-मोठ्या समूहाच्या लोकश्रध्द लोककथा आणि त्यातून जाणवणारा परिसर या मागील भारतीय मनातील व वैचारिक समानतेचे सूत्र आपल्याला पाहणे शक्य होईल.

पीएच. डी. च्या प्रबंधनाचे काम हे अभ्यासकांच्या संशोधनकार्याचा प्रारंभ ते करतांना संशोधनपध्दति आणि संशोधनातील समस्यांना दिशा फुटत असतात. काम झाल्यानंतर संशोधकाने थांबायचे नसते. नव्या उजळलेल्या दिशेने त्यांनं चालायचे असते आणि म्हणून वडीलधारा या नात्याने मी डॉ.वाडकरांना या असे सांगू इच्छितो. आता तुमची सुरूवात झालेली आहे. तुमचे बळ, तुम व कसे चालाल यावर अवलंबून आहे आणि ते या कामी असेच पुढे जाती आशा करून मी माझे चार शब्द संपवितो.

डॉ. पी. एस्.

अनुक्रमणिका

उल्लेख एक : चरेवेती :

मराठी गोल्ला - कोण हे गोल्ला? - गोल्लांचा इतिहास - गोल्लांचे स्थलां
वस्त्या - गोल्लांच्या उपजातींची नावे - सण, देवधर्म - गोल्लांच्या वस्तीची
- घरातील सामानसुमान - गोल्ला कुटुंबे - वर्ण व शरीर रचना - वेषभूषा - ख
- व्यसने - गोल्ला जमातीच्या उपजाती - गोल्लांच्या पोटजाती - लोकसंख्या - संदर्भ-टीपा

उल्लेख दोन : गोल्ला समाजजीवनाची जडण-घडण :-

कुटुंब संस्था - मुलांचे आरोग्य व वैद्यकीय सोयी - गोल्लांची शिक्षण परंपरा - शिक्ष
मुख्य अडचणी - दत्तक विधी - विवाह - विवाह हा दोन घराण्यातील दु
गोत्र म्हणजे काय - प्राचीन काळातील सगोत्र विवाह - गोल्लांची प्राचीन
पध्दती - सोयरीक - पोटाला कुंकू लावणे - बहुपत्नी विवाह किंवा बहुभार्य
- बहुपती - घरजावई - लग्नाचा मुहूर्त - आळंका - शेवंती - लग्नाची
- नवरानवरी खेळतात - पाळणे - नवरानवरीस बोलावयास लावणे - घरशि
परतीची घरशिरणी - वार - सत्यनारायण - देवाला जातात - डोहाळे जे
पाळणे - आंदण - विधवा विवाह - सोडमोकळीक वा घटस्फोट (फारकत) - संदर्भ-टी

उल्लेख तीन (अ) : गोल्लांचे सांस्कृतिक जीवन :

वृक्षपूजा - प्राणीपूजा - कुत्र्याची पूजा - नाग - खंडोबा - गोल्ला जमातीत
सोडण्याचा विधी - दार वाघ्ये - घर वाघ्ये - गोल्लांची दैवते आणि उत्
वाघ्या सोडण्याची वेगळी पद्धत - वाघ्याचे जागरण - श्रीकृष्ण - मस्नेर -
- बडेपाड - पीर - समारोप - संदर्भ-टीपा

उल्लेख तीन (ब) : गोल्लांचे सण-उत्सव आणि कला

होळी - दसरा - सट - जत्रा व यात्राचे स्वरुप - लोकांच्या अंधश्रध्दा - खं
नवस - गोल्ला, गोलेवार समाजाची लोकसंस्कृती जडण घडण - वारकरी संप्र
प्रभाव - कला - नृत्य - विणकाम - बांधकाम - संदर्भ-टीपा

उल्लेख चार : गोल्ला जातपंचायत

गोल्ला जमातीची जातपंचायत - लातूर जिल्ह्यांतील जातपंचायत पाहणी - सभासद बद

कारण - जातपंचायती पुढील कारणावरुन भरविल्या जातात - न्यायदान - कारणे - न्यायमंडळी बैठक - जातपंचायतीतील नीतीमत्ता - पंचायत सदस्य - शपथ घेणे - दिव्य करणे - शिक्षेसंबंधी पारंपारिक नियम - बायको पळ परिणाम (घरघुशी) - विधवा स्त्रीचा विवाह - गावपंचायतीचा नमुना - गरसोळ तं मान - अनैतिकतेला आळा - जातीबाहेर टाकल्यानंतर जातीत घेण्याचा विधी - जातपंच प्रभाव - जातीबाहेर टाकण्याची कारणे - जातीत घेण्याची पध्दती - जातीबाहेर ट लोकांबरोबर इतर लोकाचे वागणे - जातपंचायतीची सभासद निवड - जातपंच सभेचा खर्च - संदर्भ-टीपा

उल्लेख पाच : गोल्ला लोकसाहित्य :-

लोकगीत मराठीतून का? - लोकगीताचे प्रमुख प्रकार - लोकगीताचे प्रकार का करात येतील का? - ग्रिम - राल्फ विल्यम्स - डॉ. यदुनाथ सरकार - नरेश त्रिपाठी - श्री. कृष्णनंद गुप्ता - डॉ. सत्येंद्र - डॉ. केतकर - परि लोकगीत प्रकार - जात्यावरच्या ओव्या - सण-उत्सवांची गाणी - देवताविषयी - पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ - लग्न, पाचवी, बारसे इ. विधी संबंधी ग भलरी गीते - संकीर्ण - रचनेनुसार प्रकाराचे स्वरूप - ओवी - खेळगीते बडबडगीते - ओवी आणि लावणी - माझी सदृश्य रचना - गोल्ला गीत - काही ठळक निष्कर्ष - गोल्लांच्या लोककथांचा अभ्यास - परिसरातील गोल्ला लो वर्गीकरण - कथा प्रकारचे स्वरूप - अद्भूतकथा - प्राणीकथा - आख्यानि दैवतकथा - कथेच्या आशयावरून वर्गीकरणाचे अस्थिरतेतील स्थिर स्वरूप - लो वैफल्य - कथा निवेदक, कथाशैली व कथा निवेदनाची वेळ - कथानक - घट - संघर्ष - कल्पनाबंध किंवा कथाबीज - वर्तनातील सुसंगती - व्यक्तिचि प्रसंगवर्णन, स्थल वर्णन आणि संवादात्मकता - श्रोते - गोल्ला लोककथांच्या अ कथा - काही निष्कर्ष - संदर्भ-टीपा

१. परिशिष्ट क्रमांक १ - लोकगीते

२. परिशिष्ट क्रमांक २ - लोककथा

३. परिशिष्ट क्रमांक ३ - भारतातील सर्व प्रांतातील गोल्ला, गोलेवाराची बदलेल याचा तक्ता.



. उल्लेख एक.

चरैवेती

गोल्ला हे मूळचे तेलगू. ज्या प्रदेशात ते स्थायिक झाले, तो प्रदेश त्यांनी मानला. त्या प्रदेशाची भाषा उचलली. कर्नाटक, महाराष्ट्र, गुजराथ, ओरिसा, म आणि भारतभर! 'जेथे भरेल पोटाचा दरा, तो गाव बरा!' असं म्हणत, भटकत राहिले. शिक्षण, जीवनस्थैर्य या सगळ्याच बाबतीत आनंद!

मराठी गोल्ला - आंध्र प्रदेशाच्या सीमेवर नांदेड जिल्हा डोंगराळ आहे. चारा महामूर. त्यामुळे आंध्रप्रदेशातील गोल्ला आपल्या गायी, म्हशी घेऊन ये स्थायिक झाले.

मराठवाड्यातील गोल्लांची संख्या, नांदेड व लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाण परभणी, उस्मानाबाद, औरंगाबाद, जालना, बीड या जिल्ह्यांतही गोल्ला लोक नांदेड जिल्ह्यात गोल्लांची संख्या सर्वाधिक आहे.

दूधव्यवसायाबरोबर जमेल तशी शेती घेतली. काहींनी डोंगराचा रानवारा हेर पालनाचा धंदा स्वीकारला. गवळी, शेतकरी आणि मेंढपाळ झाले.

नांदेड जिल्ह्यात देगलूर, मुखेड, कंधार, नांदेड, किनवट, भोकर या गोल्ला लोक राहतात. सर्वात जास्त गोल्ला वस्तीचे ठिकाण म्हणजे देगलूर आहे. या शहरात चाळीस टक्के गोल्ला राहतात. '१'

कोण हे गोल्ला ?

ही जात गोल, गोलकू, गोलेवार, गोलकर, गोललम् अशा अन्य नावांनी जाते. गोल्ला हे गोपाल या संस्कृत शब्दाचे अपभ्रष्ट रूप असावे; असे एक हे स्वत:ला कोनानुलु किंवा कोनार्लु म्हणवितात. माडगोले प्रदेशाच्या- आस लोकांचे राज्य होते. त्यांनी तेथे किल्ले बांधले होते; असे विजगापट्मच्या मध्ये लिहिले आहे.'थेवसीयडू' नावाचे, गोल्ला हे वर्षप्रतिपदेला या नावाची सांगत व त्यांची पराभवाची रंगीत चित्रे दाखवित गावोगाव हिंडत.

गोल्ला लोकांच्या एर्रा किंवा यर्रा किंवा आल किंवा मेकल किंवा पूजा

किंवा पुनी किंवा गंगेड्डू किंवा गौंड किंवा पाकजाटी इत्यादी अनेक शाखा त्यांच्यापैकी पूजा गोल्ला हे ययातीच्या वंशाशी संबंध जोडतात. गोल्लांपैकी काही जादूगारही आहेत. गायी, म्हशी व मेंढ्या पाळणे व त्यांची खरेदी विक्री करणे यांचा प्रमुख व्यवसाय आहे. हे लोक दही,दूध विकतात.

श्रीकृष्ण हा स्वत: यादवांचा किंवा यदूंचा वंशज समजला जातो. यदु ही जमात असून मथुरेच्या सभोवती गुरे राखून दूधा-तुपाचा व्यवसाय करीत असे. या गो स्मरणार्थ गोल्लामधील एका उपजातीला वायव्य भागात 'यदु' किंवा 'जंबू बनसी' म्हणतात. '२'

काहींच्या मते गोल्ला गाई-म्हशीच्या दुधाच्या व्यवसायावरुन गोल्लांना गोप नाव पडले असावे. गोपालक म्हणून देखील यांना गोल्ला म्हणत असावेत. '३'

राजा लक्ष्मणसिंहाच्या म्हणण्याप्रमाणे गोल्ला म्हणजे दासीपुत्र. दासीपुत्राला गोल्ला चेला म्हणण्याची प्रथा होती. कृष्ण भक्त राधा, स्वत:ला कृष्णदासी म्हणवून घेत कृष्ण हा गवळी; म्हणून त्याचे भक्त किंवा दास म्हणजे गोल्ला; ही व्युत्पत्ती योग्य वाटते, कारण ती शब्दव्युत्पत्तीशीही जुळते. सोलापूरात ही जमात 'कृष्ण यादव गोल्ला' म्हणूनच ओळखली जाते.

काहींच्या मते या मूळच्या ब्राह्मण वर्गातील जाती. परंतु त्यांनी गोहत्येसारखे केल्यामुळे त्यांचा धर्माविधीचा अधिकार काढून त्यांना गोपालन करावयास स (या जातीतील रिशी गल्वा हा हरिवंशाचा मुलगा आहे.) महाभारतातील उल्ले हे लोक विश्वामित्राची संतती आहेत, असे म्हणून ब्राह्मण क्षत्रिय दोन्ही वर्गाशी परंपरा सांगितली जाते. कदाचित गाय हा प्राणी भारतीय संस्कृतीत पूज्य मानला अ गोल्लांना हे श्रेष्ठत्व मिळाले असावे.

कोणत्याही सत्तेशिवाय, कोणत्याही नियमाशिवाय या वंशाचे लोक 'गलव वंशातून गोलापूरन मध्ये आले. काहींच्या म्हणण्याप्रमाणे काही ऋषींनी 'ग्वाल्या' ज विधवांशी लग्न केले. काहींच्या म्हणण्याप्रमाणे सुखसेनी ही राजाचंद्रसेनाची मुलगी त्यामुळे देखील गोल हे नाव पडले असेल. '४'

गोल्लांचा इतिहास

गोल्ला या जातीच्या इतिहासासंबंधी पुढील माहिती मिळते - गवळी या पोटजाती सांगत असताना 'गोल्ला-गवळी' ही जात सांगितली जाते. 'गोल्ला-गव जाती मूलत: गोपालक आहेत, राहिलेले इतर वेगवेगळ्या जाती मधून आलेले परंतु हे सर्व गोपालन व्यवसाय करणारे होते.

परंपरेने असे मानण्यात येते कि, चार हजार वर्षापूर्वी नंदगोप आणि त्याची यशोदा 'गोकुळ' किंवा 'विजयनगर' या ठिकाणी गंगा आणि यमुना नदीच्या

उत्तर भारतात रहात होते. कंसापासून श्रीकृष्णाचे रक्षण करण्यासाठी वासुदेवाने नंद या गवळ्याच्या घरी लपविले. नंदगवळी गोपालन करणारे गोल्ला होत. गोकु सोळाहजार स्त्रियांसमवेत श्रीकृष्ण क्रीडा करीत असे. त्यांच्यावरोबरच्या कृष्णलीला आहेत. 'अनया गवळ्याची पत्नी राधा' ही श्रीकृष्णाची विशेष आवडती गवळ श्रीकृष्णाने आठ गवळणींशी विवाह केला होता. गोल्लांचा असा विस्तार झाला.

रिसले, गोल्ला आणि अहीर गवळी यांच्यातील फरक करताना असे म्हट की, अहीर हे सध्या बिहार प्रांतात व उत्तर भारतात मोठ्या प्रमाणात आढळून तर गोल्ला गवळी साधारणतः बंगालमध्ये सापडतात. वृंदावन येथील गवळ्यांबरोबर श्री क्रीडा होत असत,असा हिंदू दैवतकथांत उल्लेख आहे, हे सर्वश्रुत आहे '५'

गोल्लांचे स्थलांतर व वस्त्या

१९०१ साली तेलगू प्रदेशामध्ये गोल्लांची लोकसंख्या ३०० इतकी होती. ते बालाघाट, सेवनी या जिल्ह्यांमध्ये होते. परंतु सुमारे अडीच हजार गोल्ला जिल्ह्यातून आले. यांचे वर्गीकरण अहीर म्हणून १९०१ साली केले जात होते सध्या उपलब्ध असलेल्या माहितीनुसार गोल्लार जातीमध्ये समाविष्ट केले. बिदर जवळजवळ दोन हजार गोल्लार रहात होते. ही भटकी जमात असून हे लोक जिल्ह्यातील डोंगराळ भागात फिरत असत. कन्नड प्रदेशात देखील गोल्ला जमा येते. कन्नड भाषेच्या एका बोली भाषेत ते बोलतात. ज्यावेळी दोन गोल्ला ए बोलत असतात, त्यावेळेस अन्य भाषिकांत कोंबडे ओरडत असल्यासारखे वाटते. त्य पोटजाती नाहीत. '६'

गोल्ला समाजाचे मूळ वास्तव्य मथुरेच्या आसपास होते. असे म्हटले जाते. मात्र हे लोक सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात आढळतात. अहीर, कुणबी, कोळणी नगरकर, वजरकर हे लोक पुणे जिल्ह्यात आढळतात. दाबोले आणि चवळे हे जिल्ह्यात सापडतात. मथुरेपासून या जिल्ह्यात भटकत फिरत आले. व दाबोळव म्हणून त्यांना दाबोळे म्हटले गेले. मराठ्यांना खिलारी गवळी म्हणतात. वि असणारे गवळी म्हणजे हंडेवजीर. ही एक कुणब यांची जात मानली जाते. य १८७६ च्या दुष्काळामुळे काही गवळ्यांची कुटुंबे सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर आलेली आहेत. विजापूर या ठिकाणी धनगर, मराठा आणि श्रीकृष्ण गवळ बोलतात. '७' सर्वसाधारणपणे गोल्लांसंबंधी वरीलप्रमाणे माहिती नोंदवलेली अस त्यांच्यासंबंधीच्या मूळ स्थानासंबंधी संशोधनास वेगळी दिशा देणारी साशंकत करणारी माहिती मिळते. त्याविषयी येथे केवळ निर्देश केला आहे.

गोलपुरब ही एक शेती करणारी जात आहे. ही फक्त आग्रा जिल्ह्यात त्यांनी सध्या दक्षिणेकडील परगण्यातील पुष्कळशी गावे आपली केली आहे

लोक उत्तरेकडील परगण्यात इनतिमापूरमध्ये आहेत. स्वत:ला तेथील मूळ रहिवासी समज त्यांचे मूळ स्थान हे आग्र्यापासून दक्षिणेस सुमारे अठ्ठावीस मैलांवर आहे. त्यांचे ठाम मत आहे की, त्यांच्या जमातीतील प्रतिष्ठित 'गोलराज' त्यांचे मूळ होत '८'

गोल्ला ही जात गुजराथ, सौराष्ट्र, राजस्थान या प्रदेशात आढळते, तसेच प. ब ओरिसा, बिहार या प्रदेशात काही प्रमाणात त्यांची वस्ती आहे. हे लोक व खवास, चाकर, चेला, वजीर इ. नावांनी प्रसिध्द आहे.

गोल्लांचे मूळ स्थान म्हणजे काठेवाड, गुजराथ हा भाग होय,असा ही आहे. उत्तरेकडून व दक्षिणेकडून गोल्ला लोक महाराष्ट्रात आले. जे लोक उत्त आलेले आहेत, त्यातील अहीर गवळी हे हिंदी भाषा बोलतात. सर्वसाधारण: त मध्ये खूपच साम्य दिसून येते. '९'

दक्षिणेकडून जे गोल्ला महाराष्ट्रात आलेले आहेत, ते मात्र तेलगू भाषा बो परंतु औरंगाबादचे दशरथ मलान्ना, निजामाबादचे दरमुल्ला बळीराम यादव, देगलूरचे र संगमकर गुरुजी, नांदेडचे बिशन यादव, मुंबईचे माधवराव यत्म्, नगरचे दत्तू अनिल यादव, आसाराम कावट, वंजरवाडीचे रामजी आयतलवाड, संभाजीराव आयत मालेगांवचे सोनुयादव यांच्या मुलाखती द्वारे असे लक्षांत आले की, गोल्ला ही उत्तर भारतातील राज्यांत फार मोठ्या प्रमाणात आहे. हे लोक सांगतात की आज आमचे भाऊबंद तेथे आहेत. पण ते यादव नावाने ओळखले जातात. बाराव्या श भारतभर एकछत्री असे राज्य नव्हते. त्यावेळी अनेक मुसलमान राजांनी भारतावर केल्या. त्यामध्ये महंमद तुलघक व अल्लाउद्दीन खिलजीने दिल्लीची राजधानी व देवगिरीला आणली. त्यावेळी बरेच गोल्ला सैन्याला दूध पुरविण्याचे काम करत म्हणून हे लोक सैन्यावरोबर दक्षिण भारतात आले. ते बरेच दिवस तेलगू राहिल्यामुळे त्यांची भाषा तेलगू झाली. यावरून या जातीतील विविधता आणि त्यांचे संमिश्र स्वरूप यावर प्रकाश पडतो. '१०'

देवगिरीचे यादव कुल सेऊण देश अथवा खानदेश या प्रदेशात उदय अर्थात यादवांची शिलाताम्रशासने खानदेशात सापडावीत हे ओघानेच आले. यादव 'सेऊण चंद्र तृतीय' याचा एक शिलालेख -

'' ही दंतकथा जरी पंथीय दृष्टीकोनातून लिहिली असली तरी त्यातून व उपयुक्त ऐतिहासिक माहिती मिळते. सेऊण देशकर यादव स्वत:ला द्वारकेच्या व वंशज समजत असत. पुढे त्याच्या शिलाताम्रशासनातून ह्याच कल्पनेचा पुनरुच्चार आपणास दिसतो''

''हे माद्री, राजसभेतील अतिशय महत्वाचा पुरुष होता. त्याने स्वत: मोहिमा काढून यादव राज्यात झाडीमंडळ (सध्या चांदा, भंडारा जिल्हा) जिंकू

घातली. तो यादवांचे हस्ते,सेनेचाही प्रमुख होता.'' '११'

श्रीकृष्णाच्या अपार वैभवाची स्तुती केल्यानंतर हेमाद्रीने यादव घराण्याचा थेट पौराणिक काळापासून सुरु केला आहे. इन्दु (सोम-चंद्र) बधु, पुरुरवा, अ ययाति, यदु ह्यांच्यापासून तर दृढ प्रहारापर्यंत पं (पंचावन्न) राजांची नावे दिली आहेत.

यादव राजाचा शेवट;दिल्लीचा सुलातान अल्लाउद्दीन खिलजी ह्याच्या आक्र झाला. यादव सत्तेने इस्लामी आक्रमणाविरुध्द जी प्राणपणाने झुंज घेतली, त उल्लेख फारशी साधनग्रंथातून येतात. तो भाग लिहिताना खालील फारशी ग्रंथाचा केला.

१. अमीर खुसरो - तारीख-इ-अताई आशिक किंवा दावलराणी व खिज्रखान नुह

२. जियाऊदीन बारानी - तारीख-इ-फिरोजशाही-सिपर

३. इसामी - फुतुह सलातीन

४. महंमद कासीम - तारीख-इ-फेरिश्ता. '१३'

* हिंदुशाह फेरिश्ता

देवगिरीचे यादव स्वत:ला कटाक्षाने 'यदुवंशी' यादववंशी म्हणवून घेतात नारायण, यादव चक्रवती, यादव कुलकमल-कलिका तसेच यादव स्वत:ला द्वारावत द्वारकेचे स्वामी समजत असत. यादव हे जरी आर्य होते, तरी ते अनार्यात उदार मिसळत असत आणि त्यांच्याशी वैवाहिक संबंधही जोडीत असत. म्हणूनच त्यांना राक्षसवेशात घातले आहे. कदाचित नीच व अपाथ्याही म्हटले आहे यदू, तुर्दश, अनु, द्रघ्य आणि पुरुया यादव टोळ्याना 'पंचजन' असे नामाभिधा अशी संज्ञा दिलेली आहे. प्रख्यात संशोधक डॉ.प्रिझ्युलस्की त्यांना अनार्य म पण ते पूर्णत: सत्य नाही.ऐतिहासिक काळात 'यादव' नाव धारण करणाऱ्य लंहान मोठ्या वंशाचा भाग लागतो.

कठियावाडच्यातील लक्खामंडळ प्रशस्तीत एक यादवकुलाचा निर्देश आहे. पण देवगिरीच्या यादव घराण्याशी काही संबंध होता किंवा कसे हे कळण्यास क नाही.

राष्ट्रकुल सम्राट अकालवर्ष एक यादव वंशीय. महासत्तेत यांचा उल्लेख अ यादव हे नाशिक, नगर, औरंगाबाद जिल्ह्यांच्या परिसराचा भाग पहात.

कर्नाटकातील-शिलालेखाचा सूक्ष्म अभ्यास केला असताही यादव हे म मराठी आहेत ते स्पष्ट दिसून येते. '१४'

मग हा गोपालक राजा कोण? हा गोपालक राजा,अमरावती जि.गाविलगड य अधिपती असावा गाविलगडाच्या आसपास गवळी वंशाचे राज्य होते. स्थानि अजूनही सांगते.

गापक, गोवअ, गोवल, गावल, गाविल असा अपभ्रंश शक्य आहे. '१५'

गोल्ला लोकांनी श्रीकृष्णाच्या राज्यात गोपाळ म्हणून काम केले. तेव्हापास लोक दुधाचा व्यवसाय करतात. त्यानंतर परिस्थितीनुसार हे बदलत गेले. भारतावर मुसलम काही काळ सत्ता होती. त्यामुळे उत्तरभारतातील लोक या मोगल लढायांना व दक्षिण भारतात आंध्रप्रदेश, मद्रास या भागात सारखे फिरत राहिले. गोल्लाचे फि एकच कारण म्हणजे त्यांच्या जनावरांसाठी चारा आणि पोटाला अन्न. ते ज्या मिळेल तेथे ते रहात असत. आजपावेतो हे लोक काही प्रमाणात स्थायिक आहेत आणि काहीजण आजदेखील भटकंती करत आहेत.

इंग्रज काळात देखील या समाजाने सैनिकांना दूध पुरविण्याचे काम केले त्यामुळे दूध पुरविण्याच्या निमित्ताने काहीजण दक्षिण भारतात आले असावेत असे सैन्याचा कॅम्प ज्या ज्या गावात आहे त्या त्या कँम्प भागातच गोल्ला गवळ्यांची खूप मोठ्या प्रमाणात दिसून येते. उदा. नगर, भिंगार, औरंगाबाद छावणी, छावणी, मालेगाव, पुणे कॅम्प, मुंबई या भागात गोल्लांच्या वसाहती दिसून येतात. आलेल्या-दक्षिणेतून आलेल्या असे जरी भाषाभेदाने आपण नमूद केले तरी नेमकी कोणत्या प्रकारे झाली हे सांगणे संशोधनाचा विषय होईल. कारण श्री साम्राज्य आणि यदुकुलाचे व गवळी लोकांचे स्थलांतर,राज्य व्यवस्थापनाच्या दृष्टी गोपालन व्यवसायाच्या दृष्टीने हजारो वर्षापूर्वी झाले असतील तर भाषा भिन्न स्वाभाविक आहे. तसेच स्थल, काल, परिस्थितीनुसार त्यांच्यात एकूण समाज येणे शक्य आहे. परंतु आजही गोपालन या गोष्टीशी या सर्वांचा संबंध आहे श्रीकृष्ण या देवतेशी संबंध आहे हे लक्षणीय आहे. '१६'

गोल्ला वस्तीचे वेगळेपण

गोल्लाची आज देखील परिस्थिती फार बिकट असून तांड्यावर राहणाऱ्या लमाण या भटक्या लोकांपेक्षा यांची परिस्थिती खूप हलाखीची आहे. हे लोक झोपडीत त्यांच्या वेगळ्या वस्त्या आहेत. एखाद्याची थोडी शेती असेल तर तो शेतात डोंगराळ भागात काही गावात पूर्ण वस्ती गोल्लांची असून मुखेड तालुक्यातील खेरकावाडी, सलगरा, मंगनाळी ही संपूर्ण खेडी गोल्लांची होती. आता मात्र थोड्याप्रमाण लोकही राहतात.

वस्ती हलविणे

जनावरास ज्या ठिकाणी चारा मिळेल त्या ठिकाणी ते राहतात. पूर्वी ते व दिवसात जागा बदलत असत. आज मात्र ती अवस्था नाही. अनेक गो आता स्थायिक झालेली दिसतात. किंबहुना बदलत्या परिस्थितीत स्थिर जीवन त्यांची प्रवृत्ती दिसून येते. बऱ्याच गोल्लांनी दुधाचा व्यवसाय सोडल्यामुळे आता

हलवत नाहीत. हे लोक मोलमजुरी करुन आपले जीवन जगतात. नांदेड जिल्ह्यात काह
मेंढपाळीचा व्यवसाय करतात.

गोल्ला जमातीला वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या नावाने ओळखतात. उदा. ग
गोल्ला, गोलेवार, गोलकर गाई पाळणारे, यादव दूध विकणारे लोक यातील जवळ
सर्वजण,आपले कूळ 'यादव' म्हणून सांगतात. परंतु लातूर व नांदेड जिल्ह्यात का
आपले अडनाव गोलेवार लावतात.

गोल्ला जमातीत,ज्या बारा उपजाती सांगितल्या जातात,त्यात एक जात म
पिचकुटले किंवा मंदा गोल्ला होय. पिचकुटले किंवा मंदा गोल्लांजवळ सर्व गो
उत्पत्तीविषयी, कुळाविषयी माहिती असते. यावरुन मंदा गोल्ला म्हणतात की आम्ही
गोल्ला, कृष्ण कुळातील आहोत.आमचे कुळ यादव आहे.

गोल्ला जमातीच्या उपजाती का व कशा पडल्या, याची सविस्तर माहिती मि
नाही. काही थोडी माहिती मिळाली आहे ती खालीलप्रमाणे -

एका पुरुषाला बारा मुले होती. त्यांच्यात संपत्तीच्या वाटणीवरुन बारा जाती पडल्
चिखली येथील बाबाराव संभाजी बाचेवाड, त्याचप्रमाणे गिरजाजी राघाबो गंगनबीड
कंधार जि. नांदेड) यांनी सांगितले. रामजी आयतलवाड, संभाजीराव आयतलवाड
गोल्लांच्या बारा उपजाती आहेत असे सांगितले. पण यापेक्षा अधिक माहिती
शकले नाहीत.

बाबाराव संभाजीराव, नारायण संभाजीराव शिरबतळवाड (मु. खेरकावाडी पो.
ता. मुखेड, जि. नांदेड) यांची मुलाखत घेतली तेव्हा त्यांनी गोल्लांच्या बारा
आहेत, पण त्या कोणत्या हे सांगितले नाही.

देगलूर येथे खंडेराव मलय्या संगमकर, सेवानिवृत्त शिक्षक (हॉटेल वेस
यांनी मात्र गोल्लांच्या उपजाती खालीलप्रमाणे सांगितल्या. -

१. यरा गोल्ला २. पूजा गोल्ला ३. सभूगोल्ला ४. मुक्टी गोल्ला ५. वेक
६. यया गोल्ला ७. पाकनाटी गोल्ला ८. मुष्टी गोल्ला ९. डोमाटे गोल्ला १०.
किंवा पिचकुटले.

ते बारा जाती सांगू शकले नाहीत. संगमकैरांजवळ १९७७ पासून देगलूर ताल
किती गावामध्ये गोल्ला जमात आहे; याचा निश्चित पुरावा मिळाला. त्यांनी गोल्ल
विषयक खूप काम केलेले आहे. पण आता ते मृत्यु पावले आहेत.

मी अनेक ठिकाणी फिरुन मुलाखती घेत होतो. गोल्लांच्या गुरुचा शोध घे
बरोबर एक तेलगू भाषा बोलणारा माणूस घेतला होता. निजामाबादजवळ पेंटा
पिचकुटलयांचे किंवा मंदा गोल्लांचे एक कुटुंब काही दिवस स्थायिक आहे. असे समज
मी त्या गावी गेलो. पण ते कुटुंब भेटू शकले नाही. चार दिवस मी त्या

शोध घेत होतो. पण ते सापडले नाही. त्यांच्याबरोबर काही दिवस राहिले गृहस्थ भेटले. त्यांचे नाव दरनुल्ला बळीराम देवय्या (मु.येडप्पी, ता. बोधन जि. निज माटी गोल्ला, यरा गोल्ला, मुकटी गोल्ला, पाकनाटी गोल्ला अशा चार जाती असे त्यांनी सांगितले.

आम्ही सर्वजण भाऊ म्हणूनच वागतो. रोटीव्यवहार होतो. पण बेटी मात्र होत नाही,असे त्यांनी सांगितले. काही ठिकाणी पाकनाटी गोल्ला आणि गोल्ला यांच्यात बेटीव्यवहार होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठवाड्यातील गोल्ला, मंदागोल्ला किंवा पिचकुटलयाबद्दल असे सांगित की, त्यांच्याजवळ सनदेसारखा एक लिखित पुरावा आहे. ही सनद तांब्याची गोल आकाराची आहे. या ताम्रपत्रावर गोल्ला जातीविषयी गोत्र, आडनावे अशी आहे.

श्री रामजी संतोबा, संभाजीराव गणपतराव आयतलवाड यांची मुलाखत त्यांनी सांगितले की लातूर जिल्ह्यांत पिचकुटले किंवा मंदा गोल्ला हे फार आले होते. लातूर गोल्लांची संख्या कमी असल्यामुळे या भागात ते येत नाहीत.

नांदेड जिल्ह्यात गोल्लांची संख्या फार आहे. त्यामुळे पिचकुटले किंवा दरवर्षी येतात. पण त्यांचा पत्ता विचारत नाहीत. १९८४ पासून मी पिचकुट शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्यांची भेट होऊ शकली नाही. लोक म्हणत होते की निजामाबादले राहतो, असे ते म्हणतात.' त्यांना शोधण्याचा प्रयत्न केला. पण नाहीत.

मंदा गोल्ला किंवा पिचकुटलयासोबत राहणारा माणूस दोन दिवसानंतर भेटल नाव दरनुकला बळीराम देवय्या. बळीराम देवय्याला मराठी भाषा बोलता येत माझ्यासोबत एक माणूस होता मल्लाया पिराजी! हा कोंडलवाडीचा पण त्याल भाषा येत होत्या. तो काही शिकलेला नव्हता. त्यांनी मला खूप मदत केली.

गोल्लांच्या बारा जाती म्हणजे बारा भाऊ आहेत, असे त्यांनी सांगित आई-वडिलांपासून ही बारा मुले जन्मास आली. ती मुले मोठी झाली. तेव्हा वेगळी झाली. वडिलांच्या संपत्तीची सर्वांना वाटणी करुन दिली. मुलांच्या या जाती पडल्या असाव्यात असे त्यांनी सांगितले.

त्यापैकी अकरा मुलांना संपत्तीचा हिस्सा मिळाला. बाराव्या मुलाला हिस्सा नाही. त्यामुळे आई-वडिलांनी वरील अकरा भावांकडून भिक्षा मागून त्याला हक्क दिला. म्हणून बाराव्या मुलाच्या कुळातील लोक भिक्षा मागतात.त्यांना मं किंवा पिचकुटले असे म्हणतात. '१७'

गोल्लांच्या उपजातींची नावे

१. यरा गोल्ला २. सभू गोल्ला ३. पूजा गोल्ला ४. यया गोल्ला ५. मुक्टी गो
६.वेकार गोल्ला ७. मुयत गोल्ला ८. पाकनाटी गोल्ला ९. डोमाटे गोल्ला १०. कर गो
११. गप गोल्ला १२. मंदा गोल्ला किंवा पिचकुटले हे सर्व या क्रमाने लहान म
आहेत असे त्यांनी सांगितले.

यरा गोल्ला हा सर्वात मोठा भाऊ आहे. सर्वात लहान भाऊ,मंदा गोल्ला किं
पिचकुटले हा आहे. वरील अकरा भावांनी मागून खाण्याचा अधिकार त्यांना वडिलांपा
मिळालेला होता. तो लहान भावास दिला.

बाबाराव बाचेवाड यांच्या मुलाखतीवरुन समजले की, गोल्ला जातीच्या साडेब
उपजाती पैकी मंदा गोल्ला किंवा पिचकुटले हेच बारा उपजातीचे धर्मगुरु आहेत. बाचेव
यांच्या घरी पिचकुटले आले असता; त्यांनी सांगितले की आमची अर्धी जात अ
एका पिचकुटल्याने जरी ही माहिती बाचेवाडांना सांगितल्याने कळले असले तरी
पिचकुटले या उपजातीचे लोक आम्ही गोल्लांचे धर्मगुरु आहोत एवढेच सांगतात.

गोल्लाच्या यादीत साडेबारा जाती सांगितल्या आहेत. त्यापैकी अर्धी जमात क
निर्माण झाली,याबद्दल एक कथा सांगितली आहे.ही कथा देगलूरच्या सायन्ना वाघ
सांगितली आहे.

गोल्लाचा राजा 'पेदराजा' नावाचा होता. तो आपली प्रजा पहात फिरत असत
एका मुक्कामी या राजाच्या मुलीची बाहुली हरवली. गोल्लाचा राजा तेथील मुक्काम संप
पुढे गेला. त्या ठिकाणी मसनजोगी आले. त्यांना गोल्लाच्या राज्याच्या मुलीची बाहु
सापडली. राजाची मुलगी खूप रडत होती. त्यामुळे राजा बाहुलीचा शोध घेत आल्या
त्या मसनजोग्यांना विचारल्यानंतर त्यांनी ती बाहुली राजाला दिली. त्यांना खूप अ
झाला म्हणून गोल्लाच्या राजाने या मसनजोग्यांना गोल्ला जमातीचा अर्धा अधिकार म्ह
धार्मिक अधिकार दिला, व त्यांना सागितले की, गोल्ला लोकांना मागून भिक्षुकी
अधिकार दिला. तेव्हापासून ते मसनजोगी गोल्ला जमातीला मागू लागले व त्य
पूर्व इतिहास देखील सांगू लागले. त्यांनाच पिचकुटले किंवा कोणी मंदा गोल्ला
म्हणू लागले असे त्यांनी सांगितले.

या उपलब्ध लोककथेवरून असे म्हणता येईल की, मंदा गोल्ला ही अर्धी
म्हणून ओळखली जात असली तरी तसे नसून 'पेदराजा' ने मंदा गोल्ला हे भि
व अन्य सर्व गोल्ला हे प्रापंचिक होत.

नांदेड जिल्ह्यातील यादव महासभेच्या स्थापनेत गोल्लांच्या यादीत ह्या जमा
उपविभाग (१२.५) जाती खालीलप्रमाणे सांगितले आहेत. अहीर, गोप गोल्ला, गोले
नंद गोल्ला, घोष गोल्ला, ग्वाला, यरा गोल्ला, यया गोल्ला, मुदली गोल्ला, पाकनाट

मुदू गोल्ला या बारा उपजाती आणि अर्धी जात मंदा गोल्ला किंवा पिचकुटले.

या सर्व मुलाखतीतून आणि काही लिखीत पुराव्यातून गोल्ला उपजा पाहण्यात आल्या. परंतु आजच्या काळात मात्र गोल्लांच्या उपजाती दिसून येता अशा- १.यरा गोल्ला २.पाकनाटी गोल्ला ३.यादव गोल्ला ४.मुकटी गोल्ला या चा आज दिसून येतात. परंतु दुसऱ्या जाती मात्र दिसून येत नाहीत. कारण त्य एकमेकांत मिसळून गेल्याने असे घडले असावे.

१) यरा गोल्ला :- ही उपजात पाकनाटी आणि मुकटी गोल्ला मध्ये कुठे कुठे मि दिसून येते. हे बाबाराव बाचेवाड यांच्या मुलाखतीवरून लक्षात येते. नांदेड ही जात आढळते. बिलोली, कोंडलवाडी, पिपळकुंटा, रातोळी इ. गावात दिसून येते. आडनावे :- बंडूर, मक्लोड, कमलवार अशी आडनावे आढळतात. या जातीत ही आडनावे ही आढळतात. गोल्लांच्या उपजाती मध्ये पाकनाटी, यरा, यादव जाती एकत्र येतात. पण मुकटी गोल्ला ही उपजाती थोडी वेगळी रहाते.

२) पाकनाटी गोल्ला :- पाकनाटी गोल्ला ही उपजात मराठवाड्यातील नांदेड, औरंगाबाद, परभणी, जालना या जिल्ह्यातून दिसून येत असे. इतर उपजातीपैकी गोल्लांची लोकसंख्या मराठवाड्यात जास्त आहे. नांदेड जिल्ह्यात मुखेड तालुक्यात खेर बेरली, मुखेड, सलगरा, रातोळी, कुटेकलुर,पाळा, मोटरगा, एकलोर, बाराळी, भेडेवाडी, मांजरवाडी, उबरदरी, देगलूर, वळग, हनुमंतवाडी, दरेगाव, जेऊर, यवती, कोंडालवाडी, नांदेड, काकांडी, किनवट, शिवणी, सावरगाव, कांडली, निवघा, सोमठाणा, वडगाव, देवठाणा, वायगाव, वंजरवाडी, गादेवाडी, सैय्यादपूर, अल एकुकीरोड, लातूर इ. अनेक गावातून त्यांची लोकवस्ती दिसून येते.

आडनावे :- आयतलवाड, निम्मनवाड, राघुमोड, केन्नलवाड, येशमोड, नकुलवाड, प वाडकर, शिरवतळवाड, गादीमोड, गोलेवार, संगमकर, कुडलवार, घंटेवाड, गुरु पैलवाड, दाबनबैनवाड, बंडेवार, देगुरे, देगाये, बेळीकर, वडगावकर इ.

३) यादव गोल्ला :- सोलापूर भागात यादव गोलेवार दिसून येतात. पाश्री व सो जवळच्या खेड्यात,यादव गोल्ला बरेच आढळतात.

आडनावे :- बंडेवार, काचेवार, गोलेवार इत्यादी आडनावांचे यादव हे पाकनाटी गोल्लां रोटीबेटी व्यवहार करतात.

४) मुक्टी गोल्ला :- मुक्टी गाल्लांची लोकवस्ती देखील खूप दिसून येते. लातूर सिरनाळ, सांगवी रुई, बोथी, अलगरवाडी वेवडाचीवाडी, सेनकुड, वरवटी, उदगीर, लातूर, निलंगा या भागात दिसून येतात.

कंधार तालुक्यातील संगुचीवाडी, पांगरा, लिंबाचीवाडी, नवगराचीवाडी, नावद संगमवाडी, शेकापूर तळ्याचीवाडी, घोडज, पेलेचीवाडी, पळसवाडी, पाताळगंगा, कं

जंगमवाडी, गुलाबवाडी, मंडारकुडेची, लोहा, हुंड्याचीवाडी, गोलेगाव, वडूज, अलग
सियना, बोथी, डोंगरज, चाकुर इत्यादी गावातून मुक्टी गाल्लांची वस्ती आहे.
एकलारा, उंबरदरीचीवाडी, यवती, पिपळकुटा, नांदेड, काकाटी, किनवट, वझर, मि
सलगरा, भोकर, सावरगाव, कांडनी, निवघा, थेरवन, सोमठाणा, वडगाव, कोला देवद
मुखेड तालुक्यातील या गावातही त्यांची वस्ती आढळते.
मुकटी गोल्लांची आडनावे :- बोदरगाव येईलवाडी, घुमे, गुरुकुले, जक्कुवार, जंग
किरतवाड, बोरुळे, गाडे मांडगे, जिलेवाड, एडले, मुगरे, काकाडे, नांदेडकर,
जिलेवाड, गोडमवाड, वाडकर, डोनकेवाड, गोलावार, लिंगडवाडपुरे, मोटभरे, ज
कोणके, तोंडचिरे, बोबदरे, कासार, देवणे, आऊलवार, जंगलवाड, मुगरे, करे
करेवाड, जिकेकोड, बुरकुले हे लोक खंडोबा, मल्हारी, श्रीकृष्ण, विठोबा तसेच
या देवतांना मानतात. मुक्टी गोल्ला दुधाचा व्यवसाय करतात. शेती व व्यापारही करतात.

वरील गोल्लापेक्षा मुक्टी गोल्लामध्ये थोडा फरक म्हणजे मुक्टी गोल्लांच्या
उजव्या बाजूने साडीचा पदर घेतात. इतर गोल्लांत मात्र साडीचा पदर डाव्या
घेतात.

सण-देवधर्म

गोल्ला हिंदू आहेत. सणोत्सव, रुढी, परंपरा, देवधर्म ते करतात. ते खंडोबाचे
आहेत. मात्र श्रीकृष्णआष्टमी-कृष्णजन्म सोहळा हा त्यांचा महत्त्वाचा उत्सव होय. गो
प्रत्येक घरातून एक वाघ्या सोडतात. खंडोबाचा भक्त म्हणून तो जीवनभर सेवा करतो.

गोल्लांच्या वस्तीची रचना

गोल्ला लोक साधारणत: डोंगराळ भागात राहतात. त्यामुळे जास्तीतजास्त लोक इ
राहतात. नांदेड जिल्ह्यांत खापराच्या कौलारु घरात राहतात. अपवादाने काही सुस्थि
लोक धाब्याच्या घरात राहतात.

घरातील सामानसुमान

गोल्लांच्या घरात सामान काही फार नसते. साधारणत: हे लोक गरिबीच्या परि
जीवन जगतात. त्यामुळे त्यांच्या घरामध्ये किमान आवश्यक असणाऱ्या वस्तू अ
भाकरी करण्यासाठी तवा, एक तवली, दोन पितळी तांबे, काही ताटल्या अ
कोणी पाहुणे जेवण्यासाठी घरी आले तर दुसऱ्याकडून भांडी मागून आणावी ल
घरात भाजी करण्यासाठी एक-दोन भगोने (पातेली) असतात. एखादी फाटलेली
किंवा घोंगडी असते. गोल्ला लोक घरातील देव्हाऱ्यात खंडोबा, महिषासुरमर्दिनीच
करतात. त्याचप्रमाणे कृष्णाची पूजा करतात.

गोल्ला कुटुंब

गोल्लाच्या घरातील व्यक्तींची संख्या तशी मर्यादितच दिसून येते. एखाद्या कुटुंब लोक असतात. परंतु बहुतांश कुटुंबात मात्र व्यक्तींची संख्या कमी दिसते. गरिबी अ कुटुंबात लोक जास्त असतील तर खूप भांडणे होतात. म्हणून विभक्त कु अधिक प्रमाणात दिसून येते.

गोल्ला वर्ण व त्यांच्या शरिराची ठेवण

गोल्लांना खूप कष्ट करावे लागतात. प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या कामात असतो. हे लोक काळ्या सावळ्या रंगाचे असून शरिराने मजबूत असतात. अंगात राकटपणा दिसून येतो.

वेशभूषा

बहुतेक गोल्ला शेतकरी व शेतमजूर आहेत. खेडयातील लोकांची राहणी साधी शहरात रहाणारे व काही शिकलेले लोक मात्र थोडा वेगळा पोषाख करतात. जाडे भरडे धोतर व अंगात सुती सदरा किंवा गंजी फ्रॉक परिधान करतात. साधा फेटा असतो. अंगावर एक साधे उपरणे असते.

स्त्रियांचा पोषाख :- खेडयात राहणाऱ्या जुन्या व शेतात काम करणाऱ्या स नऊवारी लुगडे नेसतात. म्हातारी स्त्री असेल तर चोळी घालते. तरुण मुलग तर सहावारी साडी व झंपर (ब्लाऊज) घालते. हातात कंकणे असतात. ह कपाळावर गोंदलेले असते. काही स्त्रिया आपल्या पतीचे नाव गोंदवून घेतात पुरुषदेखील पत्नीचे नाव स्वत:च्या हातावर गोंदवून घेतात. बायका लग्नात मंग दंडकंडे घालतात. पायात तोडे, वाळे, जोडवे, कानात भिंकबाळी, नाकात न बुगडया, पुरण्या असे दागिने घालतात. काही श्रीमंत लोक सोन्याची नथ, चिंताक घालतात.

खाणे-पिणे

गोल्ला लोकांच्या घरी दूध असले तरी ते मात्र दूध पीत नाहीत. पैसा मिळ दूध विकतात. त्याच्यावर आपली उपजीविका भागवतात. गोल्लांचे खाणे म्हणजे भाकरी, कांदा, मिरची किंवा बाजरीची भाकरी व त्याचेच बेसन करून खातात. दिवशी कधीतरी गव्हाची पोळी, पुरणपोळी आणि भात-कढी करतात, नांदेड भात-वरण खातात.

व्यसने

चिलीम चुट्टचाची आवड :- नांदेड जिल्ह्यातील गोल्ला स्त्री-पुरुष खूप मोठ्या 'नागपूर विडया' ओढतात. काही लोक गरिबीमुळे तंबाखू चिलमीत घालून काही लोक अफू गांजा ओढतात. त्यामुळे त्यांचे जीवन उध्वस्त होते. देगलूर

मुखेड, बिल्लोली, कोंडलवाडी, निजामाबाद या भागात बायका पान तंबा त्याचप्रमाणे पुरुषांबरोबर दारु, नीरा, शिंदी हे सर्व पितात. याच भागात न नीरा पिणारे स्त्री-पुरुष सुमारे साठ टक्के दिसून येतात. काही लोक दिवसभर करतात आणि रात्री मात्र खूप दारू पितात. दारू पिणारे लोक मोठ्या प्रमाण बायकांमध्ये देखील दारु, शिंदी, नीरा, पान, तंबाखू या सर्व सवयी मोठ्य दिसून येतात.

गोल्ला जमातीच्या उपजाती

गोल्ला जमातीमधील उपजाती सांगताना वेगवेगळ्या लोकांनी जातीचे बारा किंव प्रकार सांगितलेले दिसून येतात. प्रत्यक्षात मात्र ही संख्या गॅझेटियर मध्ये नेलेली आहे.

गवळी या जातीचे पोटभाग सांगताना, या पोट जाती गवळी या जाती पण त्यांच्यामध्ये व्यवसायाशिवाय कुठलेही साम्य दिसत नाही.

१. अहिर २. बिजापूरी ३. चेवली ४. दाभोळे ५. धनगर ६. गोल्ला ८. कृष्णा ९. कोकणी १०. कुरबा ११. लिंगायत १२. मराठा किंवा मि मुसलमान १४. नगरकर १५. पंचम १६. रजपूत १७. विजरकर

या गवळ्याच्या उपजातीपैकी बिजापूरी, नगरकर, पंचम, विजरकर हे गवळी जिल्ह्यात सापडतात. '१९'

सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी तेलंगणात गोल्ला अन्नाच्या शोधार्थ उत्तरेकडे त्यातील काही लोक औषधे विकू लागले. त्यामुळे त्यांची वेगळी जात व जरी नाव गोल्ला असले तरी गुरांची पैदास करणाऱ्या मूळ गोल्लांपासून ते झाले आहेत. त्यांच्यात मराठी, वैदू, इत्यादी अनेक जातीच्या लोकांचे आहे.

१. अडवी अथवा तेलगू गोल्ला २. हनम गोल्ला किंवा भिंगी ३. कृष्ण यादव ४. बेगुरी गोल्ला ५. पाकनाक गोल्ला ६. शास्त्र गोल्ला असे पो मूळ म्हणजे गुरांची पैदास करणाऱ्या गोल्ला मध्ये अनेक पोटजाती आहेत.

१. गोल्ला २. हाट गोल्ला ३. हाव गोल्ला ४. काड गोल्ला ५. केपे ग गोल्ला असे सहा पोटभेद पडतात. त्यांच्यात परस्पर रोटीबेटी व्यवहार होत नाहीत '

गोल्ला, गुला, गुलई, गोलेवार, गवळी, धनगर या जाती तेलगु भ कर्नाटक राज्यात असतात. यरा गोल्ला हे करीमनगर आणि नालगुडा जिल्ह हे लोक श्रीकृष्णाची पूजा करतात. यादवांना वाटते की, आपण कृष्णाचे वंशज अ

गोल्लांच्या पोटजाती

गोल्ला जमात खूप मोठी होती पण पुढे अनेक उपजातीत ती विभागली गे
:- १. एरा गोल्ला २. सदनाम (बोया गोल्ला) ३. यया गोल्ला ४. पाकनाट
५. पूजा गोल्ला ६. मुष्टी गोल्ला ७. मोदाती गोल्ला ८. मुद्रा गोल्ला ९. सर
१०. सरसा गोल्ला ११. आदी गोल्ला १२. गुजराथी गोल्ला १३. आले गोल
पदवटी गोल्ला १५. मंदा गोल्ला १६. यादव गोल्ला १७. करने गोल्ला. १८.गुपा गोल्ला.
एकूण अठरा उपजाती सांगितलेल्या आहेत. काहींची थोडक्यात माहिती दिली आहे.

सदनाम किंवा बोया गोल्ला जमात :- एरा गोल्लांच्या घरी गेल्यानंतर त्यांनी
की, हे देखील गोल्लांच्या समकालीन आहेत असे समजले जाते. या उपजमातीं
कोंबडच्या पाळण्याचा धंदा करीत असत. त्यांच्या स्त्रिया चोळी किंवा परकर
नसत.

यया :- हे लोक एरा गोल्लांपासून उपजलेले आहेत; असे समजले जाते. कारण
शरीराची ठेवण यया गोल्लांसारखी दिसते. फक्त त्यांचा रंग गोरा असतो. ते पंचा
असत. त्यांच्या प्रमुखास चौधरी किंवा मेहतर म्हणत असत. चौधरीला लग्नात न
टिका लावण्याचा अधिकार असतो. त्यांना तांब्याची पाच नाणी देत. चौधरील
म्हणून पान सुपारी देत असत.

पाकनाटी :- पाकनाटी गोल्लांचे दोन भाग पडतात.

१. डोमांटीवारु आणि २. मगदीवारु

त्यांच्यामध्ये होणाऱ्या लग्नविधीवरुन हे भाग पडले आहेत. लग्नाच्या आधी काह
(बहुतेक करुन नऊ लोक) दिवसभर उपवास करीत असतात. हा उपवास तेलंगण
मल्लयया आणि कर्नाटक मधील चंद्रमन्ना या देवतांच्या स्मरणार्थ केला जात
उपवास सोडत असताना ते तूप खात असत. जर त्या उपवास करणाऱ्यांपैकी
उपवास सोडताना तूप प्यायला नकार दिला, तर ते तूप बळजबरीने त्याच्या
ओतले जात असे. त्याला पिण्यासाठी दारु व खाण्यासाठी कांदा दिला जाई
ठिकाणी लग्नविधी असेल तेथे एका मेंढ्याला बळी दिले जात असे. अजून
प्रथेचे अवशेष आढळतात. अशा प्रकारची पध्दती मगदीवारु या पोटजातीत अ
नाही.

पाकनाटीमधील कुमारिका देवीला अर्पण केल्या जात असत. त्यांचे लग्न तलवारी
किंवा झाडाबरोबर लावले जात असे. पार्वती किंवा जोगिणींच्या नावाखाली ह्या
वेश्या व्यवसाय करीत. आता या प्रथेवर शासनाने तसेच जातीतील प्रमुखांनी बंदी
आहे.

पूजा गोल्ला :- पूजा गोल्ला रंगाने काळे असतात. त्यांची शरिरे धष्टपुष्ट (मजबुत त्यांच्या नावाबद्दलची आख्यायिका अशी आहे की, त्याचे पूर्वज धनगरांचा याची पूजा करीत असत. नवीनवर्षाच्या पहिल्या दिवशी डुकराचे मांस खाल्या वर्ष भाग्यदायी व आनंदी जाते अशी त्यांची समजूत होती. यरा स्त्रियांप्र गोल्ला जमातीच्या स्त्रियासुध्दा नाक टोचत नसत अथवा नथनी किंवा इतर दा नसत. पूजा स्त्रिया चोळी घालत नसत. त्यांच्यामागे कथा अशी आहे की, गवळणी आंघोळ करीत असता श्रीकृष्णाने त्यांचे कपडे पळवून नेले.' या लोक त्यांच्या देवतांपैकी गंगा नदीचीसुध्दा पूजा करीत असत. या नदीच्या स्मर घरासमोर एक लहान दगड बसवला जाई. घरातील वडीलधारा माणूस दिवशी त्याची पूजा करीत.

मुष्टी गोल्ला :- यांचे नाव मुष्टी गोल्ला पडले कारण त्यांचे पूर्वज मुष्टियुध्द प्रवीण होते.

गुजराथी गोल्ला :- गुजराथी गोल्ला हे स्वत:ला इतर गोल्लांपेक्षा उच्च दज असत. ते लोक ज्या पाण्यावर सूर्यप्रकाश पडला नाही असेच पाणी प ते इतर गाल्लाशी रोटी-बेटी व्यवहार करीत नसत.

मोदी गोल्ला :- गोल्लांची एक जात स्थानिक लोक एकत्र येऊन तयार झाल यांची उपजीविका उच्चदर्जाच्या गोल्लांकडून केली जात असे. ते गोल्लाच्या दारापुढे उभे रहात. त्यांच्या पूर्वजांची नावे घेत. त्या कुटुंबाची 'उध्दार गीते' ग एका खेडयातून दुसऱ्या खेडयात प्रवास करीत असत. लोक त्यांना 'तुलजे म्हणत. 'तुलजोवाड' या शब्दाची उत्पत्ती तुलजा म्हणजे टिराचिरा या शब्दाप आहे. या शब्दाचा अर्थ साडी असा होतो. या साडीवर बाहुल्यांची नक्ष असे. ही साडी, ते तारेला लावून सभोवती जमलेल्या लोकांच्या समोर गाणे गाऊन त्यांची करमणूक करीत असत.

पीदवटी गोल्ला (पुसलवाड) :- गोल्लांमध्ये असणाऱ्या 'पोतलरस' या जाती खालच्या दर्जाची पोटजात आहे. एका गावातून दुसऱ्या गावी प्रवास करीत जीवन जगतात. हे लोक आरसे, सुई, दोरा, कुंकू इत्यादी गोष्टी बाजारात विकत अ

गोल्लांच्या उपजातीपैकी फक्त यरा, पाकनाटी, अडी, मुष्टी, सदनाम, मुद्रा, आणि पोप्पा गोल्ला हे सर्व गुजराथी गोल्लास सर्वात उच्च दर्जाचे समजले जात असत.

गोल्लांच्या पोटजातीची वेगवेगळ्या विभागामध्ये नावे वेगवेगळी दिसून ये कुळाला एक कुळचिन्ह असे. हे कुळचिन्ह प्राण्याच्या, वनस्पतीच्या नावाने असे. उदाहरणार्थ, वांग्याचे नावाने असणाऱ्या कुळामध्ये वांग्याच्या झाडास किंवा तोडण्या-खाण्यास बंदी असे. त्याचप्रमाणे शशिला कुळामध्ये काही ठरा

व रुढी पाळल्या जात असत. काही रुढी खाली दिलेल्या आहेत.

१. शालनडूलू कुळ :- या कुळातील लोक लग्नामध्ये हळदीचे रंगवलेले तांदूळ म्हणून टाकत असत.

२. कन्यासारुलू कुळ :- या कुळातील लोक मुलाच्या लग्नाचे स्थळ लगेच प नसत.

३. टनालाकुळ :- या कुळातील लोक तीर्थयात्रेला जात. त्या ठिकाणच्या पवित्र आंघोळ करणे महत्त्वाचे मानीत. स्वतः आंघोळ करीत असता तिथल्या कोणाही आपल्याला पाहू नये, याची ते दक्षता घेत. जर असे घडले आणि त्या दक्षिणा मागितली तर तीर्थयात्रेचे सर्व श्रेय वाया गेले असे ते मानीत.

४. सुरवला कुळ :- या कुळातील लोक भांड्यात कधीच दूध ओतत नसत. भांड्यात दूध ओतण्यापूर्वी त्यात थोडे पाणी टाकत असत.

५. बसुडुलु कुळ :- या कुळातील लोक बसुडलु या झाडाची पूजा रविवार पेरणीच्या अगोदर किंवा प्रवासाला जाण्याच्या आधी झाडाला फुले वाहून व गो वाटून करीत असत.

कुळाचे नाव हे कुळातील पुरुषाच्या नावाने पुढे चालवले जाई. एका पुरुषाने त्याच कुळातील स्त्रीशी लग्न करण्यास बंदी होती. एक पुरुष दोन बहि लग्न करु शकत असे. पुरुषाला त्यांच्या थोरल्या बहिणीच्या मुलीबरोबर किंवा मुलीबरोबर लग्न करण्यास परवानगी होती. परंतु चुलत बहिणीबरोबर लग्न करण्यास नव्हती. पूजा गोल्लांमध्ये अशा प्रकारची बंधने नव्हती. '२२'

लोकसंख्या :-

गोल्लाच्या संख्येबद्दल विचार केल्यास कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये या ज लोकसंख्येबद्दल माहिती विचारली असता उपलब्ध झाली नाही. औरंगाबाद समाजकल्याण अधिकारी, समाजकल्याण अधिकारी औरंगाबाद, नांदेड व लातूर यां लोकसंख्येचा आकडा अथवा अंदाज देखील मिळू शकला नाही.

गॅझेटियरमध्ये मात्र गोल्लांची अंदाजे लोकसंख्या १९११ सालची माहिती अशी '२३'

शहर	पुरुष	
हैद्रावाद	१,८६६	१,
वारंगल	९९,६५२	३३,
करीमनगर	४२,४७२	३९,
अदिलाबाद	४,८७५	४,
निझामाबाद	१२,६९९	१२,

महबूब नगर	३१,७९३
नालगुडा	५३,०९९
औरंगाबाद	११
नांदेड	७,००९
गुलबर्गा	२,०५९
रायचूर	१०,०८८
बिदर	७६५

गोल्लांच्या लोकसंख्येबद्दल पहात असतांना कोणताही पुरावा काही मिळ १९११ च्या गॅझेटियरमध्ये देखील अंदाजे नोंद आहे. परंतु गोल्लाची लो निश्चित मिळाली नाही. मात्र नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील गोल्ला वि लोकांची गावे, त्यांची घरे व लोकसंख्या खंडेराव गुरुजींनी १९७९ या वर्षात मोजल

नांदेड जिल्ह्यातील, देगलूर तालुक्यातील गोल्ला किंवा गोलेवार समाजाच्या गावे तेथील घरांची संख्या पुढीलप्रमाणे :-

१. देगलूर २. भक्तापूर ३. वळग ४. अदारापूर ५. देरेगाव ६. शहापूर हिप्परगा ८. सुडंगी ९. नरंगल १०. सावरगांव ११. सुगांव १२. खानापूर १४. देरेगाव १५. बागन टाकणी १६. मुजलगा १७. चैनपूर १८. अंतापूर २०. हवरगा २१. आलूर २२. देगाव इत्यादी गावांमध्ये गोलेवार (गोल्ला घरे आहेत.

काही गावांची समाजाची सांख्यिकी माहिती गोळा केली आहे. वा त्यांच्या टिपणीनुसार माहिती येथे पाहू :-

खंडेराव गुरुजींनी ६-४-१९७९ या काळात देगांव गोलेवार जमातीची व पदे या विषयी दिलेली माहिती

	घरे	पुरुष	स्त्रिया	निरक्षर
देगाव	४८	१२६	१२४	२२२

मौजे-आलूर,ता.देगलूर,जि.नांदेड गावाची ल

	घरे	पुरुष	स्त्रिया	निरक्षर
	३	११	९	१७
	घरे	पुरुष	स्त्रिया	निरक्षर
खानापूर	२२	५२	४१	६४

वन्नाळी,ता.देगलूर,जि.नांदेड गावाची लोकसं

घरे	पुरुष	स्त्रिया	निरक्षर	सा
५५	१०९	८५	१३५	

तरखेड, ता.देगलूर,जि.नांदेड गावाची लोकसं

घरे	पुरुष	स्त्रिया	निरक्षर	सा
२३	३६	४५	७०	

देगलूर तालुक्यातील गोल्ला (गोलेवार) समाजाची देगलूर मधील सर्व गावातील आडनावे.:- वट्टमवार, पाळेकर, वडगावकर, नकुलवाड, कोडेवाड, मडेवाड, गुरमुलवाड, मट्ट घुरमलवाड, झुरवार, बडेवार, घुटगुडवार, राजमोड, येशमवार, मतिकुलवार, अंक दाबनबैनवाड, दोसलवार, अलिनवार, कोरेवार, यमलवार, बक्कलवार, पैलवाड.

देगलूरची आडनावे :- आनंदवार, यमलवार, कावारवार, पेलवार, भंडरवार, मलग कंडलवार, अंकमवार, ऐतलवार, गोलावार, अपसजवार, जामीलवार, घंडेवाड.

सन १९७७ मध्ये :- देगलूर तालुक्यातील साक्षर

साक्षर	एस.एस.सी.	बी.ए.
३४०	३१	२१

नोकरीवर काम करणारे :-

शिपाई	इंजिनिअर	निरीक्षर
३	१	१३७३

वरील सांख्यिकीवरुन गोल्लांच्या स्त्री-पुरुष प्रमाणाची साक्षर-निरक्षरतेची माहिती शकते.

उल्लेख एक संदर्भ टीपा

१. परिसरातील मुलाखती :- वाघ्या सायन्ना, देगलूर खंडेराव गुरुजी,देगलूर.

२. मुंबई इलाक्यातील जातीं

३. तत्रैवं

४. The Tribes and castes of the North Western India (Vol-II)by W.Chook A.B.572.9423/CR.o.2 M.uA.

५. The Tribes and castes of Bombay. R.E.Enthoven (Vol-1) P.17 M.uA.

६. The Tribes and casted of Central Proviness of India By R.V.Russel (Vol-III) 572.9543/R.D.5-3 M.uA.

७. The Tribes and castes of the Bombay.M.uA R.E.Enthoven P-17 (Vol-I)

८. The Tribes and castes of the North-Western India (Vol-II) By W.Chooks S.A. Page-422 to 30

९. भारतीय संस्कृती कोश खंड (३)

१०.परिसरातील मुलाखती :- दशरथ मललन्ना, औरंगाबाद. दसनुल्ला बळं निजामाबाद. सोनु यादव, मालेगाव.

११.'देवगिरीचे यादव' ले. ब्रह्मानंद देशपांडे प्रकाशक रा. धो. बोर्डे समर्थ प्रकाशन टिळक पथ औरंगाबाद पेज ३

१२.तत्रैव पान नं ४

१३.तत्रैव पान नं ६

१४.तत्रैव पान नं ११,१२,१४,१५

१५.तत्रैव पान नं १३२

१६.परिसरातील मुलाखती - सोनु यादव, मालेगाव. दशरथ मल्लन्ना यादव

१७.परिसरातील मुलाखती - बाबुलाल यादव, औरंगाबाद.

१८.परिसरातील मुलाखती - बाचेवाड बाबाराव, चिखली नांदेड.

१९.The Tribes and castes of Bombay R.E.Enthoven - P-17 (Vol 1) M.uA 572-95479/Ent

२०.महाराष्ट्र ज्ञानकोश मुंबई इलाक्यातील का. से. प्र. इ. बॉम्बे - गो.म.का

२१.The castes and Tribes of H.E.H. the Nizerns

Dimonionc. By Syed Siraj U. L.Hassan (Vol.I) 572-9500/S.Y.E.I
२२.The castes and Tribes of H.E.H The Nizerns Dominons
२३.The castes and Tribes Gollas of H.E.H The Nizerns Dominons By Syed Siraj U.L. Hassan of Dxfored college
२४.श्रीमान खंडेराव संगमकर गुरुजी देगलूर, हॉटेल वेस, देगलूर.

.उल्लेख दोन

गोल्ला समाजजीवनाची जडण घडण

गोल्ला ही मुळात भटकी जमात आहे. ज्या प्रदेशात ते जातात त्या प्रदेशातील हवामानाशी मिळते जुळते घेऊन त्यांचा जीवनक्रम घडत असतो.या समाजातील लोक आजही सुशिक्षित नाहीत. इतर भारतीय भटक्या समाजाप्रामाणे त्यांच्यातही अ रूढी आणि मागासलेपण यांचे प्राबल्य आजही आहे.

कुटुंब संस्था

गोल्ला मध्ये मोठ्या प्रमाणात एकत्र कुटुंब पध्दती प्रचलित आहे. एकत्र कुटुंबा ते पस्तीस माणसे असतात. या संदर्भात पुढील जात्यावरची ओवी स्पष्टपणे सांगते.

" आया बाया पुसताती भाऊ भावजया किती।
बसा सांगते निचीती । अर्धा गावाची वस्ती॥" '१'

या कुटुंबात 'सासुरवाशीण' हा शब्द महत्त्वाचा ठरतो. या संदर्भात डॉ. गारे म्हणतात. 'सासुरवाशीण म्हणजे सासरच्या सर्व माणसांचा छळ सहन करण ' '२' -

या छळात नवऱ्यासकट सासरचे सर्व लोक सामील असतात. स्त्रियांना करणे, जेवण न देणे, रात्रदिवस काम करायला लावणे, साळी कांडणे अशी प्रकारची कामे या सुनेला करावी लागतात. एकत्र कुटुंबपद्धतीत अशी कामे सर्रास च आज हळूहळू या समाजात विभक्त कुटुंब पद्धती येत असली तरी सुध्दा वर्ड माणसांच्या शब्दांना बरीच किंमत आहे. विशेष म्हणजे कुटुंबात विधुर किंवा असली तर त्यांना सांभाळून घेण्याची प्रवृत्ती या समाजात दिसते. अपंग य कुटुंबात चांगल्या प्रकारे सांभाळले जाते. एखाद्या स्त्रीला संतती नसेल तर त्या नवऱ्याला, अधिक बायका करण्याचा पूर्ण अधिकार आहे. साधारणत: दोन तर कधी तीन, चार, बायकादेखील करण्याची पद्धती या समाजात आहे. आपल्या

मनाजोगा नवरा नसेल तर स्त्री काडीमोड घेऊ शकते व दुसरा नवरा करू श राखणे, घरातील छोटी मोठी कामे करणे इ. बाबतीत मुले खूप सहाय्यक ठरतात.

मुलांचे आरोग्य व वैद्यकीय सोयी

सदैव जंगलात राहणाऱ्या या जमातीतील लोकांना वर्षानुवर्षे; कधी ओला दुष्का कधी सुका दुष्काळ यांना तोंड द्यावे लागते. डोंगर उतरणीवरील नापीक जमिनी वाट्याला आल्यामुळे, चांगल्या जमिनी सोडल्या, तर सर्व जमिनीतून, नांदेड डोंगराळ भागात, वर्षाला एकच पीक हाती येते. त्यामुळे जवळजवळ चार महिने उपासमारीची पाळी येते. कंदमुळे, झाडपाला व जवळ असलेले दूध उदरनिर्वाह करावा लागतो. दारिद्र्यामुळे पुरेसे अन्न त्यांना मिळत नाही. पावसाचे कमी असल्यामुळे उन्हाळ्यात पाणीदेखील कठीण. पावसाळ्यात जेव्हा पाऊस तेव्हा लहानलहान नद्यांना पूर येतो आणि यांच्या वसाहतीची गावे; बेटासारखी आजूबाजूचा संपर्क तुटतो. सदैव चिखलात उभे राहून काम करावे लागते. अन्न पुरवठा कमी होतो. यांची घरेही पक्क्या बांधणीची नसल्यामुळे पावसाळ्यात सदैव असतात. त्यामुळे त्याचे आरोग्य न बिघडले तर नवलच. याशिवाय, मनोमन मुरल्यामुळे;भुते-खेते,स्थानिक देवता संबंधीच्या समजुती इत्यादी कारणामुळे त्यांच्या अ साथीचे रोग प्रचंड प्रमाणात उद्भवत असतात. त्यांच्या घरातले अर्धे घर असते. स्वच्छतेच्या जाणीवेचा अभाव, गुरांच्या शेणामुतानेदेखील त्यांचे आरोग्य असते उदा.थोडक्यात

१. समतोल व पुरेशा आहाराचा अभाव.

२. शुध्द व मुबलक पाणी पुरवठ्याचा अभाव.

३. आरोग्य विषयक व औषधोपचार विषयक साधन-सोयींचा अभाव.

४. रोगप्रतिबंधक योजनांचा अभाव.

५. अज्ञान व अंधश्रध्दा.

वैद्यकीय सोयीचा विचार करता असे दिसून येते की, वर्षानुवर्षे या भागात श वैद्यकीय सोय नाही. असे असूनही गोल्ला समाजाने परंपरागत आयुर्वैद्यकीय आपले आरोग्य सांभाळले आहे, असे म्हणावे लागेल. कंदमुळे व झाडपाल परंपरागत आयुर्वेदिक औषधे देण्याचे काम या लोकांनी दीर्घकाळ केले आहे. रोगापासून ते मोठ्या रोगापर्यंतदेखील रुग्ण सुधारण्यात यांनी यश मिळवले आहे. वै जमाती यादृष्टीने खूप आघाडीवर आहेत. त्यामानाने गोल्ला लोक याबाबतीत कमी हे नाकारून चालणार नाही. लहान-लहान खेड्यातून अशी औषधे देणारे लोक एक पुण्य साधण्याचे काम म्हणून ते आपली औषधे आजारी माणसांना विनामूल स्वखुशीने कोणी पैसे दिल्यास ते स्वीकारतात. त्यांना ही औषधाची विद्या

गुरुकडून किंवा वडिलांकडून परंपरेने प्राप्त झालेली दिसते.

त्याबाबतीत ते गुप्तता राखतात. गुरूने सांगितलेली औषधे व त्यांची ते कुणाला सांगत नाहीत. प्रत्येक गुरू मरण्यापूर्वी आपला एक चेला तया ठेवतो. अशारीतीने पिढ्यानपिढ्या,गोल्ला समाजात हा वैद्यकीय व्यवसाय चालत आहे. काही भागात गोल्ला वैदु ही जात प्रसिद्ध आहे. हे गोल्ला वैदु कोल्हापूर रहातात. असे श्री. बाळ रेणके यांचेकडून कळले. '४'

यापैकी काही वैद्य भगतदेखील कोणत्यातरी देवतेचे उपासक असतात. काह करणारे असतात. गंडे दोरे, औषधे याचा मारा करण्यास ते वैदु मागेपुढे पहात यांच्या औषधांना व दैवी उपचारांना कठोर पथ्य असते. तसेच उपचार देखील असतात. उपचार करुन घेणाऱ्यांची पाचावरधारण बसते. शिवाय या भगतांच्या एखादा माणूस अडकला की, त्याच्या मागे काहीना काही लचांड लागण्याची असते.

अशाप्रकारे आरोग्याची हेळसांड होत असते. अलीकडे डॉक्टरांचा व औषधांचा प्रसार जोरात झाला आहे. त्यामुळे या जातीतील लोकांची अंधश्रध्दा कमी होऊ लागली आहे. भगतांवरील विश्वास ओसरु लागला आहे.

योग्य ती वैद्यकीय व्यवस्था नसल्यामुळे बालमृत्युचे प्रमाण या जमातीत खूप साधारणपणे लहान मुले,माती खाऊन त्यांचे पोट मोठे होणे, हातपाय लहान मुडदुसासारख्या आजार होणे, या कारणास्तव बालमृत्यु होतात. एकत्र कुटुंबपध्दती असत स्त्रियांना केवळ आपल्या मुलांवरच अधिक लक्ष देऊन काळजी घेणे शक्य होत एकत्र कुटुंबात अनेक मुले असतात. त्यांची योग्य ती काळजी घेतली जात त्यांना कपडे, औषधे वगैरे पुरवता येत नाहीत. जन्मतः मुले खूप अशक्त आईलाच पोटभर अन्न मिळत नसल्याने ही परिस्थिती उद्भवते. गोल्ला जमातीतील अशिक्षित असल्यामुळे प्रत्येक कुटुंबात मुलांची संख्या खूप दिसून येते. मुले ह देवाची कृपा आहे असे हे लोक मानतात. त्याचा परिणाम त्याच्या दारिद्र्याव असे दिसते.

गोल्लांची शिक्षण परंपरा

आपल्या देशातील शिक्षणपरंपरा जरी फार प्राचीन असली तरी अनेक ह हे शिक्षण अजून तरी खेड्यापर्यंत पोहचलेले नाही. भटक्या जमातीपर्यंत तर तिच्या पुसटशा पाऊलखुणाही दिसत नाहीत. गोल्ला जमात ही तर बोलून चालून जमात जंगलात राहणारी. या जमातीत इंग्रजपूर्व काळापासून शिक्षण परंपरा शून्यच निसर्गाच्या मोठ्या पुस्तकातून व जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवातून शिकणे हेच ह्या शिक्षण. ही परंपरा मात्र या जमातीत अजून चांगली टिकून आहे. राजाचा

असतो आणि पंडित असतो. राजापेक्षा हेच शिकलेले अन् शहाणे असत हा मानाचा राजा असतो. त्याचे चातुर्य अनुभवातील असते. रामायण मह गुरुशिष्य परंपरेमुळे शिक्षण परंपरा या लोकांना ठाऊक झाली.

इंग्रजपूर्व काळापर्यंत सारेच अंगठे बहाद्दर होते. अनेक गोष्टी केवळ तोंडी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला पोहोचत. संध्याकाळ झाली की, जमातीत एकत्र येऊन धुनी पेटवायची आणि भोवती बसून त्यांची शाळा चालायची. शेकता शेकता गप्पा सुरु होत. गप्पागोष्टींतून लोकवाङमयाचा जिवंत झरा, रुपाने लोकांना प्राप्त होत असे. मुले, बायका मन ओतून भाग घेत अ असत. त्या ठिकाणी वेगवेगळ्या गोष्टी देखील सांगत असत. कधी अद्‌भूत पंडितांच्या चातुर्य कथा यात सारे रंगून जात. महाभारतातील प्रतिभा तेथे भांडार खुले करी.'६'

शिक्षणातील मुख्य अडचणी

१. भटक्या जमाती स्थिर नसल्यामुळे शिक्षण घेता येत नाही.

२. जनावरांच्या मागे मनसोक्त फिरणारा गोल्ला जमातीतील मुलगा, शैक्षणिक मानसिक दृष्ट्या रमत नाही.

३. शाळा घरापासून खूप दूर असल्याने नियमीतपणे शाळेत जाणे त्यांना नाही.

४. वसतीगृहात राहून अभ्यासक्रम पुरा करणे या मुलांना सोयीचे वाटत नाही.

५. पैसा खर्च करण्याची पालकांची ताकद नसते.

६. घरकाम व शेतीत मुलांचे मोठे सहाय्य लाभत असल्याने, पालक मु पाठविण्यास उत्सुक नसतात.

७. शिक्षणाबद्दल पालकांना फारसा रस वाटत नाही.

८. या मुलांना शिकविताना क्रमिक पुस्तकात जी भाषा असते, ती या मु अवघड वाटते. त्यामुळे शिक्षणात रस निर्माण होत नाही.

९. घरगुती अडचणीमुळे फार तर दोन तीन इयत्तापर्यंत ही मुले शाळे शाळा सोडतात.

१०. या जमातीत बालविवाह होत असल्यामुळे त्याचाही परिणाम मुलामुलींन होत असतो.

दत्तक विधी

गोल्ला जमातीत धनवान लोक फारच कमी प्रमाणात आढळतात. ए मुलगा नसेल तर त्या व्यक्तीच्या भावाचा मुलगा दत्तक म्हणून घेतला जा दत्तक मुलगा म्हणून घेते, त्या व्यक्तीस वडील म्हणून अधिकार प्राप्त

व्यक्तीची संपूर्ण संपत्ती त्या मुलास मिळते. त्या दत्तक मुलाला बाप म्हणून त्या नाव लावावे लागते. हा दत्तक-विधीचा कार्यक्रम ब्राह्मणाच्या हस्ते,नातेवाईकांच्या उप केला जातो. काही ठिकाणी, ज्या व्यक्तीला मुलगा नसेल त्यांच्या पत्नीच्या मुलगा दत्तक म्हणून घेतात. याचे कारण दत्तक व्यक्ती पुरुषाकडून किंवा स्त्रीकडून ना किंवा जवळच्या संबंधातील असावी अशी या मागील भूमिका असते. '७'

विवाह

गोल्ला विवाहपद्धतीचा विचार केल्यास सर्वसाधारणपणे विवाहाची पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. या समाजात विवाहाकडे धार्मिक संस्कार म्हणूनच पाहतात.

२. गोल्लामध्ये बालविवाह व प्रौढविवाह होतात. या जातीत बालविवाहाची प्रथा चालू आहे. सध्याच्या बदलच्या परिस्थितीत साधारणपणे मुलगी वयात आल्यानंतरच विवाह करण्याची पद्धती अवलंबिली जात आहे.

विवाह हा दोन घराण्यातील दुवा

दोन व्यक्तींचा विवाह, हा गोल्ला जमातीच्या दृष्टीने केवळ शरीरसंबंध नस घराण्यांना एकत्र जोडणारा दुवा असतो; असे मानले जाते. इतकेच नव्हेतर एका गाव वधू व दुसऱ्या गावामधील वर यांचा विवाह होतो. तेव्हा त्या दोन गावांचा स जोडला जातो. असे ही जमात मानते. हा गावागावातील संबंध दीर्घकाळ टिकी प्रयत्न केला जातो.

हिंदू समाजात अनेक पोटजाती आहेत. त्या पोटजातीत आणखी पोटजाती 'नवा हिंदू धर्म' या पुस्तकात (पृ.२६९ वर) गोल्ला जमातीचे सहा प्रकार आहेत. परंतु मी अनेक लोकांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. तेव्हा गोल्ला साडेबारा उपजाती आहेत हे लक्षात आले. त्यात उच्चनीचपणाच्या पातळ्या आहेत. माहितीसाठी हे सांगणे आवश्यक आहे. आपल्या जाती बाहेरची मुल किंवा आपली मुलगी जातीबाहेर देणे हे पुष्कळांना कमीपणाचे वाटते. तसेच लग्न करण्याचे टाळतात.

नांदेड व लातूर जिल्ह्यात, गोलेवार जमातीमध्ये सध्याच्या परिस्थितीत जाती अस्तित्वात असल्याचे अढळते. एक पाकनाटी गोलेवार, दोन मुकटी तीन यरा गोलेवार. या उपजाती नांदेड जिल्ह्यात व लातूर जिल्ह्यात मात्र मिसळलेल्या दिसून येत नाहीत. वास्तविक या तिन्ही उपजातीमध्ये सारख्याच खाणेपिणे व व्यवसाय असल्याचे दिसते. असे असूनही या उपजातीमध्ये परस्प होत नाहीत.

महाराष्ट्रामध्ये इतर जिल्ह्यांत गोलेवार जमात, काही ठिकाणी गोलेवार,

ठिकाणी गोल्ला, तर काही ठिकाणी गवळी म्हणून ओळखली जाते. का
तेलगू गोल्ला, तर काही ठिकाणी यादव गोल्ला म्हणूनही या जमाती ओळख
औरंगाबाद, अहमदनगर, मुंबई, पुणे, मालेगाव, जळगाव या भागात देखील
मोठ्या प्रमाणात दिसून येते. या भागामध्ये गोल्लांचे प्रकार फक्त नावालाच भि
आहेत. गोल्ला-गवळी, गोल्ला यादव. कृष्ण गोल्ला, यरा गोल्ला, मुक्टी गोल्ला
परस्पर विवाह होताना दिसतात. अनेकांच्या मुलाखती घेतल्यावर संशोधकाच
लक्षात आली. '९'

गोत्र म्हणजे काय ?

एका गोत्रामधील लोक म्हणजे एका वंशातील अशी समजूत आहे. ध
गोत्रांचा उच्चार ब्राह्मणाकडून केला जातो. आज सगोत्र विवाह पध्दती
प्राचीन इतिहास पाहता गोत्र म्हणजे वंश ही कल्पना खरी नाही. 'गोत्र'
अर्थ 'गोठा' कळप, असा ऋग्वेदात आलेला आहे. गोत्र ऋषी म्हणजे
त्याचे वंशज अशा अर्थाने गोत्र शब्द ऋग्वेदात वापरलेला दिसत नाही.

'गो' म्हणजे भूमी व 'त्र' म्हणजे संरक्षक, यावरून भूमी संरक्षक
'गोत्र' शब्दाचा अर्थ काही विद्वान करतात. त्यावरून आपल्या भूमीच्या बा
दुसऱ्या भूभागातील मुलगी करणे किंवा पळवून आणणे हाच पुरुषार्थ अ
'गोत्र' 'गोत्रा बाहेर' लग्न करण्याची रीत उत्पन्न झाली असावी '१०'

मुलामुलींचे प्रेम घरातल्या घरात, आप्तसंबंधात जडण्याचे प्रकार होऊ
सपिंड विवाहाचा निषेध आवश्यक आहे. या सर्व कारणावरून, एकाच गोत्रातील
लग्नसंबंध निषिध्द मानले जातात किंवा एकाच कुलातील मुलामुलीचे लग्न
ठरविले जातात.

वाचकांच्या माहितीसाठी श्री.सायनलू लच्छन्ना कालन्ना. वय वर्षे पंचाऐंश
माणूस, व्यवसाय, जिल्हा नाशिक यांनी दिलेली माहिती नोंदवीत आहे.
गोल्ला किंवा गोलेवार समाजातील काही आडनावे आणि त्यांची गोत्रे पुढीलप्रम
आहेत.

आखमोड - आखेमोड अखेरल् गोत्रम्
सायनलू - चंदरलू गोत्रम्
रेगनवाडू - चेंगेवेलम गोत्रम्
रिर्वाडू - पोलल् गोत्रम्
पॅलडू - कुंभाल गोत्रम्
घंटडू - मुदलू गोत्रम्
पैलमवडू - मुदलू गोत्रम्

सायनडू - चंद्रलम गोत्रम्
कोडजीटू - चिलकल गोत्रम्
पनेवलडू - (चिमण्या) गोत्रम्
माकलडू - घुमुल गोत्रम्
मारेवलडू - धुनुल गोत्रम्
गुडगेलू - शासल गोत्रम्
घंटोड - शासल गोत्रम्
मुगलपैलूड - दंतील गोत्रम्
राजमोडू - मारला गोत्रम्
गडबोयन - गनरलू गोत्रम्
अलवाडू - मंगलम् गोत्रम्
यंदोडू- अंकील गोत्रम्
रावलोडू - बंबरल गोत्रम्
मैनेडू - बंबरल गोत्रम्
आयवलडू - कोमरला गोत्रम्
कावटडू - पसरगाय गोत्रम्
डरुडलू - पसरगाय गोत्रम्
जनडलू - सलल्रोरी गोत्रम्
पौचमंडलू - सलल्रोरी गोत्रम्
दलनलोडू - सलल्रोरी गोत्रम्
नंगरडू - सलल्रोरी गोत्रम्
यामन बोईमनडू - सलल्रोरी गोत्रम्

प्राचीन काळातील सगोत्र विवाह

प्राणिशास्त्रदृष्टया विचार केल्यास सगोत्र विवाह निषेधापेक्षा सपिंड विवाह अधिक गरज आहे असे दिसते. फार प्राचीन काळी सगोत्र विवाह निषिध्द पुराणामध्ये सगोत्र विवाहाची अनेक उदाहरणे आढळतात. श्रीकृष्णाचे मातापिता आणि देवकी हे यदुवंशातील होत. दोघांचा मूळ पुरुष चित्ररथ हा होय. त्यां वसुदेव अकरावा व देवकी बारावी असे चित्र भागवतातील वंशावळीवरून दि तसेच पृथा (कुंती) पांडु, सुभद्रा व अर्जुन यांचे विवाह एकाच गोत्रातील होते. सू रामलक्ष्मणादि बंधू व उर्मिलादि बहिणी यांचे विवाह ही सगोत्रच होते. य अशा तऱ्हेच्या उदाहरणांवरुन सगोत्र विवाह होत होते हे सिध्द होते.

गोल्लांची प्राचीन विवाह पध्दती

नांदेड व लातूर जिल्ह्यातील गोल्ला समाजातील लग्नपद्धतीमध्ये देखील दिसून येतो. नांदेड विशेष करुन 'देगलूर' व बिलोली, मुखेड या तालुक्यातील वि थोडा फार फरक दिसून येतो. याचे एक कारण या भागातील गोल्ला ज तेलगू भाषा बोलते. तेव्हा ती आंध्रप्रदेशातून आली असावी व येताना अ व रितीरिवाज तिने आपल्या बरोबर आणले असतील विशेष म्हणजे या लग्नातील गाणीदेखील तेलगू भाषेतील असल्याचे आढळते.

श्री. खंडेराव संगमकर, राहणार देगलूर, वय-वर्षे सत्तर यांची या संबंधी घेतली. तेव्हा गोल्ला जमातीतील प्राचीन विवाहपद्धतीतील माहिती देताना ते म्हणा काळी गोल्ला जमातीतला लग्नाचा कार्यक्रम पाच दिवसांचा असे. पहिला दि व देवकार्य, दुसऱ्या दिवशी लग्न लावणे, तिसऱ्या दिवशी मानाप्रमाणे आहेर चवथ्या दिवशी नवरा-नवरीस घर शेरणी करतात. अशाप्रकारे पाचदिवस वेगवेगळ्या विवाह-सोहळा केला जात असे.

आजदेखील साधारणपणे खेडेगावामध्ये तीन किंवा चार दिवस क्वचित या जमातीत लग्न होताना दिसतात.

एखाद्या खेड्यात गोलेवार जमातीतील लग्न असेल आणि लग्नातील वधू असेल तर पूर्वी लग्नातील लोक दोनचार दिवस चालत येऊन लग्नाचा पाडीत असत. पूर्वी पिठाच्या गिरण्या नव्हत्या. त्यामुळे पुरुष मंडळी लग्नातील जेवण दळण दळीत असत. परंतु आजकाल लग्नाचे वऱ्हाड बस किंवा बैलगाडीतून होताना गाणे म्हटली जातात. दोन दोन दिवस गाण्याचा कार्यक्रम चालू असत बायका कोणकोणते दागिने केले ते वधूस गाण्यातून सांगत असतात. '१२'

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेया थडी।

आमच्या घरी रामया सोनार।
त्याने घडविल्या मंगळसूत्राची जोड।
लेव लेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार।।१।।

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेचा थंडी।
आमच्या घरी रामया सोनार।
त्याने घडविले जोडव्याची जोड।

लेवलेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार॥२॥

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेया थडी।
आमच्या घरी रामया सोनार।
त्यानं घडविले दंड्याचे जोड।
लेवलेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार॥३॥

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेया थडी।
आमच्या घरी रामया सोनार।
त्यानं घडविले वाळीयाचे जोड।
लेवलेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार॥४॥

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेया थडी।
आमच्या घरी रामया सोनार।
त्यानं घडविलं तोड्याचे जोड।
लेवलेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार॥५॥

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेया थडी।
आमच्या घरी रामया सोनार।
त्यानं घडविलं चिंतकाचे जोड।
लेवलेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार॥६॥

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेया थडी।
आमच्या घरी रामया सोनार।
त्यानं घडविले काड्याचे जोड।
लेवलेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार॥७॥

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेया थडी।
आमच्या घरी रामया सोनार।
त्याने घडविले मासळ्याचे जोड।
लेवलेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार॥८॥

औरंगी घोडा चौरंगी गुपीला।
तेबी घोडा गंगेया थडी।

अशा प्रकारची गाणी लग्नाला जात असताना वाटेत किंवा रस्त्याने बायका
मुलीला अनेक दागिन्यांची नावे घेऊन ही गाणी म्हणतात.

सोयरिक

गोलेवार लोकात सोयरीक जमविताना कुळाचा व गोत्राचा विचार करतात. एका
मुलामुलींची लग्ने होत नाहीत. बहीण व भावाच्या मुलामुलींची लग्ने होत नाह
जमातीत जवळच्या नातेवाईकातच सर्वसाधारणपणे सोयरिक होते. मामाची मुलगी ही
बायको मानली जाते. एखाद्या वेळेस मामा आर्थिक परिस्थितीने गरीब असत
मामा हक्काने आपली मुलगी बहिणीच्या घरी देतो आणि बहीणदेखील ती मुलग
मामाला, आज्याला विचारल्या शिवाय लग्न करत नाहीत.

''बाईला मागु आला। गंगथडीचा राजा।
बोलेनार तुझा आज्या॥
बाईला मागु आले। कुणाची गं कुण देव।
मावळ्याची पूस घेव॥
साळीचे तांदूळ। एवढे आदनी ग खुलले।
दादा सोयऱ्या। माझ्या दारी उमराव बोलविले॥'' '१४'

जुन्या परंपरेनुसार नांदेड व लातूर जिल्ह्यात विशेषत: मुलगी पाहण्यासाठी
जात नसे. त्यांच्या घरातील मोठी माणसे मामा, आज्या, वडील, चुलता, काका यांच
लग्न जमविण्याचा कार्यक्रम होत असे.

आजच्या काळात काही मात्र शिकलेली मुले मुलगी पाहण्यासाठी जाताना
असे असूनही मुलाने मुलगी पसंत केली तरी लग्नसंबंधीची निश्चिती आई वड
मनावरच अवलंबून असते. मुलाला मुलगी पसंत पडली तरी आईवडीलांना ती

पडणे महत्त्वाचे असते. त्यामुळे अंतिम निर्णय आईवडीलांचाच असतो. गोल्ला ज शिकलेल्या मुली फार कमी आहेत. क्वचितच प्रसंगी एखादे लग्न आईवडीलांचा न जुमानता होताना दिसते. आजही सर्वसाधारणपणे आईवडीलांच्या पसंतीने या ज लग्ने होतात असे दिसते. या जमातीत लग्ने जमविताना मुलाचे कुळ गोत्र, ख या सर्व गोष्टीना फार महत्त्व दिले जाते. एखाद्या वेळी मुलगी काळी असली चालते, पण मुलीचे कुटुंब खानदानी असले पाहिजे असा त्यांचा आग्रह असतो.

पोटाला कुंकू लावणे

एखादी स्त्री गरोदर असेल तर तिच्या पोटालाच कुंकू लावतात. 'मुलगी झाली 'माझ्या मुलाला दे' असे म्हणतात. आणि योगायोगाने मुलगी झाली तर या जमात लोक दिलेले वचन पूर्ण करतात. या जमातीत मुलगा किंवा मुलगी यापैकी कोण लहान व कोण मोठा याचा विचार करीत नाहीत. एखाद्या प्रसंगी मुलगी मुल मोठी असते, तर कधी मुलगा खूप मोठा व मुलगी खूपच लहान असते. याचे म्हणजे अशा प्रकारची लग्ने मामेभाऊ व मामेबहीण यांच्यात होतात. म्हणून वयोम विचार फारसा तेथे केला जात नाही.

एखाद्या वेळेस मुलगा मोठा आणि मुलगी लहान असली तर मुलगी आहे असे कारण सांगून लग्न नाकारता येत नाही. मुलीचे वडील माझ्या मु खोबरे, खारकेचा खुराक लावतो असे कबूल करून घेवून, त्यांचे लग्न लावतात. ए वेळेस मुलगी मोठी व मुलगा लहान असेल तर ते म्हणतात, तुझा मुलगा होईपर्यंत माझी मुलगी काही पळून जाणार नाही. तुझ्या मुलाला तू खुराख लाव.

पण सध्याची परिस्थिती बदलत चाललेली आहे. थोडेबहुत शिकलेले आ आपल्या मुलामुलींची लग्ने बालवयात लावीत नाहीत. अशिक्षित माणसे मात्र अ मुलामुलींची लग्ने आजही बालपणातच लावताना दिसतात. काही वर्षांपर्यंत मुलगा मुलगी वय मोठे होईपर्यंत लग्नाशिवाय राहत नसत. '१६'

बहुविवाह

वधु व वर यापैकी कोणत्याही एका प्रकारच्या किंवा दोन्ही प्रकारच्या जोडी संख्या एकाहून अधिक असेल तर त्याला बहुविवाह असे म्हणतात. अशी क्वचित उ आढळतात.

बहुपत्नीविवाह किंवा बहुभार्याविवाह

पती आणि दोन किंवा अधिक बायका अशा विवाहाला बहुपत्नि विवाह म्ह गोल्ला जमातीत एकापेक्षा अधिक स्त्रियांच्याबरोबर लग्न करण्याची मुभा आहे. परंतु करताना त्यासाठी काही सबल कारण असावे लागते. एखादा गृहस्थ श्रीमंत तर तो अनेक स्त्रियांशी विवाह करु शकतो. याशिवाय अन्य सबळ कारणे

प्रमाणे सांगता येतील.

एखादी स्त्री सतत किंवा दीर्घकाळ आजारी असेल किंवा मुले होत तर दुसरे लग्न करण्यास हरकत नसते. अशा तऱ्हेची पध्दती अनेक जमातीं येते

बहुपती

एखादी पत्नी व अनेक पती असेल या विवाहाला बहुपती विवाह असे परंतु गोल्ला जमातीत अशा प्रकारची पध्दती आढळत नाही. परंतु काही संशोधनाला वाव आहे. प्राचीन काळी मुलीची संख्या कमी होती तेव्हा उदाहरणे दिसत असत.

घरजावई

गोलेवार जमातीत एखाद्या व्यक्तिला मुलगा नसेल व फक्त मुलगीच असेल त ठेवतात. हा घरजावई ठेवीत असतानादेखील खूप विचार करून तो निर्णय घेत जवळच्या नातेवाईकांतील असावा. त्यातल्या त्यात पुरुषाच्या बहिणीचा मुलगा म्हणून ठेवतात. या अशा प्रकारच्या जावयाचा स्वभावसांगताना एक लोकगीत म्हणत

"जावयाची जात।आली दराजा वाकुन ।
नवसाची माझी बाळ । नेली मोहना झाकून ।

आवुख मागते । जावया शेजाऱ्यास ।
मैना बाळाबाई । हाये निवाऱ्याला तुळस ॥

आवुख मागते । लेकी आधी जावयाला।
बाळाई माझी । राहू तुळस निवाऱ्याला ॥

सरज्याची नथ । लेकी दिली बायजाला ।
किल्लयाखाली गाव । मुनसुबी जावयाला ॥" '१७'

जावयाची जात प्रथम नम्रपणे वागते. गाण्यातील स्त्री म्हणते माझी मुल आहे. जावयाने तिला सांभाळून गोडीने तिला नेली, माझ्या मुलीला चांगली जावयाला दीर्घ आयुष्य चिंतीते. जावई किल्लया खालच्या गावात राहतो जावई खूप हुशार आहे. प्रत्येक स्त्रीला आपल्या जावयाचे मोठेपण सांग दिसते. पुढील गाण्यातून ते अधिक स्पष्ट होईल -

" जावई पाटील । आपुले होय कोण ।
नात लावते मालन ॥
जावई पाटील । पूत मायेचे पंडीत ।
लेक माझी चंद्रज्योत ॥
जावई पाटील । बाई कंठीचे पदक ।
लेक मालन अधिक ॥
जावई पाटील । कंठीचे रुद्र मणी ।
लेक माझी हिरकणी ॥" '१८'

जावयाचा मोठेपणा सांगत असताना आपल्या मुलीचे कौतुक सांगायलाही या स्त्री विसरत नाही.

लग्नाचा मुहूर्त

नांदेड व लातूर जिल्ह्यातील इतर जमाती प्रमाणेच गोल्ला जमातीतील लग्ने होता आणि मे महिन्यात लग्नाच्या तिथी असतात. कारण या काळात समाजातील स्वीकृत व्यवसायाचा ताण नसतो. ज्या ठिकाणी गोल्ला जमातीचे लोक अधिक असतात. तेथील लग्नाची पध्दती काहीशी वेगळी असते. उदा. औरंगाबाद, अ मालेगाव या भागात लग्ने रात्री बारा वाजता लागतात. नांदेड व लातूर जिल्ह सकाळी लागतात. नांदेड भागात पूर्वी शेवती (सीमांत पूजन) नव्हती. म्हणजे न मारुतीच्या पारावर आहेर चढविण्याची पध्दती नव्हती. नांदेड व लातूर जिल्ह पद्धती पूर्वी नव्हती. पण गेल्या पंचवीस वर्षात इतर जमातींच्या अनुकरणातून ह स्वीकारली गेली असावी असे दिसते.

तेलगू भाषिक गोल्ला जमातीच्या लग्नात भात, डाळ असा जेवणाचा प्रका त्या मानाने हा प्रकार नांदेड जिल्ह्यात कमी प्रमाणात दिसतो. काही ठिका भात, वरण, भाजी अशा पदार्थांचे जेवण असते. इतर गरीब लोक शिरा, भ किंवा खीर करतात. लातूर जिल्ह्यात असेच चित्र दिसते.

लग्नमांडवात मांडवाला आंबा, जांभळी, (पांगारा) उंबर, समदड (सौ झाडांच्या फांद्या आणून मांडव सजवितात. मांडव घालतेवेळी या झाडांच्या फांद्या लोकांत गंधर्व विवाहाचा म्हणजेच म्होतुर लावलेला पुरुष सहभागी होवू शव फक्त प्रथम लग्नाचा पुरुषच असावा लागतो. मांडवाचा खांब खड्यात रोवता वेळेस पुरुषाला त्यांच्या पत्नीचे नाव घेऊनच तो खांब खड्यात रोवण्याची पध्द मांडवाच्या पहिल्या खांबाची पूजा करतात. आणि मग जमलेल्या सर्व लोक लावून गूळ किंवा साखरेचा प्रसाद घ्यायचा असतो. इतके झाल्यावर मांडवा काम सुरु होते.

आळंका

हळदीचा मांडव घातल्यानंतर आळंका वाढवतात (एक विशेष लग्नविधी) हळदी साडी देवपूजेसाठी नेतात. त्याच बरोबर आंबील, खिचडा,फळे, पाणी, भात घेऊन पू जातात. आळंका घेऊन जाणाऱ्यामध्ये पाच सवाष्णी असतात. त्यांच्याजवळ घट चार आळंक्या असतात.ह्या आळंक्यामध्ये तांदूळ, खोबरे, हळद, आंबील ठेवतात त्या आळंक्यात लिंबाच्या झाडाच्याखाली फांद्या रोवतात. आळंका डोक्यावर घेताना आळं लिंबाच्या फांद्याचीच गोल चुंबळ घेतात. एक पितळी तांब्या असतो. त्यात प लिंबाची पाने टाकतात.तो तांब्या ठेवायला मात्र लिंबाची चुंबळ नसते. नैवेद्य पाण्याचा तांब्या एका बाईच्या हातात असतो. '१९'

या सवाष्णी निघाल्या म्हणजे पुढे वाजंत्री वाद्ये वाजवीत चालतात. मारुती, प मराई आदि देवतांच्या समोर जाऊन सवाष्णी गाणी गातात. प्रथम मारुतीला नैवेद्य दाख त्यावेळी स्त्रिया पुढील गाणी म्हणतात.

"तिथं मारुती अडीला ।
तुज तुला शेला देईन ।
माझ म्या नवरी नेईन ॥१॥

तिथं पोचम्मा आडीली ।
तुज तुला बांगडया देईन ।
माझ म्या नवरी नेईन ॥२॥

तिथं मराई आडीली ।
तुज तुला शेंदुर देईन ।
माझं म्या नवरी नेईन ॥३॥ '२०'

मग तिथून वाजत गाजत परत घरी येतात आणि घरातील देव्हाऱ्याजवळ नेलेले ठेवतात. नवरदेवाला हळद लावतात. त्यांच्याबरोबर एक लहान मुलगी असते ती मेव्हणी किंवा अन्य मुलगी असते. तिला अंघोळ घालतात. नवरदेवाल घालताना त्याला सुतवतात. सुतवत असताना जे गाणे म्हणतात ते अशा प्रकारचे आहे

"मांडवाच्या दारी । हळदीबाईची वाळवण ।
नवऱ्याच केळवण ॥१॥

मांडवाच्या दारी । हळदीबाईचा केला घोडा ।
नवरा बघुनी दिला हुंडा ॥२॥

मांडवाच्या दारी । घोडा नाचतो थयथया ।
नवरा उठना पाणी न्हाया ॥३॥''

अशा प्रकारची हळदीची गाणी म्हणतात.

''तेलगू तेलंगना । नागीलीच्या पाना ।
आधी हळद लावा । मागून तेल लावा ।
देवाया पांडुरंगाला ॥१॥''

नवरदेवाला हळद लावण्यासाठी त्या पाच सवाष्णी जी गाणी म्हणतात. त्या गाण्
जुन्या काळातील लग्नाच्या चालीरीती दिसून येतात. ही गाणी जेव्हा म्हणतात
प्रत्यक्ष लग्न सोहळा चालू आहे असा भास होतो.

''ओल्या हळदीचं । वाळवण सईन घातलं ।
केलं अंगणी केळवणं । गोत्यानी ॥१॥

घाणा ग भरीयेला । सवाखंडी भाताचा ।
नवरा उदंड । गोत्याचा ॥२॥

सारविल्या भिंतीवर । काडील्या गवळणी ।
होईन हावस्याचा । मावळणी ॥३॥

पाच दुरडचा रुखवत । सहावी दुरडी पानांची ।
चुलती रुसली । मानाची ॥४॥

लग्नाच्या वेळी । शिंगी कापती थरथरा ।
आला नवरा । धीरधरा ॥५॥'' '२१'

जर नवरीच्या घरी तिला हळद लावणे शक्य झाले नाही तर नवरीला मार पायावर पडल्यावर हळद लावतात. समजा नवऱ्याच्या घरी लग्न असेल तर न तिचे वऱ्हाड प्रथम पारावर येतात व मारुतीच्या पाया पडून वऱ्हाड कुणाच्य घरी उतरते. त्यानंतर नवरदेवाला शेवंतीसाठी (सीमांत पूजनासाठी) घेऊन येतात. सीम मारुतीच्या समोर होते. त्यावेळी नवरदेवाला घोड्यावर किंवा घोडा नसेल तर आणतात. किंवा नवऱ्याचा मामा किंवा त्याचा मेव्हणा नवऱ्याला उचलून मारु आणतो.

शेवंती

मारुतीसमोर नवरदेवाला आणल्यानंतर नवरीकडच्या पाहुण्यांना वाजत गाजत घेऊन व त्या ठिकाणी नवरीचा मामा नवरदेवाची पूजा करतो. नवरा-नवरीचे पाय धुऊन पडतात. त्याच्याबरोबर ब्राह्मणदेखील असतो. तिथे जमलेल्या प्रमुख सोयऱ्याला ब भेटी घेतात. तेथे सर्वसाधारण हिंदूपध्दतीने सीमांतपूजन साजरे होते.

यानंतर नवरदेवाला आहेर चढतो. नवरदेवाला आहेर चढवत असताना ज सर्व लोकांस गुलाल लावतात. त्यानंतर ब्राह्मण पूजा करतो. नवरदेवाचा मेहुणा मामा त्याला आहेर चढवतो. नवरदेव आहेर चढवताना थोडातरी रुसतो.

"का हो रुसलो । पलंगी बसलो।
तुम्हा देऊ केले । खोबर बन ॥१॥

को हो रुसलो । पलंगी बसलो।
तुम्हा दिले केले । सुपारी बन ॥२॥

का हो रुसलो । पलंगी बसलो ।
तुम्हा देऊ केले । खारीक बन ॥३॥" '२३'

अशा प्रकारे बायका गाणी म्हणतात. लग्न जमताना ठरवलेले सर्व काही आ आहेर घेतो. नंतर ब्राम्हणांच्या पाया पडतो. जमलेल्या मंडळींना नमस्कार करुन मा पाया पडल्यानंतर त्याला लग्न मंडपात नेले जाते.

शेवंती करुन परतताना कुंभार, मांग, परीट (धोबी), वाजंत्री वाजवणारे अ मंडपाजवळ आल्यावर ज्यांना ज्यांना आहेर चढलेला आहे. त्या बायका, पुरु रुपया पन्नास पैसे, अशी ओवाळणी टाकतात. त्यानंतर घरातील बहीण चुलती, पिठाचे मुटके करुन नवरदेवावरुन तीन वाटेकडे ओवाळून टाकतात.

गोल

लग्नाची तयारी

सर्व सामान्य पद्धतीने ब्राम्हण अंतरपाट, अक्षता, मंगलआष्टके, वाजंत्री या लागते. लग्नासाठी आलेल्या सर्व लोकांस जेवणाची विनंती करून, त्यांना जेवण बुंदी, पुरी, भाजी, किंवा शिरा, भात किंवा खीर, भातदाळ देखील देतात. पूर्वीपासूनच भातदाळ हे जेवण देण्याची पध्दत आहे. आंध्रप्रदेशातून आलेले अ तेथील भाताचा प्रभाव आहे. आजदेखील नांदेड भागात भात-वरण करतात. स लोकांचे पाहून ते लोकदेखील बुंदी, पुरी, भाजी, भात असे पदार्थ करताना दिसतात.

प्राचीन काळी लग्न झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी साड्या काढीत व तिसऱ्या नवरानवरीला चांदण दाखवित असे. याला पाळणे म्हणत व चौथ्या दिवशी वरात व पाचव्या दिवशी तोंड धुतात. अशा प्रकारे पाच दिवस लग्नाचा कार्यक्रम करतात.

आजच्या काळात मात्र नांदेड आणि लातूर जिल्ह्यात लग्न झाल्याबरोब दिवशी वऱ्हाड मंडळी जेवण करेपर्यंत, नवरा नवरीच्या नावे घेण्याचा कार्यक्र सुपारी खेळण्याचा व हळद खेलण्याचा इ. कार्यक्रम उरकून घेतात.

नवरा नवरी खेळतात

नवरा नवरी एकमेकांना हळद लावतात. सुपारी खेळतात. नवरा डाव्या हाताच बोटात सुपारी धरतो. नवरी दोन्ही हातानी सोडवते. नंतर नवरी सुपारी दोन्ही घट्ट धरते. नवदेवाला मात्र सुपारी सोडवून घेत असताना डाव्या हातानेच लागते. त्यामुळे नवऱ्यामुलास सुपारी सुटत नाही. त्यावेळेस लोक हसतात. त्यामु नवरदेव हाताच्या बोटांची नखे वाढवतात, नखाने टोचल्याबरोबर ती सुपारी सो एखाद्या नवरीने लवकर सुपारी सोडली, तर नवऱ्याची खूप माया आहे म्हणून चिडवतात

त्यानंतर नवरा नवरी समोर तांदळाचे ढीग करतात. नवरदेव डाव्या हाताच्या तांदळाचे ढिगारे मोडतो. त्यानंतर नवरी कपाळाने तांदळाचे ढिगारे मोडते. त्यावेळ एकमेकांचे नाव घेत तांदूळाचे ढिगारे मोडतात.

हळद खेळण्याचा देखील कार्यक्रम होतो. नवरा नवरी एकमेकांना हळद नवरा डाव्या हाताने हळद लावतो. नवरी दोन्ही हातांनी नवरदेवाला हळद वऱ्हाडातील मेहुणे-मेहुण्या एकमेकांना हळद लावतात. त्यानंतर नवरदेव व नवरी माणसांच्या पाया पडतात. नंतर देव्हाऱ्यातील देवाच्या पाया पडतात. त्या दोघ पिण्यास देतात. नवरदेवाचे उष्टे दुध नवरीस देतात. थोड्याच वेळात त्या दोघांना सु अंघोळ घालतात. नंतर लगेच हळद लावतात. '२४'

साड्यांचे आहेर चढवितात. सर्व पाहुण्यांना बोलावून घेतात. नवरीच्या लोकांना बोलावतात. ब्राम्हण पूजा करतो. बायका गाणी म्हणतात.

''काकन गिरगिरी बिजीयापुरी ।
तिथला मुनीम कारागीरी ॥
झालर लावली । मोतीयाची मोतीयाची ।
उठाउठा हा भागियवंता।
शेले आणिले तुमच्या करीता तुमच्या करीता ॥१॥

काकन गिरगिरी निजीयापुरी ।
तिथला मुनीम कारागिरी ॥
झालर लावतो । मोतीयाची मोतीयाची ।
उठा उठा हो भागियवंता ।
धोतर आणिले तुमच्या करीता तुमच्या करीता ॥२॥

काकन गिरगिरी बिजीयापूरी ।
तिथला मुनीम कारागिरी ।
झालर लावली । मोतीयाची मोतीयाची ॥
उठा उठा हो भागियवंता ।
कुडते आणिले तुमच्या करीता तुमच्या करीता ॥३॥

काकन गिरगिरी बिजीयापूरी ।
तिथला मुनीम कारागिरी ।
झालर लावली । मोतीयाची मोतीयाची ॥
उठा उठा हो भागियवंता ।
पटका आणिला तुमच्या करीता तुमच्या करीता ॥४॥

काकन गिरगिरी बिजीयापूरी ।
तिथला मुनीम कारागिरी ।
झालर लावली । मोतीयाची मोतीयाची ॥
उठा उठा हो भागियवंता ।
घड्याळ आणिले तुमच्याकरीता तुमच्याकरीता ॥५॥

त्यानंतर नवरदेवाला 'साड्याचा आहेर' चढवताना वाजंत्रीना बोलावतात. शे
नवरदेव रुसतो. त्याची मागणी असेल तर तो मागून घेतो. जरी काही राहि
गो

तरी नवरदेवाचा मान म्हणून तो रुसतो. नंतर नवरदेवाला आहेर चढविला साधारण कपडे असतात. नवरीला मात्र भारीपैकी पातळ नेसविले जाते. साड्यां संपल्यावर रुखवत आणले जाते. रुखवतात वेगवेगळ्या प्रकारचे खाद्य पदा असतात. ते सर्व मंडपामध्ये पाहुण्यासमोर मांडतात. पाहुणे एक साडी आहे रुखवतावर ठेवतात. व रुखवताची गाणी म्हणतात त्या गाण्यामध्ये मांडलेल्या वर्णन करतात. तसेच ज्यांनी पदार्थ तयार कलेले असतात त्यांची स्तुती केली जाते.

रुखवताची मांडणी :-

रुखवत आणलं । नुसत्या साखरकन्या ।
नवरी राजकन्या॥१॥

रुखवत आणलं । निऱ्या वाटोळ्या मालत्या ।
कोण मानाच्या चुलत्या ॥२॥

रुखवत आणलं । लांब सुतकी शेवया ।
केल्या सुगरणी भावजया ॥३॥

रुखवत आणलं । करंज्या लाडू खूप ।
कोण केल वरमाई रुप ॥४॥

रुखवत आणलं । गोड अनारसे फार ।
कोण केली वरमाई थोर ॥६॥ '२६'

अशा प्रकारे रुखवतातील अन्नपदार्थची वाहवा करतात. रुखवताता विहिणी (विहीन) ए मस्करी करतात. त्यामध्ये गमतीदार गाणी म्हणतात.

"मांडवाच्या दारी । आळं राखायच ।
हळू बसा विहीण बाई । लुगडं लोकांच ॥१॥

मांडवाच्या दारी । करीन म्हणाले धिरड्या ।
विहीणी मिळाल्या थेरड्या । तर राहून गेल्या धिरड्या ॥२॥

मांडवाच्या दारी । पडलं उलतानं ।
रुखवताला बगून विहीणी नाचल्या तणतणा ॥३॥" '२७'

नंतर रुखवत देव्हाऱ्यापाशी नेऊन ठेवतात. त्यानंतर सर्व वऱ्हाडी मंडळी जातात. नव नवऱ्याच्या घरी काही ठराविक लोक राहतात. आजच्या काळात एकाच दिवस कार्यक्रम पार पडतात. गोल्ला समाजात प्राचीन काळी रुखवत आणत नसत. परंतु आ काळात इतर समाजाचे पाहून काही लोक रुखवत आणतात. ही लोकगीते स संकराने आली असावीत.

रात्रीच्या वेळेस त्याचदिवशी वाजत गाजत वरात काढतात. खेडेगावात पाटील, माली पाटील, या दोघा गावकऱ्यांच्या घरी,गावातील लग्न झालेली जोडपी व दिवशी जातात. मानकरी नवरा, नवरीला सुपारी देऊन नाव घ्यावयास लावतात. हळदकुंकू लावतात. ओटी भरतात. तोंड गोड (चहा देतात) करतात. त्यानंत गावभर फिरुन नवरा-नवरी मारुतीच्या पाया पडतात. तसेच मानकऱ्यांच्या पाया नंतर घरी येतात व पाळणे म्हणतात.

पाळणे

पतीपत्नींची ओळख व्हावी हा हेतू या कार्यक्रमात असतो. (गर्भादानाचे सूचक का?)

नांदेड व लातूर जिल्ह्यांत, लग्नात पाळणे म्हणत असताना नवरी मुलीची ह साडी; दोन खांबांना बांधून त्या साडीत एक छोटीशी हळद लावलेली बाहुली टा नंतर श्रीकृष्ण, श्रीराम, शिवाजी, संभाजी यांच्या जन्माचे पाळणे म्हणतात. कमीत पाच पाळणे म्हणतात. काही लग्नात सात, नऊ, अशा विषम संख्येत पाळणे म्ह त्या छोट्या बाहुलीला लहान मूल समजून नाव ठेवण्याचा कार्यक्रम करतात.

प्रथम नाव ठेवण्यास नवरदेवाची बहीण येते. नाव ठेवत असताना 'राम कुर्रऽऽकुर्र' असे म्हणते. ती खाली वाकून, मुलाच्या कानात,ती बाई किंवा पुरुष वाकल्या जी व्यक्ती नाव ठेवते तिचे मेहुणे किंवा मेहुण्या त्या व्यक्तीच्या पाठीवर जोराने मारतात. कोणी नाव ठेवण्यास आल्यास त्यांच्या पाठीत मारतात.

नवरा-नवरीस बोलावयास लावणे

नवरी व नवरदेव यांचा एकमेकांशी पूर्ण परिचय नसल्यामुळे; त्यांना बोलते करण्ा हा कार्यक्रम फार पूर्वीपासून करतात. नवरी नवरदेवाकडे ते लहान मूल देते. ती "मला पाणी आणायचे आहे, मुलाला घ्या." नंतर नवरा म्हणतो, "मला ज जायचे आहे. लेकरु घे." असे म्हणून त्यांना बोलते करतात.

नंतर देव्हाऱ्यातील देवाच्या पाया पडण्यास जातात. तेव्हा नवरदेवाच्या घराच्या दारात नवरा-नवरीस अडवतात. त्या दोघांना मुलगी मागतात. मुलगी मागण्ा गाणी म्हणतात.

शिंपी शिंपी सोन दे । वहिनी दाराई लेक द्या ।
वहिनी दाराई लेक द्या ॥
तुमच्या शिंपीवर बसलं पाखरु, उठलं पाखरु ।
लऊ लाव्हयाच, साखर खायचं ।
दुरल्या देशाच, कुरळ्या केसाचं ।
न्हाई माय मी लेक द्यायची ॥१॥

दोन दोन शिंपी सोन द्या । वहिनी दाराई लेक द्या ।
वहिनी दाराई लेक द्या ॥
तुमच्या शिंपीवर बसलं पाखरु, उठलं पाखरु ।
लऊ लाव्हयाच, साखर खायचं ।
दुरल्या देशाचं, कुरल्या केसाचं ।
नाही माय लेकं द्यायची ॥२॥

तीन तीन शिंपी सोन द्या । वहिनी दाराई लेक द्या ।
वहिनी दाराई लेक द्या ॥
तुमच्या शिंपीवर बसलं पाखरु, उठलं पाखरु ।
लऊ लाव्हयाच, साखर खायचं ।
दुरल्या देशाचं, कुरल्या केसाचं ।
नाही माय लेकं द्यायची ॥३॥

अशी गाणी, नऊ शिंपीपर्यंत नवरदेवाच्या समोर म्हणतात. नंतर नवरा विचारतो तेव्हा नवरी म्हणते, 'आंधळी, खुळी, जर लेक असेल तर द्यावी घरात जावून, देव्हाऱ्यात पाया पडून दूध पिण्यास देतात. नवऱ्याचे उष्टे दूध पिण्यास देतात.

नंतर नवरा-नवरीला शेतात नेऊन काम करताना दाखवितात. उदा. पेरणी आहेत. नवरा पेरण्यास शेतावर गेला आहे. नवरी नवऱ्याची न्याहरी घेवून शेत अशाप्रकारे दोघांची ओळख करुन देतात. नंतर बायका गाणी म्हणतात.

उदा. खारकीतला राघोबा खारीक कसा कोरीतो ? ॥१॥
घोड्यावरच्या विठ्ठलरावाची चौरी कशी डुलते ? ॥२॥
पालकीतल्या रुक्मीणीबाईचा पदर कसा झळकतो ? ॥३॥
बदामातला राघोबा बदाम कसा कोरीतो ? ॥४॥

घोड्यावरल्या विठ्ठलरामा चौरी कशी डुलते ? ॥५॥

ओळख नसलेल्या व्यक्ती जवळ आल्यानंतर, प्रत्येकजण आपली छाप त्या पडावी अशा हेतूने; दोघेही चांगले कपडे घालून चांगले दिसावयाचा प्रयत्न नवरा-नवरी एकमेकांकडे चोरुन पाहतात. आपणास खूप प्रयत्नाने हा साथीदार आहे अशी भावना असते. नवऱ्यास ती रुक्मीणी वाटते. आणि नवरीस तो किंवा श्रीकृष्ण वाटतो. या गाण्यातून शृंगार वर्णन आलेले आहे.

घरशिरणी

घरशिरणी ही मुलीकडे असते. लग्नानंतरचा पहिला बाजार यालाच म्हणतात. जुन्य मुलीच्या घरी घरशिरणीस गेल्यावर, नवऱ्याने नवरीच्या घरातील कोणत्याही वस्तू लावल्यास ती वस्तू त्यास देत असत. परंतु आजच्या काळात मात्र असे दिसत आता मात्र मुलीचे वडिल नवरानवरीला भरपूर कपडे व नवऱ्याच्या आईवडिलां पूर्ण आहेर करतात. सर्वांना जेवण देतात. नवरदेवाला आहेर चढवतात. तेव्ह नवरदेव रुसतो. तो रुसल्यानंतर नवरीच्या आईवडिलांचे काही द्यावयाचे राहिले तर ते देतात. किंवा एखादा खुषीने काही देतो. नंतर नवरदेवाला आहेर चढवले जातात.

घरशिरणीच्या वेळेस श्रीकृष्णादेव वाटी, तांब्या, आरती कमीत कमी पा भांडी देतात. पण नवरीचा बाप श्रीमंत असेल तर संसारास लागणाऱ्या अनेक वस्त देतात. नंतर नवरदेवाच्या घरी येतात.

परतीची घरशिरणी

परतीची घरशिरणी म्हणजे नवरीच्या आईवडिलांना बोलावून आणतात. त्यांना नवऱ्य लोकदेखील पूर्ण आहेर करतात. जेवण करतात. अशा प्रकारे घरशिरणीचा कार्यक्र पाडतात.

वार

लग्न झाल्यानंतर आठवड्यातून दोन वार पाळतात. ते म्हणजे बुधवार व शनिव दोन दिवशी नवरा-नवरीची पूजा करतात. लग्नमंडपास सारवून रांगोळ्या घालतात. नवरदेवास मळवट भरतात. वाराच्या दिवशी नवरा-नवरी हळद खेळतात. नावे मांडवाला शेवयाचा नैवेद्य दाखवतात. मांडवातील चार खांबांना रांगोळ्या काढतात. वेळेस मंडपात दिवा लावतात. हे सर्व पाचवारापर्यंत चालते. पाच वार झा मांडव उतरवितात. त्या दिवशी आंबील, खिचडा, फळे, डाळ हे करुन मांडवाच करतात. लहान मुलांना जेवावयास वाढतात.

सत्यनारायण

लग्न झाल्यानंतर सत्यनारायण किंवा जागरण करतात. कोणी गोंधळ घालतात.

देवाला जातात

गोल्ला, गोल्लेवार जमातीत नवरा-नवरी पाया पडण्यास खंडोबाला जातात. तर कोणी म महादेवाला जातात. कोणी कोणी कोठेही जात नाहीत. कोणी बालाजीला जातात. काळी मुलगी वयात जरी आलेली असली तरी पाच वार होईपर्यंत ते एकत्र नसत. परंतु आता लग्न झाल्यानंतर सत्यनारायण केल्याबरोबर एक होताना दिसून येतात.

डोहाळेजेवण

मुलीच्या माहेरचे लोक म्हणजे तिचे आई-वडिल डोहाळेजेवण देतात. त्यावेळी या जो नवीन कपडे घेतात. त्याचप्रमाणे सासू-सासरा, व घरातील इतरलोकांना ऐपतीनुसार घेतात. मुलाकडील लोकांनाही कपड्यांचा आहेर देण्याची काही ठिकाणी पद्धत माहेरचे जेवण म्हणजे आंबट भात, गोड भात, धपाटा (ज्वारी, तिखट, मीठ केलेल्या भाकरी), लिंबाचे लोणचे, कोंदीच्या भाकरी (तिळाचे कुट किंवा हावरी केलेल्या भाकरी), आंब्याचे तक्कू (आंबा किसून केलेला पदार्थ), तेलट्या (तेल ला पोळ्या), कडबोळी, भजी आदि पदार्थ आणतात आणि सर्व लोकांना हे पदार्थ व डोहाळेजेवणाचे वेळी जवळचे सर्व नातेवाईक जेवण घेऊन येतात. झंपरसाठी कापड (ब्लाऊ टॉवेल टोपी, चोळी, करदोड, पाच कानवले, ओटीसाठी गहू, खोबरे, खारीक, सुपारी, बदाम, तांदूळ अशा वस्तूचा त्यात समावेश असतो. त्यांनी आणले पदार्थ सर्वांना वाटतात. त्यानंतर मुलीला माहेरी घेऊन जातात. इतरांप्रमाणेच मुलीचे बाळंतपण मुलीच्या माहेरीच होते.

गोल्ला, गोलेवार समाजात इतर समाजाप्रमाणे, मुलगी झाली तर तेवढासा उत्सव करीत नाहीत. मुलगा झाला तर सर्वांना आनंद होतो. मुलाच्या किंवा जन्मानंतर गावच्या ब्राह्मणाकडून त्याचे जन्मनाव व भविष्य जाणून घेतात.मूल जन्म बाळ-बाळंतिणीच्या संरक्षणासाठी, त्यांच्याजवळ एक लोखंडी हत्यार (विळा किंवा चा ठेवतात. वाळवंटाची सोल (गाईच्या शेपटीच्या केसांपासून तयार केलेला सोल) विळा किंवा लोखंडी हत्यार ठेवल्याने भुताखेतापासून धोका टळतो.

मूल जन्मल्याबरोबर त्याच्या अंगावर थंड पाणी टाकतात आणि थाळा व अशा प्रकारे त्या मुलाला जाग आणतात. पाचवीच्या दिवशी नऊ घागरी, म्हणून पूजातात. त्यात पाच प्रकारचे नैवेद्य व दिवे लावतात. त्याखाली कापड त्यावर ज्वारी, तांदूळ ठेवतात. त्या विळ्यावर काजळ धरतात. असा विधी दिवशी करतात. जवळजवळ तसाच विधी नवव्या दिवशी केला जातो.

बारा दिवसांनंतर विटाळ काढतात. वीस दिवसानंतर काकण (बांगड्या) बारा दिवसानंतर केव्हाही बाळाचे नाव ठेवण्याचा कार्यक्रम केला जातो. नाव दिवस हा आनंदाचा दिवस मानला जातो. त्यावेळी जवळचे नातेवाईक, शेजा

यांना बोलावले जाते. एखादा शुभदिवस पाहून आयावायांना बोलावून मुलाचे नाव जाते. गावाला साखर वाटण्यात येते. या समाजात जन्मोत्सव म्हणजे पाचवी असाच आहे. त्यामुळे जन्मोत्सवाचे सर्व सोहळे त्याचदिवशी होतात. त्या गाण्यामध्ये पाळणे व श्रीकृष्ण जन्माची गाणी म्हणण्याची चढाओढ लागते. ल जणू काही श्रीकृष्णाचा अवतार आहे. लहान मुले (साती असरांशी) आणि अन्य बोलतात. असा संकेत नांदेड भागातील गोलेवार लोकांमध्ये रूढ आहे.

सव्वा महिन्यानंतर आड (विहीर) पूजा करतात. त्याचवेळी खडे, हरभऱ्या गूळ ह्यांचा उपयोग करतात. बाळंतिणीची पूजा करतात. आडाहून येताना तांब्य भरुन आणतात. बाळंतिणीला त्या पाण्याने अंघोळ घालतात.

जन्मोत्सवाच्या वेळी जी गाणी म्हणतात त्यापैकी एक गाणे पुढे देत आहे.

"एक महिना झाला हो सासऱ्या ।
चंद्रशोभेहून आणावे उसऱ्या ।
जू बाळा जू जू रे ॥
दोन महिने झाले हो सासू ।
इंद्रसभेत जाऊन बसू ।
जू बाळा जू जू रे ॥" '३१'

अशाप्रकारे त्या ओव्या असतात. त्यात वास्तविक पाहता 'श्रीमंत बाईच्या' बाळंत त्या समाजातील सर्वसामान्य स्त्रीच्या बाळंतपणाचेच वर्णन असते. तो त्या स लोकमानसाचा आविष्कार असतो. बाळंतीण घरात असली की सगळ्यानाच जुंपून घ्यावे लागते. जन्मलेल्या मुलाला किसन देवासारखे सजविण्याचे या स्त्रिय चाललेले असतात. प्रत्यक्ष घरात अठराविश्वे दारिद्रय असले तरी गाण्यातून व त्या श्रीमंतीची हौस पुरवून घेतल्याशिवाय राहत नाहीत.

पाळणे

"बाळा जो जो रे कुलभुषणा । श्रीनंदना ।
निद्रा करि बाळा । मनमोहना । परमानंदा कृष्णा । बाळा" '३२'

अशा प्रकारे पाळणे गाईले जातात. या पाळण्यातून, श्रीकृष्ण नंदाच्या घरी व त्याचा मोठेपणा वाढला आहे. श्रीकृष्ण हा मथुरेत जन्मला परंतु तो गोकुळातच व सर्व गवळणी आनंदित झाल्या.

याप्रमाणे गोलेवार जमातीत पाळणागीते म्हणून मुलाचे नाव ठेवतात. गोलेव ही तशी आर्थिकदृष्ट्या गरीब जमात आहे. या जमातीतील मुले लहानपणी दुधावरच जगतात. पण आईलाच भरपूर अन्नदेखील मिळत नसल्यामुळे मुलांना पं दूध मिळत नाही. तेव्हा लहानमुलास शिळी भाकरी, चटणी असे शिळेपांके अ

जीवन जगावे लागते. खेळण्याची साधनेही नसतात. अगदी लहानपणापासून मुलांना सांभाळणे, पाठच्या भावंडांची काळजी घेणे हीच कामे करावी लागतात.

आंदण

आंदण म्हणून कोणी मुलीस गाय देतात. कोणी लग्नातच देतात. तर कोणी मूल झ देतात. त्या लहानमुलास दुध पिण्यास गाय देतात. ही पध्दत आजदेखील चालू आहे.

विधवा विवाह

गोल्ला, गोलेवार समाजात विधवा विवाह होतात. तरुणांची लग्ने जसे कुमारिकांश योग्य आहे. तसेच विधुरांशी लग्नेही विधवांशी होणे योग्य आहे. जुन्याकाळी हे पाळीत असत. पण आजच्या काळात मात्र विधुरांशी लग्ने कुमारिकांशी होताना आतापर्यंत विधवांशी लग्न तरुण मुलाबरोबर म्हणजे अविवाहित पुरुषाबरोबर होत पण आजच्या काळात बऱ्याच ठिकाणी अशी लग्ने झालेली दिसतात.

सोडमोकळिक वा घटस्फोट (फारकत)

गोल्ला गोलेवार समाजात सोडमोकळीक होतात. आजपर्यंत स्त्रीपुरुषांच्या मनावर समाजाचे, विवाहसंस्थेचे पवित्र बंधनाचे जे संस्कार होते. ते आता बहुतांशी कमी आहेत. आजच्या स्थितीमध्ये स्त्रीपुरुष ह्या दोघांचे स्वभाव परस्पर जुळण्याजोगे तरच ते चांगल्याप्रकारे एकत्र राहतात. धार्मिक संस्कारांमुळे पूर्वी जशी समाजा बसली होती तशी आज बसणे शक्य नाही. आज काम, शांती, प्रजोत्पादन, कौटुंबिक सौख्य याकरिताच विवाह आहे. अशा समजुतीने स्त्री-पुरुष शक्य तो स राहतील पण स्वभावधर्म भिन्न असल्यास आणि इतरबाबींमध्ये साम्य नसल्यास जमत नाही. त्यामुळे सोडमोकळीक घेणे योग्य आहे.

स्त्री-पुरुष एकत्र आल्यास, त्यांच्या विचारसरणीत भिन्नता असेल तर राहू शकत नाहीत. काही पुरुषदेखील वाईट असतात. स्त्रीला त्रास देतात. त सासू, सासरे, दीर, नणंदा त्यांच्या त्रासाला कंटाळून स्त्रिया सोडमोकळीक घेतात.

काही स्त्रियादेखील खूप भांडखोर, चिडखोर असतात. पुरुषांकडून जस त्रास होतो. त्याचप्रमाणे काही भांडखोर बायका नवऱ्यांना ही छळतात. त्या लग्ने मोडतात.

साधारणतः गोल्ला, गोलेवार जमातीत जात पंचायतीमुळे जास्त काडीमोड हो नाहीत.खालील कारणानुसार काही घटस्फोट (काडीमोड सोडमोकळीक) होतात.

१. नपुंसकत्व.२. धर्मांतर.३. कायमचा त्याग.४. संन्यास.५. महारोग.६. कामाचे वेड अतिरेक).७. खूप छळ.८. एकमेकाला न आवडणे. '३३'

उल्लेख दोन संदर्भ टीपा :-

१. परिसरातील लोकगीते : पार्वतीबाई संभाजीराव आयतलवाड, वंजरवाडी ता. उद्‌गीर जि. लातूर

२. सह्याद्रीतील आदिवासी : डॉ. गोविंद गारे, स्वाध्याय प्रकाशन. मुंबई. प्र ६९. महादेव कोळी

३. परिसरातील मुलाखती : खंडेराव संगमकर गुरुजी., हॉटेल वेस, देगलूर नांदेड.

४. मुलाखती : बाळ रेणके, मुंबई यांच्याकडून

५. परिसरातील मुलाखती :खंडेराव गुरूजी,केत्तालवाड,रामजी बायेबाड,बाबुराव चि

६. परिसरातील मुलाखती :- खंडेराव संगमकर गुरुजी. हॉटेल वेस, देगलूर, नांदेड.

७. परिसरातील मुलाखती :- संभाजीराव आयतलवाड, रामजी आयतलवाड, मु. वंजरवाडी ता. उद्‌गीर, जि. लातूर

८. नवा हिंदू धर्म :- प.म. दिवेकर पृ. २६९ 'हिदुत्व दिपक मिरज'

९. परिसरातील मुलाखती :- दशरथ यादव. छावणी औरंगाबाद, दत्तू सकने भिंगार अहमदनगर. सोनू यादव, नागन्ना यादव, रामन्ना यादव. मालेगाव. शंकरराव यादव पुणे. माधवराव यत्म् मुंबई.

१०. नवा हिंदू धर्म :- प.म.दिवेकर. हिंदूत्वदिपक,मिरज

११. मुलाखत : सायनलू लच्छन्ना कलन्ना यादव, मालेगाव कॅम्प जि. नाशिक,वय ८५ वर्षे,अशिक्षित.

१२. परिसरातील मुलाखती :- खंडेराव गुरुजी देगलूर, संभाजी आयतलवाड, कोंडीबा गुडाजी फांजेवाड, वायगाव ता. अहमदपूर लातूर.

१३. परिसरातील लोकगीते :- राजाबाई मा. घंटेवाड खेरकावाडी.मुखेड नांदेड. राजाबाई दत्तात्रय घंटेवाड,खेरकवाड, मुखेड, नांदेड.

१४. परिसरातील लोकगीते :- अहिल्याबाई मुल्लना. खेरकवाडी, मुखेड, नांदेड. लक्ष्मीबाई व्यंकटी नुकुलवाड, वंजरवाडी, ता.उद्‌गीर,जि.लातूर.

१५. परिसरातील मुलाखती :- रामजी आयतलवाड, रामराव केन्नलवाड

१६. परिसरातील मुलाखती :- नारायण संभाजी शिरबतलवाड, बाबाराव संभाजी शिरबतलवाड खेरकवाडी ता. मुखेड जि, नांदेड.

१७. परिसरातील लोकगीते :- मारुतीसाव पाळेकर, पाळा ता. मुखेड नांदेड.

१८. परिसरातील लोकगीते :- लक्ष्मीबाई व्यंकटी नुकुलवाड, वंजरवाडी ता.उद्‌गीर जि.लातूर.

१९. परिसरातील मुलाखती :- नुकुलवाड पुंडलीक हनुमंतराव., वंजरवाडी, संभाजीराव रामजी ता. उद्‌गीर जि.लातूर.

२०. परिसरातील लोकगीते :- राजाबाई मारुती घंटेवाड., खेरकवाडी,

२१. परिसरातील लोकगीते :- राजाबाई दत्तात्रय घंटेवाड., ता. मुखेड जि.नांदेड.

२२. परिसरातील लोकगीते :- सौ. शकुंतला धोंडीराम आयतलवाड., वंजरवा ता.उद्‌गीर जि.लातूर.

२३. परिसरातील लोकगीते :- लक्ष्मीबाई व्यंकटी नुकुलवाड., वंजरवाडी त जि.लातूर.

२४. परिसरातील मुलाखती :- खंडेराव संगमकर, गुरूजी., देगलूर,जि.नांदेड

२५. परिसरातील लोकगीते :- राजाबाई मारुतीराव घंटेवाड., मु.खेरकवाडी जि.लातूर.

२६. परिसरातील लोकगीते :- लक्ष्मीबाई व्यंकटी नुकुलवाड., वंजरवाडी ता.उद्‌गीर जि.लातूर.

२७. परिसरातील लोकगीते :- रंजना बालाजी नुकुलवाड., वंजरवाडी ता.उद्‌गीर जि.लातूर

२८. परिसरातील लोकगीते :- राजाबाई मारुतीराव घंटेवाड., मु.खेरकवाडी ता.मुखेड,नांदेड.

२९. परिसरातील लोकगीते :- राजाबाई मारुतीराव घंटेवाड., मु.खेरकवाडी ता.मुखेड,नांदेड.

३०. परिसरातील मुलाखती :- लक्ष्मीबाई व्यंकटी नुकुलवाड, पार्वतीबाई संभा आयतलवाड, मु.खेरकवाडी, ता.उद्‌गीर जि.लातूर

३१. परिसरातील लोकगीते :- रुख्मीणीबाई दामोदर आयतलवाड. मु.वंजरवाडी, ता.उद्‌गीर,जि.लातूर

३२. परिसरातील लोकगीते :- रुख्मीणीबाई दामोदर आयतलवाड. मु.वंजरवाडी,ता.उद्‌गीर,जि. लातूर

३३. परिसरातील मुलाखती :- खंडेराव गुरुजी देगलूर, नांदेड.,बाबाराव बाचेराव. चिखली, कंधार, नांदेड., रामजी संतोष आयतवालवाड. ता.उद्‌गीर जि.लातूर.

.उल्लेख तीन (अ)

गोल्लांचे सांस्कृतिक जीवन

गोल्ला जमातीत वारा पोटजाती दिसून येतात. हे सर्व लोक खंडेराव देवतेस मानत मे मुसलमान पीरांना देखील मानतात. गोल्ला लोक मुळात तेलगू भाषिक अस महाराष्ट्रात स्थायिक झाल्यापासून हे मराठी झालेले आहेत. घरामध्ये मात्र तेलगू दिसून येतात. वृक्ष, प्राणी, यात देव पाहण्याची भारतीय दृष्टी स्वाभाविकपणे आहे अशी दैवते पहावयास मिळतात. यांचा सणोत्सवातील वेगळेपणा हा त्यांच्या आला असावा, असे म्हणता येईल.

वृक्षपूजा

वड, पिंपळ, रुई, तुळस, बेल इ. वृक्ष, वनस्पती इत्यादींची पूजा करतात.

प्राणीपूजा

१.गायी-बैलांची पूजा:- गोधन ही गोल्लांची खरी धनलक्ष्मी. गायी-बैलांची पूजा ते बैलपोळादेखील मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. सर्वसामान्यत: सबंध महाराष्ट्रा पध्दतीने बैलांचा पोळा साजरा केला जातो त्याच पध्दतीने या जमातीत श्रावणी साजरा केला जातो.

२. वसुबारस : त्यादिवशी गायी-गोऱ्हाची पूजा करण्याची प्रथा आहे. येथून सुरु होते. गायी-गोऱ्ह्याची गाणी म्हटली जातात व दिव्यास तेल घरोघर मागतात. जनावरास गाणी म्हणत ओवाळतात.

"दिन दिन दिवाळी, गायी म्हशी ओवाळी
गायचा चारा बैल मोरा
बैल कुणाचा लक्ष्मणाचा
लक्ष्मण कुणाचा आईबापाचा
देगं माई पळीभर तेल
तेल नाही चावडीत जाय

चावडीत नव्हती निळी घोडी
लाथा मारी फडाफडी''



तशाच गाईच्या ओव्या त्या दृष्टीने लक्षणीय आहेत.

''आमची कामुणी गाय बरी हो
आम्ही चारीत गंगथडी
आमच्या कामुण्या गाईची पाठ
तशी सोलापूरची वाट
आमची कामुणी गाय बरी हो
आम्ही चारीत गंगथडी
आमच्या कामुण्या गाईच शिंग
तसं महादेवाचं लिंग
आमुची कामुणी गाय बरी हो
आम्ही चारीत गंगथडी
आमुच्या कामुण्या गाईचे डोळे
तसे लोणियाचे गोळे'' '२'

अशा प्रकारे गाईची पूजा करतात. गाय कशी आहे? याबद्दल अनेक उपमा देऊन गायीचे वर्णन करतात.

२. कुत्र्याची पूजा

गोल्ला, गोलेवार जमातीत कुत्र्याला खंडेरायाचा आवतार मानतात. परंतु त्याचा स्वतंत्र उत्सव नाही. सटीला, पोळ्याच्या दिवशी कुत्र्याची पूजा करतात. काहीलोक कुत्र्याची मूर्ती करुन बसवितात आणि त्याला 'वाघ्या' मानले जाते. सटीच्या दिवशी सर्व भक्त कुत्र्याची भक्तिभावाने पूजा करतात. कुत्र्याची पूजा केल्याशिवाय त्या दिवशी कोणी जेवण करीत नाहीत. कुत्र्यावर भंडार टाकतात. पुढील गीतात ही श्रद्धा व्यक्त झाली आहे.

मी भंडार घरचा कुत्रा मी हैवान
मजवर दया असू द्या दुरुन
तुम्ही देवा करुन ठेवा पेठामध्यी खराटा
म्या मार्ग पाठवीन तुमच्या चारी वाटा
या भंडार देवा तुमचा पुरवठा

मोत्याचे पीस पालखीला गोंडा
देवा तुम्ही नित्य वारी मल्हारी
देवा तुम्ही नित्य वारी मल्हारी '३'

३. नाग

नाग या देवतेची नागपंचमीच्या सणाला स्त्रीया मोठ्या भक्तीभावाने पूजा करतात. नागदेवतेच्या अनेक लोककथा आहेत. भाऊ नसणाऱ्या बहीणचा भाऊ म्हणून नाग जातो तिला माहेरला घेऊन येतो. अशा अनेक कथा प्रचलित आहेत. खंडोबा, मस्नेर, म्हैशमा, श्रीकृष्ण आदी देवता गोल्ला जमाती सर्वसाधारणपणे महत्त्वपूर्ण मानतात.

१. खंडोबा

वाघ्या खंडोबाची भक्तीभावाने पूजा करतो. महापूजा आठवड्यातून एकदा रविवारी असते. स्नान करुन पूजा केल्याशिवाय वाघ्या जेवण घेत नाही. इतर लोकांना रविवारचे दूध देत नाहीत. रविवारचे सकाळचे दूधदेखील खंडोबाला नैवेद्य म्हणून ठेवतात. रात्रीच्या वेळेस ते सर्व दूध घरातील माणसे पितात किंवा खातात.

गोल्ला जमातीचे लोक अनेक देवदेवतांची पूजा आणि भक्ती करीत असले, तरी खंडोबा हेच त्यांचे कुलदैवत आहे. प्रत्येक कुटुंबातील एक मूल खंडोबाला सोडलेले असते. मात्र वाघ्या म्हणून सोडल्यावर तो त्याच घरात रहातो. घराचा एक घटक म्हणूनच पुढचे जीवन जगतो. खंडोवाला सोडलेल्या मुलाला व भटक्याचे जीवन जगणाऱ्या वाघ्याला 'दारवाघ्या' म्हणतात. देवाला वाहिल्यानंतरही घरीच राहून इतर व्यक्तीप्रमाणे जीवन जगणाऱ्यास 'घरवाघ्या' असे म्हणतात. गोल्ला जातीत प्रत्येक कुटुंबातून देवाला वाहिलेला वाघ्या हा 'घरवाघ्या' असतो. घर न सोडता खंडोबाचा भक्त म्हणून इतरांसारखेच जीवन जगतो. देवाला नवसाने वाहिलेल्या मुली मात्र खंडोबाशी लग्न लावून 'मुरळी' म्हणून जीवन जगत असत. क्वचित वाघ्या-मुरळीचे लग्न होते ह्या प्रकाराला 'झुलवा' म्हणतात. आता मुरळी सोडण्याची प्रथा कायद्याने बंद झाली आहे. समाजातूनही या रुढीचे पूर्णपणे उच्चाटन होत आहे.

गोल्ला जमातीत वाघ्या सोडण्याचा विधी

गोल्ला जमातीत वाघ्या सोडण्यसाठी शुभकाळ म्हणून साधारणपणे चैत्र व वैशाख हे महिने मानतात. काही कुटुंबात वाघ्या लग्नाच्या एक दिवस अगोदर सोडतात. कारण आर्थिकदृष्टीने विचार करूनच लोक हे दोन्ही विधी (लग्न व वाघ्या सोडणे) एक दिवसाच्या फरकाने करतात.

वाघ्या सोडण्याचा विधी लग्नासारखाच असतो. पण यात नवरी नसते. हळदीचा मांडव घालतात. नवरदेवाप्रमाणे वाघ्याच्या अंगाला हळद लावतात. पांढऱ्यारंगाचे नवीन

कपडे परिधान करतात. नातलग, वाघ्ये व गावातील लोकांना जेवणाचे आमंत्रण देतात. तर काही लोक चहापानावर हा विधी उरकून घेतात. हा विधी रात्रभर चालतो.

वाघ्या बनणारा मुलगा वयाने पाचवर्षापेक्षा मोठा असावा लागतो. असा संकेत आहे. मुलाच्या लग्नाच्या अगोदर वाघ्या सोडला पाहिजे. पूर्वी हा विधी पाच दिवस चालत असे. हल्ली मात्र हा विधी एक रात्रीत आटोपता येतो.

या विधीसाठी गावातील इतर वाघ्ये येतात. मग ते कोणत्याही जातीची असोत. वाघ्याच्या जातीतील सर्व लोक या विधीसाठी पाहुणे म्हणून जमतात. यावेळी अगदी डाळ-भात व भाकरी असे साधे जेवण देतात. जर एखाद्याची चांगली स्थिती असेल तर तो चांगल्या प्रकारचे जेवण देतो. रात्री सर्वांची जेवणे झाल्यावर हळद लावतात. त्यावेळी खंडोबाची गाणी म्हणतात.

"मैलारचा खंडोबा जागरणाला या
जेजूरीचा खंडेराया जागरणाला या
माळेगावचा खंडेराया जागरणाला या
सातारच्या खंडोबा जागरणाला या '४'

या सर्व वाघ्यामध्ये एक प्रमुख वाघ्या असतो. तोच सर्व व्यवस्था करतो. इतर वाघ्ये त्याला मदत करीत असतात. यावेळी मांडव घालतात. मांडवाच्या दिवशी पट भरतात. पट भरत असताना अनेक वस्तू लागतात. त्यात नारळ, लिंबू, खिसमस, सुपारी, बदाम हे साहित्य पूजेसाठी घेतात. ज्या मुलाला वाघ्या म्हणून सोडायचे आहे त्याला देवघरात बसवून मंत्र म्हणतात. त्यांना पाटापर्यंत आणतात. त्यावेळी तो 'संचारित' असतो. त्यावरुन लिंबू, नारळ फोडून 'येळकोट येळकोट जय मल्हार' असा खंडोबाचा जयजयकार करतात. खंडोबाला प्रसन्न करुन घेण्यासाठी वाघ्या होऊ पाहणाऱ्याच्या आर्थिक ऐपतीनुसार हा विधी केला जोतो.

वाघ्ये लोक नैवेद्यासाठी काही तांदूळ मोजून घेतात. त्या तांदूळाची पूजा करुन मंत्र म्हणतात. पुन्हा ते तांदूळ मोजतात. त्यातून जास्त तांदूळ काढून आणतात. सर्व वाघ्ये रात्रभर खंडोबाची गाणी म्हणतात. पहाटे नैवेद्याचे साहित्य येऊन मारुतीच्या मंदीराजवळ असलेल्या वेशीत ऊद घालतात. तेथे मारुतीच्या पारावर पुन्हा गीताचा कार्यक्रम होतो.

वाघ्याला मारुतीकडे नेताना नवीन पांढरे कपडे घालतात. हळद लावतात. त्यांच्या गळ्यात कातड्याची पिशवी असते. त्यात भंडारा असतो. भंडारा उधळून ते खंडोबास वाघ्या मुलाचा स्वीकार करण्याची विनंती करतात. 'जय खंडेराया' "येळकोट येळकोट शिवा मल्हारीचा येळकोट" अशी सर्वजण गर्जना करतात आणि या विधीची सांगता

होते. वाघ्या गुरु त्यांना उपदेश करतो की, गाईची पूजा करावी ब्राम्हणांना दान द्यावे, निस्वार्थीपणे वागावे, खोटे बोलू नये, खंडोबाची पूजा करावी. गुरुचा शब्द पूज्य मानावा, आईवडिलांची सेवा करावी.

वाघ्याला वाजतगाजत मारुतीकडून आणत असतात. वाघ्या म्हणून सोडावयाचा जो मुलगा असतो तो बेहोश असतो. कारण मंत्र आणि हळद ऊदाच्या धुरीने त्याची शुध्द गेलेली असते. नारळ फोडून जयजयकार करतात. "खंडोबाचा येळकोट येळकोट जय मल्हारी, शिवा मल्हारी" असा जयघोष चालू असतो.'५'

आंध्र सीमेलगत असलेल्या मराठवाड्यातील बिलोली, देगलूर या तालुक्यात वाघ्या सोडण्याच्या वेळी म्हटला जाणारा मंत्र हा तेलगू भाषेत असतो तो पुढीलप्रमाणे :-

"हारा हारा गुगलागू पोग लुतागी देवडा
गुब गुब रसिनो पेसाखी पोगुलू तागी देवडा
मडलम लेपीने समरानी पोंगालू तागी देवडा
समलोकम यलकोनम देवडा" '६'

गोल्ला जमातीत वाघ्या सोडतेवेळी आणखी एक मंत्र म्हणतात. तो असा -
"शिव शिव नदलतू देवडा शिवनी कुमरा, पार्वती
पाटलाम गदीदी देवडा" तर कोणी पुढील प्रमाणे सांगतात.
"शंकर शंकर यामध्ये वास्तव्य केलेला खंडोबा, हा शंकराचा अवतार खंडोबा. हा श्रीकृष्णाचा अवतार खंडोबा हा शंकराचा पुत्र आहे. खंडोबाच्या नावाने जयजयकार करतात. वाघ्ये वेष बदलतात. कधी गवळणीचा वेष धारण करतात. ताक, दूध, दही घेऊन नाचत खंडोबाची गाणी म्हणतात. तेच गाणे पुन्हा पुन्हा म्हणण्याची विनंती लोक वाघ्याला करतात. त्याबद्दल त्याला दक्षिणा देतात. अशाप्रकारे करमणूकीचे कार्यक्रम वाघ्ये करतात. गाण्यातून ज्याने पैसे दिले त्याचे नाव या गीतातून म्हणतात. ते हाताच्या बोटाच्या खुणांवरुन नावे ओळखतात. त्यांच्या गळ्यात सात, नऊ, अकरा, कवड्याच्या कंठा घालतात." '७'

महाराष्ट्रातील वाघ्यांचा नेमका असा वेष नाही. वेगवेगळ्या भागात वेगवेगळे पोषाख दिसतात. कर्नाटकातील वाघ्ये परंपरेप्रमाणे पोषाख वापरतात. खांद्यावर घोंगडी असते. भंडारा ठेवण्यासाठी गळ्यात वाघ्याच्या कातडीची पिशवी असते. तर देगलूर भागातील वाघाचा पोषाख वेगळा असतो. ते लाल, निळे, पिवळे या रंगाचे कपडे वापरतात. त्याला जरीची किनार असते. त्याच्या गळ्यात हरणाच्या किंवा वाघाच्या कातड्यांच्या पिशवीत भंडारा असतो. हे वाघ्ये तेलगू भाषेतून खंडोबाचे नामस्मरण करतात. गाणी

गातात, कथा सांगतात.

वाघ्याजवळ शंख, त्रिशूळ, डमरु इ. वस्तू व त्यांच्या हातात घाट्यांचा घोळ असतो. खंडोबाची वारी असताना वाघ्या या सर्व साधनांनी सिध्द असतो.

गोल्ला जमातीत वाघ्या सोडल्यानंतर त्या नवीन वाघ्याला गुरु उपदेश करण्यासाठी त्यास सर्वात जास्त मानधन देतात. वाघ्यास दक्षिणा म्हणून एकशे एक, एक्कावन्न, एकवीस, अकरा रुपये दिले जातात. गुरु वाघ्यास सर्वात जास्त दक्षिणा देतात.

गोल्ला वाघ्यांमध्ये एक दोनच 'गुरुवाघ्ये' दिसून येतात. कोंडलवाडी, देगलूर, गादेवाडी येथे गुरुवाघ्ये दिसून येतात. हे लांबच्या गावांना जात नाहीत. वाघ्ये आपल्या जवळील कोणत्याही जातीतील म्हणजे गोंधळी, धनगर वाघ्यांना गोल्ला जातीचा गुरु मानतात. गोल्लांचा गुरुवाघ्या नसेल तर गोंधळी धनगर या वाघ्यांना बोलवातात. '८'

महाराष्ट्रात वाघ्याचे दोन प्रकार दिसून येतात.

१. दार-वाघ्ये २. घर-वाघ्ये

१. दार-वाघ्ये :-या वाघ्यांनी दारोदार भिक्षा मागून खाण्याची दीक्षा घेतलेली असते. जागरण घालणे, लंगर तोडणे ही त्यांची विशेष कामे होत. त्या ठिकाणी नवीन वाघ्ये सोडण्यास, वाघ्यांना दीक्षा देण्यास ते मदत करतात. खंडोबाची गाणी म्हणून वारी मागतात.

"मल्हारी नित्य मागतो वारी
स्वर्णाअधिरा पहिली वारी दे मंदिरी
म्हाळसाच्या घरी रत्न अडविले
गोमटी स्वर्णाच्या ताटी रत्न अडविले
मोती घ्या देवा दुसरी वारी रे ॥ '९'

१. दार वाघ्ये

खंडोबाचे जागरण विधी करतात. तसेच ते शकूनही पाहतात. आजाराला योग्य असे औषध देतात. उदा. भंडार अंगावर टाकल्याबरोबर आजार कमी होतो. काही वनस्पतीची औषधे देतात. भंडार लावून खंडोबाच्या नावाचा जयजयकार करतात. खंडोबाची गाणी गाऊन नामस्मरण करतात. गोल्ला जमातीत दार वाघ्याचे प्रमाण कमी आहे.

२. घर वाघ्ये

हे वाघ्ये 'वारी' मागत नाहीत. गोल्ला जमातीत हे वाघ्ये मोठ्या प्रमाणात आहेत. हे नवसाचे नसतात. प्रत्येक घरातून एक वाघ्या असतो. कुटुंबातील सर्वात मोठा मुलगा वाघ्या असतो. परंतु खंडोबाची यात्रा आणि सटीच्या महिन्यात पाच रविवारी खंडोबाच्या नावाने वारी मागतात. सटीच्या दिवशी बाजरीची भाकरी, वांग्याचे भरीत नैवेद्य करतात.

जागरणाच्यावेळी घर वाघ्ये व दार वाघ्ये एकत्र येतात. घर-वाघ्यांना जागरण करता येत नाही. फक्त ऐकण्याची भूमिका करीत असतात. घर-वाघ्ये घरातील सर्व कामे करुन आपली उपजिविका चालवतात. वडिलोपार्जित व्यवसाय करतात. काहीजण मजुरी करतात. अशापद्धतीने ते आपला उदरनिर्वाह करतात.

गोल्लांची दैवते आणि उत्सव

या दैवतकथा म्हणजे त्या देवताचे जयग्रंथच म्हणावे लागतील. या देवतांचा उल्लेख निरनिराळ्या गाण्यातून केला जातो. गाण्यांची रचना मात्र सारखी असते.

उदा. पाव पाव रे खंडेराया
तुझा गोंधळ घालीन मी
पाव पाव रे देवा तुला
भंडार वाहीन मी '१०'

खंडेरायाची सर्व भक्तगण मोठ्या आदराने पूजा करतात. तसेच मुरळी या गीतातून खंडेरायाला भेटण्याची इच्छा प्रकट करते.

''या जलमात सये जेजूरी करावी
नऊ लाखाची पायरी बाई ध्यानात धरावी
जेजूरी गडावर आरोळी कुणी दिली'' '११'
अशा प्रकारे खंडोबाची पूजा करतात.

वाघ्या सोडण्याची वेगळी पध्दत

औरंगाबाद परिसरात गोल्ला समाजात वाघ्या सोडण्याची पध्दत वेगळी दिसून येते. वाघ्या सोडावयाचा असल्यास एक दिवस अगोदर वाघ्याला बोलवितात. 'वाघ्या सोडणे' या कार्यक्रमाला 'वगडू' असे म्हणतात.

वाघ्या सोडण्याच्यादिवशी ज्याला वाघ्या म्हणून सोडावयाचे आहे त्याला हळद लावून वाजतगाजत नदीवर घेऊन जातात. त्यांच्याबरोबर आलेले पाहुणे असतात. तसेच गावातील चौधरी, भंडारी हे मानकरी असतात. त्याचप्रमाणे दुसऱ्या गावाहूनदेखील वाघ्यांना बोलावतात. ह्या वाघ्याला नदीकडे नेत असताना त्यांच्या हातात चाकू असतो. प्रत्येक चौकात चाकूने लिंबू कापले जाते. त्याच्या डोक्यावर एक ताट असते. त्यात खंडोबाची छोटी प्रतिमा असते. सर्वजण 'शिवा शिवा मल्हारी शिवा' म्हणत नदीकडे जातात. प्रत्येक चौकात व वळणावर नारळ फोडतात व लिंबू कापतात. या कार्यक्रमासाठी

काही वाघ्ये व एक गुरु-वाघ्या आलेला असतो. नदीवर गेल्यानंतर चिखलाचा वर्तुळाकार आकार करतात. त्यात लहान लहान वर्तुळे तयार करतात. त्यात चिखलाच्याच उभ्या-आडव्या रेषा काढतात. वर्तुळात ज्या ठिकाणी उभ्या आडव्या रेषांचा जोड आलेला असतो तेथे पान, उदबत्ती, हळदीत बुडवून कापडाचे छोटे झेंडे रोवतात त्याचठिकाणी सुपारी, खोबरे, बदाम, हळद, पान नैवेद्य भाताचा एक एक गोळा,हळदी-कुंकू इत्यादी ठेवतात. प्रत्येक नैवेद्यावर एक दिवा लावतात. तो गव्हाच्या पिठाचा तयार केलेला असतो. त्या वर्तुळासमोर एक चौकोन तयार करतात. त्यात चार रंग टाकून घेतात. दिवे व उदबत्त्या पेटवतात. नंतर वाघ्ये पूजा करतात.

वाघ्या सोडण्याच्या कार्यक्रमास 'जलदी' असे ही म्हणतात. यावेळी दोन बकरे कापतात. एक बकरू जाती पंचायतीस व दुसरे बकरू नदीच्या मध्यभागी एका वारात कापतात. ते बकरू वाघ्याचे असते.

समोरच्या लहान चौकोनात चार कोपऱ्यावर नैवेद्य ठेवतात. एक मध्यभागी ठेवतात. यावेळी वाघ्ये खंडोबाच्या नावाचा जयघोष करतात. यावेळी दक्षिणा म्हणून बारा, पंधरा, पंचवीस, एकावन्न रुपये देतात. सर्व वाघ्ये मिळून ही दक्षिणा वाटून घेतात. कापलेले बकरू जात पंचायतीस मान म्हणून दिलेले असते. ते सर्व एकत्र येऊन जेवण करतात.

दुसरे बकरू नदीच्या पाण्यात मध्यभागी कापतात. ते तलवारीच्या एकाच घावात कापतात. त्याचे मुंडके नदीच्या पाण्यात सोडतात. उरलेला भाग वाघ्ये खातात. वाघ्या सोडणाऱ्याच्या घरी मात्र कोणीच त्यादिवशी मांस खात नाहीत. जातपंचायत व इतर पाहुणे ते सर्व खातात. बकरे कापल्यानंतर ही सर्व माणसे चिखलाचा वर्तुळाकार बनवलेल्या गोलाकार भागावरून ते फिरवतात. व त्यास 'जलदींचा' कार्यक्रम म्हणतात. तो वर्तुळाकार पूर्णपणे नाहीसा झाल्यावर ती सर्व माणसे चक्राकार बसून खंडोबाची पूजा करतात. त्यामध्ये चक्राकार भाग हा पूर्णपणे चिखलाचा बनवितात. ते पूर्णपणे तुडवून नाहीसा करतात.

वर्तुळाच्या समोर एका मोठ्या राक्षसाच्या आकाराची चिखलाची मूर्ती काढतात. त्याला कुंभकर्ण असे म्हणतात. त्या कुंभकर्णाच्याजवळही एक नैवेद्य, एक पान, सुपारी, खोबरे, खारिक, हळद, भात, उदबत्ती, कुंकू पिवळ्या रंगाचे झेंडे गव्हाच्या पिठाचे दिवे करून त्याच्या सर्व बाजूने लावतात. प्रत्येक दिव्याबरोबर या सर्व वस्तू ठेवतात. या चक्राकार भागासमोर चार-पाच रंगाच्या रांगोळ्या काढतात. त्यामध्ये एक 'मडकं' ठेवतात. त्याला पिवळे कापड बांधून ठेवतात. नदीच्या मध्येच हा सर्व प्रकार होतो. त्यांच्या मध्यभागी खंडोबाची मूर्ती किंवा टाक ठेवतात. चौकोनाच्या पुढच्या बाजूस नदीच्या कडेला पाण्याजवळ सात आळे किंवा हिरे करतात. त्या प्रत्येक हिऱ्याजवळ नैवेद्याचे साहित्य ठेवतात. चौकोनात एका ताटात खंडोबाची मूर्ती किंवा टाक ठेवतात. टाक

वाघ्या बनणाऱ्या मुलाच्या डोक्यावर देतात. यावेळी इतर वाघ्ये खंडोबाचा जयजयकार करतात. त्या ताटलीत सात हिऱ्याचे पाणी वाघ्ये टाकतात. त्या ताटास खूप लोक धरतात. वाघ्या बनणारा मुलगा वा त्यांच्या बरोबरचे लोक पाण्यात फिरतात. खंडोबाचे नामस्मरण चालू असते. नंतर ते ताट वाघ्या बनणाऱ्या मुलांच्या डोक्यावर देतात. त्या गोलाकार चक्राकार सर्वजण मिळून फिरतात. नंतर सर्वजण घराकडे येतात. त्या मुलांच्या अंगावर हळद टाकतात. जयजयकार करतात. घरी जाऊन त्या देवाला देव्हाऱ्यात ठेवतात. त्या वाघ्याबरोबर दुसरा एक माणूस चक्रात ठेवलेले मंडळ घेऊन वाघ्या बनणाऱ्या मुलाबरोबर सारखा पळत असतो. वाघ्या बनणाऱ्या मुलाजवळ सर्वजण 'शिवा शिवा हिरा हिरा' म्हणतात. त्यांच्या अंगात येते. घरी गेल्यानंतर सर्व लोक पाय धुवून घरात प्रवेश करतात.

वाघ्याचे जागरण

वाघ्याचे जागरण हा एक वैशिष्ट्यपूर्ण विधी आहे. हा विधी धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक असा असतो. हा विधी परंपरेने चालत आलेला आहे. वाघ्ये एकत्र पारंपारिक पध्दतीने चौक मांडतात. हा विधी संपल्यानंतर खऱ्या जागरणास सुरुवात होते. यावेळी चार पाच कथा गीतांच्या माध्यमातून सांगितल्या जातात. कथेतील आशयाप्रमाणे वाघ्ये अभिनय करतात. जागरण करण्यास उभ्या राहिलेल्या वाघ्यांतून एकजण राजा, एक प्रधान बनतो. काही त्याचे साथीदार बनतात. जर मुरळी नसेल तर एखादा वाघ्या मुरळीचे सोंग घेतो. नवसाने मुलगा झाल्यास खंडोबाला जागरण घालतात. नवस फेडण्यासाठी जागरण घालण्याची प्रथा कुणबी समाजात आजही दिसते. जागरण केल्याने खंडोबा प्रसन्न होतो. अशी त्यामागची भावना आहे. गोल्ला जमातीत वाघ्या बनण्याच्या प्रसंगी जागरण घालण्याची पद्धत आहे. जागरण घालताना वाघ्याची सुपारीची रक्कम ठरवावी लागते. जागरण संपल्यानंतर रोख मानधन देतात किंवा काही दान देतात. जागरण विधी एकूण दोन भागात केला जातो. पूर्वार्धात वाघ्ये ज्याच्या घरी हा विधी करतात, तेथील जागा सारवून घेतात. त्यावर एक चौकोन काढतात. त्या ठिकाणी पाच छड्या ऊसाच्या स्वरुपात उभे करतात. या छड्यांच्या मध्यभागी गहू, ज्वारी, तांदूळ इ. त्या धान्य पसरवितात हळदकुंकू लावून पूजा करतात.तांब्यात आंब्याची पाने ठेवतात. हळद, सुपारी, बदाम, खोबरे ठेवतात. '१२'

अशाप्रकारे विधीपूर्वक पूजा केली जाते. ज्या ठिकाणी खंडोबाची पूजा मांडावयाची आहे तेथे हळद कुंकूवाचा एक चौकोन काढतात. सर्व भक्त खंडोबाचे व वाघ्याचे दर्शन घेतात. त्यानंतर जागरणाचा उत्तरार्ध सुरु होतो. तेथेच जागरणाच्या विधीनाट्याला सुरुवात होते. सुरुवातीला इतर देवांना बोलवतात ते नृत्य व अभिनय करतात. नंतर खंडोबाला बोलावतात.

"मल्हारी जागरणाला यावे ।
आमंत्रण देतो कडे-पठार । मल्हारी जागरणाला यावे ।
माळेगावच्या मल्हारी जागरणाला यावे ।
सातारचे मल्हारी जागरणाला यावे । '१३'

या प्रमाणे खंडोबाने ज्या ज्या ठिकाणी अवतार घेतला त्याठिकाणच्या अवतारांचे माहात्म्य गायिले जाते.

जागरणाच्या या प्रसंगी राजाची कथा घेऊन लौकिक जीवनातील काही कथा, प्रसंग भक्तांसमोर मांडले जातात. ती कथा म्हणजे अद्भुत् कथेचा प्रकार असतो. एखादी अशक्य गोष्ट ती शक्य करून दाखविणे. लहान मुलास नदीत टाकून दिल्यानंतर ते मूल चांगल्या माणसास सापडणे, त्याचे पालन पोषण करणे, तो मोठा होणे, पुन्हा त्याचे आई वडील सापडणे, अशा प्रकारच्या कथा असतात. एखाद्या राजाला मूल होत नाही म्हणून प्रधान त्याला दुसरी बायको करण्यास सांगतो व पुढे संवादात्मक पद्धतीने लावणी रात्रभर रंगते.

जागरण आणि गोंधळ यात बरेच साम्य आहे. गोंधळातील नाट्यापेक्षा जागरण अधिक प्रभावी असते.कारण जागरणातील कथावस्तू अधिक परिणामकारक असते.

जागरणातील कथा निरनिराळ्या सामाजिक आशयाच्या उदाहरणांनी विकसित केली जाते. श्रोत्यांना कंटाळा येऊ नये म्हणून मधूनमधून विनोद-निर्मितीसाठी शारीरिक व्यंग, माणसाच्या स्वभावातील दोष, यांचा आश्रय घेतलेला दिसतो. ह्या जागरणातील विनोद हा सामान्य पातळीवरचा असतो.जागरणात वाघ्या आणि मुरळी असतात. त्या जागरणात अश्लील विनोद टाकण्याचा मुद्दाम प्रयत्न केलेला असतो. पण जेथे जागरणासाठी उभ्या असलेल्या वाघ्यातून एक वाघ्या सोंगाड्याचे काम करतो. तेथे अश्लील विनोदाचे प्रमाण अधिक असते. हे स्वरूप तमाशा सदृश असते.

जागरणातील कथावस्तू ही एखाद्या पौराणिक घटनेवर आधारित असते. किंवा एखाद्या पौराणिक राजाच्या जीवनातील घटनेवर आधारित असते. जागरणाचे कथानक पौराणिक असले तरी आजचे अनेक सामाजिक संदर्भ त्या कथेतून पाहण्यास मिळतात.

ज्या जागरणात मुरळी असते. त्या जागरणातील मुरळीचे नृत्यही कथेतील घटनेला पूरक असेलच असे नाही.पण एवढे मात्र निश्चित की, मुरळीच्या नृत्यामुळे जागरणात रंग येतो. मधूनमधून गाणेही म्हणतात. अशा प्रकारे समाजाचे आध्यात्मिक प्रबोधन करावे असा या उपदेशपर गीतांचा उद्देश असावा.

माणसाने परमेश्वराची भक्ती करावी. जीवनाचे सार्थक करुन घेण्यासाठी खंडोबाला शरण जावे. हा जीवनाचा भवसागर चांगल्या प्रकारे तरून जाण्यासाठी खंडोबा मदत

असतो. अशा स्वरूपाचा आशय या प्रकारच्या गीतातून व्यक्त झालेला असतो. याशिवाय दोन बायका असलेल्या माणसाची फजिती कशी होते ह्याचे विनोदाने वर्णन जागरणाच्या गीतातून दिसून येते.

कुलाचार व कुलधर्म म्हणून जागरणाचे महत्त्व असले तरी सामाजिक प्रबोधनाच्या दृष्टीनेही जागरणाचे लोकजीवनात महत्त्वाचे स्थान आहे. अशा प्रकारे जागरण हे एक विधी नाट्य आहे. असे म्हणता येईल.

श्रीकृष्ण

गोकुळ अष्टमीच्या दिवशी श्रीकृष्णाची पूजा करतात. सर्व जातीचे लोक बोलावून त्यांना सुंठवडा वाटतात. सत्यनारायण करतात. त्या प्रमाणे गोल्ह्याच्या घरी लाऊड स्पीकर लावून वेगवेगळी गाणी लावतात. रात्री बारा पर्यंत ती चालतात. श्रीक्रुष्ण वर्णन असणाऱ्या गौळणी म्हणतात.

"गौळण सांगे गौळणीला
पुत्र झाला यशोधेला
येकी म्होर एक द्यावे
एक वाटे सुंठवडा ।
अशी गलबल झाली
दासीजनी हेलावली
वान घेऊनिया ताटी
नंदा घरी झाली दाटी '१४'

नंदाघरचा तो गुराखी
येता वो जाता मजकड पाहता
वाईट तुझी खोड
कान्हा पदराला धरु नको सोड ॥१॥

करुनी येनी फनी
काजळ कुंकू केली
काळ्या हरिला दावी गोरा रंग
पदराला धरु नको सोड ॥२॥

तू कृष्ण काळा
मी राधा गोरी
तुझी माझी नाही शिनजोडी
कान्हा पदराला धरु नको सोड ॥ '१५'

मस्नेर

खंडोबाप्रमाणे मस्नेर हा देव जागृत दैवत म्हणून प्रसिध्द आहे. मुक्रामाबादजवळ एका जंगलात मस्नेर देवाची स्थापना झाली आहे. या देवतांची गोल्ला गोलेवार, घनगर, हाटकर लोक भक्तीभावाने पूजा करतात. जवळचे सर्व जमातीचे लोक मंगळवारी किंवा यात्रेच्या दिवशी तेथे जमतात व परमेश्वराची पूजा करतात.

मस्नेर देवाला नैवेद्य दाखविल्याशिवाय दुसऱ्या कुटुंबातील व्यक्तीला दही, दूध देत नाहीत. त्याचप्रमाणे एखादी गाय किंवा म्हैस व्याली असता तिचे दूध देवाला दाखविल्याशिवाय खात नाहीत.

गोल्ला जमातीतील लोक दोन-तीन वर्षातून एकदातरी मस्नेरचा सण करतात. या सणामध्ये दोन जीवांचे प्राण द्यावे लागतात. एक मोठा बकरा आणि दुसरा एक छोटा असे दोन जीव देवाला अर्पण करतात. त्या बकऱ्यावर भंडारा टाकून खंडोबाच्या नावाने जयजयकार करतात. त्या पिल्लाला देवाच्या नावाने सोडतात. बकरीचे पिल्लू मोठे झाल्यानंतर त्यांच्याबरोबर एक लहान पिल्लू घेऊन त्या दोन बकरीच्या पिल्लांना मुंजेवाराकडून कापले जाते. बकरे कापत असताना मुंजेवार फात्या पढतो. (फात्या म्हणजे परमेश्वराला प्रार्थना करणे) किंवा मुसलमान देवताचे नामस्मरण करूनच बकरे कापतो. ज्या बकऱ्यास कापायचे आहे त्याचीदेखील देवाप्रमाणे पूजा करतात. त्यानंतर त्याला गावाच्या पूर्व दिशेस नदीच्या काठी किंवा मोठ्या झाडाखाली मस्नेर देवाकडे तोंड करुन खंडोबा आणि मस्नेर देवतांच नाव घेऊन कापतात.

मस्नेर देवाची त्याच ठिकाणी स्थापना करुन बकरू कापतात. मस्नेर देवाजवळ पूर्वी खूप बकरे कापत असत. पण तेथे एका महाराजांनी कीर्तन करून लोकांचे मन बदलले. तेव्हापासून मात्र मस्नेर देवासमोर बकरी कापण्यास बंदी घातली आहे. म्हणून आता लोक देवाकडे न जाता ज्या त्या ठिकाणी देवाची स्थापना करून बकरे कापतात. मस्नेरला बळी द्यायचा असेल तर,त्याला देवासमोर कापू देत नाहीत. पण दूर अंतरावर आणखी काही लोक बकरी कापतात. अशा प्रकारच्या बकरी कापण्यास लोक कंदूरी असे म्हणतात. कंदूरी करीत असताना पाहुणे मंडळी गावातील जवळची माणसे जेवणास बोलवतात. खेडेगावातील प्रत्येक घरातील एक माणूस जेवणास बोलावतात. कंदूरीच्या ठिकाणी घेऊन गेलेले कोणतेही अन्नाचे पदार्थ घरी परत आणत नाहीत. तेथेच सर्व

समाप्त करून स्नान करुनच घरी जातात. खरं एखाद्या व्यक्तीने बकऱ्याचे मांस घरी आणले तर त्यात किडे आळ्या पडतात. त्यामुळे कोणीही कोणात्याही अन्नाची वस्तू परत आणत नाहीत. त्याचबरोबर जर काही घरी परत आणले तर देव कोपतो अशी समजूत रुढ आहे. म्हणून कोणीही अन्नाचे पदार्थ परत आणित नाहीत.

गोल्ला गोलेवार जमातीतील लोक गायी, म्हशी दूध देत नसतील, तर ते मस्नेर देवाला नवस करतात. 'देवा तुला दुधा-दह्याने न्हाऊ घालीन ।' मस्नेर देव जागृत आहे. तो नवसाला पावतो अशी श्रद्धा आहे. या देवाला सर्व जातीचे लोक मोठ्या भक्ती भावाने पूजा करण्यासाठी येतात. नवविवाहित नवरा-नवरी मस्नेर देवाच्या पाया पडण्यास येतात' '१६'

म्हैशमा

गोल्ला, गोलेवार जमातीत मस्नेर खंडोबा या देवतांप्रमाणे म्हैशमाला घरची देवता म्हणून मानतात. गोल्ला, गोलेवारांच्या घरातील देव्हाऱ्यात कुळदेवता म्हणून तिची पूजा करतात. या देवतांना देखील बकऱ्याचाच बळी देतात. म्हैशमाला एक गाभण मेंढी व त्याबरोबर एक लहान बकरी बळी देतात. जवळजवळ सर्व गोल्ला, गोलेवार, कुटुंबात म्हैशमा देवाची पूजा करतात. नवसदेखील करतात. ती नवसाला पावली की, तिचे नवस फेडतात. म्हैशमाला दोन किंवा तीन वर्षाला बळी द्यावाच लागतो असे रूढी परंपरेने चालत आले आहे. आजदेखील ते पाळतात. एका कुळातील सर्व व्यक्ती जमून हा म्हैशमाचा सण करतात.

म्हैशमाबद्दल प्राचीन काळी आलेली एक कथा होती. म्हैशमा ही देवता गोल्लाच्या घरातील असल्यामुळे जवळजवळ सर्व लोक म्हैशमाची उपासना करतात. एके दिवशी गोल्लाच्या किंवा गोलेवाराच्या घरामध्ये एक व्यक्ती बोलू लागली की, हे भक्त मला आतापर्यंत खूप नवस केलेस आणि फेडही केलीस पण मला नरबळी पाहिजे. त्या भक्ताने त्या देवतेला अगोदरच (पहिल्या)दिवशीच कंदूरी केली होती. पण म्हैशमा आनंदी झाली नाही. ती म्हणाली, ''तुझ्या गावातील पाटलाचे लहान मूल पाहिजे'' त्यावर गोलेवार घाबरला. तो थरथर कापू लागला. त्यावर म्हैशमा म्हणाली, ''भिऊ नको, ते सर्व काम मीच करते.''

तेवढ्यात पाटलाचे लहान मूल आले. गोल्लाने त्याला जवळ घेऊन त्याला मारले व म्हैशमाच्या पुढे टोपल्याखाली झाकून मुंडकं ठेवले. शरीर मात्र एक खड्डा खोदून पुरून टाकले. पाटील मुलगा नाही म्हणून शोध करू लागला. चोहिकडे त्या मुलाची चौकशी सुरु झाली. तेवढ्यात ते त्या गोल्लाच्या घरी आले. त्यावेळी गोल्ला देवाची पूजा करत होता. पाटलाने देवीपुढील टोपली उचलून पाहीले. तेव्हा एका मेंढ्याचे मुंडके निघाले.

गोल्ला खूप आनंदी झाला. पण त्याला तेथे रहाणे कठीण झाले. गोल्ला लोक

रात्रीच घराबाहेर पडले. ते वाट सापडेल त्या दिशेने पळू लागले त्यामुळे गोल्लांची वस्ती विस्कळीत झाली असे सांगतात. '१७'

बडेपाड

गोलेवार हिंदू देवतांना पूजतात. त्याप्रमाणे काही मुसलमान देवतांनादेखील पूजतात. मस्नेर व म्हैशमा या देवताप्रमाणे बडेपाड या मुसलमानांच्या देवाची मोठ्या भक्तीभावाने पूजा करतात. त्याला नवस बोलून त्या नवसाची परतफेडदेखील करतात.

गोल्ला जमातीच्या एका व्यक्तीच्या अंगात 'बडेपाड' देवसंचार करतो आणि मानवाच्या जीवनातील संकटे दूर करताना दिसतो. व्यक्तींना असलेल्या अडचणी किंवा त्यांच्या मनातील विचार ती व्यक्ती ओळखते असे म्हणतात.

बुधवार, गुरुवार आठवड्यातून दोन दिवस देव अंगात येतो. काही लोकांच्या अंगात शुक्रवारी येते. अंगात आल्यानंतर.अनेक माणसे आपल्या अडचणी दूर करण्यासाठी त्या माणसासमोर रांगा लावताना दिसतात.'बडेपाड' आंध्रप्रदेशात बोधनजवळ निजामाबाद जिल्ह्यात आहे. या देवाचा नवस फेडण्यासाठी गोल्ला जमातीचे लोक पायी चालत जातात. काहीजण दंडवत घालीतदेखील जातात. चारशे कि.मी.अंतर आहे. तरी लोक भक्तीभावाने दंडवत घालीत जातात. तेथे जाऊन एक किंवा दोन बकऱ्या कापतात. 'बडेपाड' देवालाही नेलेले अन्न किंवा इतर वस्तू परत आणीत नाहीत. सर्व पदार्थ तेथील लोकांना किंवा गरिबांना वाटून टाकतात.

'बडेपाड' देवाला जात असताना पायात वाहाणा (चप्पल) घालीत नाहीत. देवतेला नैवेद्य दाखविल्याशिवाय अन्नाचे कण तोंडात घालत नाहीत. असे कठोर नवस करतात आणि ते नवस फेडतात.

वेगवेगळ्या प्रकारचे नवस करतात. कोणी मला मूल होऊ दे म्हणून नवस करतात. कित्येक लोकांना तो देव पावल्याची उदाहरणे आहेत. उदा. नरशाबाई लक्ष्मण अंकमोडे (मु.गादेवाडी, पो. वायगाव,ता. अहमदपूर जि. लातूर) ही स्त्री दंडवत घालीत बडेपाडला नवस फेडण्यासाठी गेली होती. जवळजवळ चारशे कि. मी. अंतर आहे. तरीदेखील ती स्त्री दंडवत घालीत गेली. दोन बकरी कापली. दंडवत म्हणजे पूर्ण शरीर जमिनीवर पाडून हातपुढे लांब करुन पुन्हा एक माणूस खूण करीत व नंतर पुन्हा त्या खुणेच्या जागेवरून पुन्हा आडवे पडत. अशाप्रकारे दंडवत घालीत ती बाई पाच दिवसात बडेपाडला गेली होती. असा नवस केला आणि तो फेडला; हे ऐकून सर्वसामान्य माणसाला आश्चर्य वाटेल. आज त्या बाईचे वय सुमारे पंचेचाळीस वर्षांचे आहे. खूप वर्षे तिला मूलबाळ होत नव्हते. तेव्हा तिने 'बडेपाड' च्या पीराला नवस केला. 'मी तुला दंडवत घालीत येईन मला मूल होऊ दे ' नवसानंतर तिला मुलगा झाला. आणि तिने नवस फेडला. या जमातीत कधी कधी कर्ज काढून नवस फेडतात. आणि आयुष्यभर कर्जबाजारी

होऊन राहतात. '१८'

पीर

बडेपाडसारखाच हे एक मुसलमान दैवत आहे. छोट्या मोठ्या गावात ही देवता असते. त्याप्रमाणे गादेवाडी (ता.अहमदपूर जि. लातूर) येथेही पीर ही देवता आहे. या गावात ऐंशी टक्के गोल्लांची वसाहत आहे. व पंधरा टक्के मुसलमान पाच टक्के मांग (दलित) या गावात राहतात. तरी पीराचा सण (उरुस) अगदी जोरात होतो. जानेवारी महिन्यात कोणत्याही शुक्रवारी हा सण करतात. आतापर्यंत गावातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्ती या देवतेला एक बकरु कापत असे पण आजच्या महागाईमुळे त्याचे प्रमाण कमी झाले आहे. तरीदेखील पंच्याहत्तर ते ऐंशी बकरे त्या ठिकाणी कापतात. त्या दिवशी त्या गावात जत्रादेखील भरते. मुसलमानांप्रमाणे गोल्ला, दलितदेखील हा सण साजरा करतात.

मुसलमानांचा मोहरमचा जो सण असतो, त्यातदेखील 'डोले' बसविणे हा मान गोल्लांकडे आहे. तो 'डोले' बसवितो. बऱ्याच गोल्लांच्या अंगात येते व ते डोले घेऊन नाचत असतात. अशा प्रकारे सण साजरे केले जातात. बडेपाड पीर यांची पूजा मुस्लिम अंमलाचा प्रभाव म्हणता येईल '१९'

समारोप

गोल्ला या भटक्या जमातीच्या धार्मिक जीवनाचे म्हणजेच त्यांच्या देवदेवतांचे उपासनाप्रकाराचे आणि नवसांचे स्वरूप पाहिले तर ते हिंदू आहेत असे दिसते. ते लोकदेवतांची उपासना करतात. खंडोबा हे त्याचे प्रमुख उपास्य दैवत असले तरी म्हैशमा, मस्नेर या लोकदेवतांची उपासना करतात. इतर देवतांनाही ते भजतात. मात्र या देवतांविषयीचे उत्सव त्यांच्यात विशेषत्वाने प्रचलित आहेत. वाघ्या करण्याचा वैशिष्टयपूर्ण विधी आहे. त्यांचे स्वरूप इतर जातीपेक्षा वेगळे आहे. जागरणातील कथा गीते मराठीतच असतात. एवढेच नाही तर त्यातील संवाद आणि संपादनही मराठीतूनच असते. कथागीत सादर करण्याचा प्रकार सर्वसाधारणपणे इतर वाघ्यासारखा असतो. कथागीतात दैवतकथा, अदभूतकथा यांचे मिश्रण असते. जागरणात मनोरंजनाचे प्रमाण अधिक असते. मस्नेरसंबंधीची कथाही वैशिष्टयपूर्ण आहे.

गोल्ला हे मुसलामानांच्या पीरांना हिंदू देवताचे महत्व देऊन त्यांना भजतात. बडेपाड आणि पीराचा उत्सव त्याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. पीर-पूजा नाथ संप्रदायाची किंवा सुफी असेल का? एकूण त्यांच्या धर्मजीवनाचे सांस्कृतिकरण झाले नाही. त्यात पारंपारिकता व अंधश्रध्दा मोठ्या प्रमाणात दिसून येते असे म्हणता येईल.

उल्लेख तीन (अ) संदर्भ टीपा

गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास : वाडकर (डॉ.) डी. एस.टंकलिखित प्रबंध/गोल्लाचे सांस्कृतिक जीवन/औरंगाबाद १९९२.

१. संग्राहक : दगडू संभाजीराव आयतलवाड,मु.वंजरवाडी,ता.उद्गीर, जि.लातूर.,संपादक-वाडकर (डॉ.)डी.एस.,अहमदनगर.तत्रैव पृ.१२०

२. संग्राहक : राम नामदेव सांळुके,मु.वंजरवाडी,ता.उदगीर, जि.लातूर.,संपादक-वाडकर (डॉ.)डी.एस.,अहमदनगर.तत्रैव पृ.१२०,१२१

३. संग्राहक : रामचंद्र वाल्या आणि मंडळी,मु.चाकुर,ता.अहमदपूर, जि.लातूर.,संपादक-वाडकर (डॉ.)डी.एस.,अहमदनगर.तत्रैव पृ.१२१

४. संग्राहक : तत्रैव

५. तत्रैव

६. संग्राहक : सायन्ना वाघ्या आणि मंडळी,मु.पोचमगल्ली,ता.देगलूर,जि. नांदेड.

७. तत्रैव

८. तत्रैव

९. संग्राहक : रामचंद्र वाघ्या आणि मंडळी,मु.चाकूर,ता.अहमदपूर, जि.लातूर.,संपादक,वाडकर (डॉ.) डी.एस.,मु.भिंगार,अहमदनगर.

१०. तत्रैव पृ.१३२

११. तत्रैव पृ.१३२-३३

१२. संग्राहक : दशरथ यादव वाघ्या आणि मंडळी,मु.छावणी औरंगाबाद., संपादक, वाडकर (डॉ.) डी.एस.,मु.भिंगार,अहमदनगर.तत्रैव.पृ.९०

१३. संग्राहक : पिराजी कलंवले आणि मंडळी,मु.खरबवाडी,ता.अहमदपूर, जि.लातूर.,संपादक,वाडकर (डॉ.) डी.एस.,मु.भिंगार,अहमदनगर.तत्रैव पृ.९३

१४. संग्राहक : चंद्रभामाबाई तुकाराम कावट,शनी गल्ली,शेटीगेट,अहमदनगर.,संपादक, वाडकर (डॉ.) डी.एस.,मु.भिंगार,अहमदनगर.

१५. तत्रैव

१६. संग्राहक : रामराव केन्नलवाड,मु.गादेवाडी,ता.अहमदपूर, जि.लातूर.,संपादक,वाडकर (डॉ.) डी.एस.,मु.भिंगार,अहमदनगर.

१७. तत्रैव पृ.११२

१८. संग्राहक : नरसाबाई लक्ष्मण अंकमोड,मु.गादेवाडी,ता.अहमदपूर, जि.लातूर., संपादक, वाडकर (डॉ.) डी.एस.,मु.भिंगार,अहमदनगर.

१९. संग्राहक : आयतलवाड संभाजीराव, मु.वंजरवाडी,ता.उदगीर, जि.लातूर., संपादक,वाडकर (डॉ.) डी.एस.,मु.भिंगार, अहमदनगर.

उल्लेख तीन ब

गोल्लांचे सण - उत्सव आणि कला

दिवाळी

दिवाळी हा सण हिंदूचा सर्वात मोठा सण होय. इतरांप्रमाणे गोल्लामध्येसुध्दा दिवाळी सण फटाके उडवून साजरा करतात. त्याप्रमाणे अनेक गाणीदेखील म्हणतात. लहान मुले दिवाळीच्या आधी पाच दिवस लोकांपाशी तेल मागून, एक ताळ, दुसऱ्या दिवशी दोन ताळ, या प्रमाणे दररोज एक ताळ वाढत पाच ताळापर्यंत जातो. तशी दिवटी तयार करतात. त्यावर एक गवरीचा तुकडा ठेवून त्यावर गोडेतेल टाकून गाईंना ओवाळतात. घराघरातून दिवटीवर तेल टाकले जाते. दिवटी ही एक विशिष्ट उंच वाढणाऱ्या हिरव्या गवताची विणून तयार करतात. ते दिवाळीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य. गाईगोऱ्ह्याच्या बारशीच्या चार दिवसरात्री व एक दिवस सकाळी गाईला ओवाळतात. प्रत्येक घरातील स्त्रीने तेल वाढलेच पाहिजे असा संकेत असतो. दिवाळीच्या दिवशी, फराळाचे वेगवेगळे पदार्थ तयार करुन खाण्याची इकडे प्रथा आहे. 'उटणे' लावून स्नान करण्याची पध्दती आहे. पुरुषाची स्नाने व स्त्रियांची स्नाने वेगवेगळ्या दिवशी असतात. त्या दिवशी उटणे लावून बहिण भावाला स्नान घालते. दिवाळीच्या दिवशी बहिण भावाला ओवाळते. त्यावेळी खालील गाणे म्हणतात.

"आडी पीडी जाऊ दे
सोन्यारुप्यानं ओवाळू दे
बळीचं राज येऊ दे
गायीनं वाडा भरु दे
त्यातली एक मला मिळू दे" '१'

याप्रमाणे गाणी म्हटली जातात. अशाप्रकारे ओवाळून बहीण-भावाला कमरेला करदोडा बांधण्यास देते.भाऊ तिला ऐपतीप्रमाणे ओवाळणी टाकतो. दिवाळीच्या दिवशी मोठे व्यापारी

लक्ष्मीपूजन करतात.
या गाण्याचे पर्याय बहुधा अनेक ठिकाणी आढळतात. उदा :- खानदेश, डांगण, इत्यादी.

समाजातील ही मूळ परंपरा आता नाहीशी होत आहे. मूळ रीती आता तेवढ्याशा दिसून येत नाहीत. आधुनिकतेमुळे ही लोकप्रथा नष्ट होत आहे. शहरात तर त्याचे प्रमाण खूप कमी झालेले दिसते.

या सणामध्ये गाणी ही महत्त्वाची आहेत. ही गाणी विनोदी, खोचक व बडबड गीतासारखी असतात. दररोज अंगणात रांगोळ्या व गाईच्या शेणाचावाडा काढतात. त्यात अनेक गाई काढतात. तुळशी वृंदावन व घराच्या दरवाज्यांना शेणाने लिंपून त्यावर झेंडूची फुले रोवून सुंदर चित्रे काढतात. हे गोल्लांचे वैशिष्टये होय. गोपाळ व श्रीकृष्ण दूध विकायला निघालेल्या गवणळी, फुलझाडे इ.चित्रे काढतात.दिवाळीच्या पाडव्याला घरातील पुरूषांना ओवाळले जाते. पुरुष आपल्या ऐपतीनुसार ओवाळणी टाकतात. त्याचप्रमाणे बारा बलुतेदार देखील दिवाळीच्या निमित्ताने धान्यरुपाने शेतकऱ्यांकडून ओवाळणी घेतात. बहिणीला चोळी-बांगडी, दिवाळीच्या सणानिमित्त पुरणपोळीचे [illegible] होते. अलिकडे फराळाचे तळीव पदार्थ करतात. उदा. बुंदी, लाडू, जिलेबी, भजां, अनारसे. इत्यादि. लहान मुले गायीना ओवाळताना अनेक बडबड गीते म्हणतात.'२'

''दिन दिन दिवाळी गायी म्हशी ओवाळी
गायीचा चारा बैल नवरा
बैलाचं बाशिंग किकरानं ताराल
किकर कुणा[illegible]
काय झाला डुबा झाला
डुबा डुबा गव्हू [illegible]
गव्हात पडली तुसळ्या
ज्यानी गाय पुतळी
ज्यानी गायीचे [illegible]
त्याला लावा चवर गोंडे
चवर गोंड्याची सावली
तिफन माझी माउ
तिफनाचे तीण फण
मोगड्याचे दोन फण
हाणीन बुकी फोडीन चाड
उघड उघड देवाचं कवाड

वर्षानं दिवाळी आली
सोन्याप्यानं ओवाळी '' '३'

खालील प्रमाणे काही कूट-रचना बडबड गीते आढळतात.

''व्हल व्हल गादी
ढवळा बैल पुंजी
ढवळ्या बैलाची येसन
निळ्या घोडीवर बसन
निळ्या घोडीचा खराटा
आबुंजंबुचा पाला
जटां गोसावी न्हाला
जटा पडल्या लवणी लवणी
लवणी लवणीचा तागु
गायी मारल्या वांगू
वागू पिल्याची जाळी
सीला कोंडली माळी
माळी मोडला काटा
गाई लागल्या वाटा
वाट तिटच्या वान्या
गायी फिरवाया पाण्या
पाण पातरिचा मासा
गाई लागल्या देशा
देशादेशाचा वेळू
गाई लागल्या खेळू
खेळता खेळता गेल्या टेका
हांकार हांकार गवळ्याच्या लेका
वर्षानं दिवाळी आली
सोन्यारुप्यानं ओवाळी'' '४'

अशा प्रकारची अनेक गाणी दिवाळीच्या चार पाच दिवसात म्हटली जातात.

होळी

होळी हा गोल्लांचा आवडता सण होय. या सणास विशेष म्हणजे चांदणे असते आणि या चांदण्यात गाणे म्हणतात. मारुतीच्या देवळासमोर अंगणात किंवा एखादी चांगली जागा असेल तेथे पुरुष मंडळी टिपऱ्या खेळतात. स्त्रिया टिपऱ्यांचा खेळ पाहावयास येतात. टिपऱ्याच्या खेळात गवळण गीते चढाओढीने गायिली जातात. गवळण संपेपर्यंत एका जागी उभे राहण्यापुरतीच विश्रांती त्यांना मिळते. एरवी ते सतत नाचत असतात. गवळण गीते गायिली जातात. ती अशा प्रकारची :-

''नादाने जीव माझा घाबरला हो.
घाबरला हो चला वेणू कोठे वाजला
करीत मी होते घरी कामधंदा
शेणाने हात माझा भरलेला
चला वेणू कोठे वाजला
करीत मी होते दही दूध लोणी
लोण्याने हात माझा भरलेला
चला पाहू वेणू कोठे वाजला
जात मी होते यमुनेच्या पाण्या
खडा मारला घागरीला
चला पाहू वेणू कोठे वाजला'' '५'

गवळण संपली की थोडा वेळ टिपऱ्या खेळतात. त्यानंतर मध्येच एखादे सोंग देखील आणतात. सोंग तेथीलच म्हणजे गावातील किंवा आजूबाजूच्या गावातील एखाद्या व्यक्तीचे असते. समाजापेक्षा वेगळा वागणारा कंजूष, श्रीमंतीचा गर्व असणारा, स्त्री लंपट, देवाचा पुजारी, महारोगी, गोसावी, मसणजोगी, पांगूळ इ. अशा प्रकारची सोंगे लोक मनोरंजनासाठी करतात. होळीच्या अगोदर एक महिन्यापासून गावातील लहान मोठी मुले, पुरुषमंडळी टिपरी खेळताना दिसतात. लहान मुलास जुनी माणसे टिपरी शिकवतात. दररोज संध्याकाळी साधारणतः सात वाजता टिपरी सुरु होते. दम लागेपर्यंत टिपरी चालते. कधी अकरा वाजतील, कधी बारा वाजतील याची वेळ ठराविक नसते. ते होळीचा सण येईपर्यंत खेळत राहतात. होळीच्या सणाच्या दिवशी मात्र काही ठराविक लोकांना रंग लावून ते हातात टिपरी घेऊन नाचतात. त्यामध्ये श्रीकृष्ण, गोपाळ, व गवळणी असा पोषाख करतात. वेगवेगळ्या प्रकारचे कपडे घालतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी रंग खेळून दिवसभर गावातील प्रत्येक घरापुढे जाऊन नाचून पैसे मागतात. जमलेला

पैसा किंवा धान्य एकत्र करून त्याच दिवशी सर्व खेळणाऱ्या लहान मुलांस जेवण देतात किंवा गावातील लोकांस ज्या उपयुक्त सार्वजनिक वस्तू असतात त्या खरेदी करतात. (उदा :- पंगतीच्या स्वयंपाकासाठी लागणारी मोठाली भांडी सर्वांना उपयोगी पडतील अशा वस्तू खरेदी करतात.)

शिमगा किंवा होळी सणामध्ये तर खूप मजा असते. रंगपंचमीच्या दिवशी रंग खेळला जातो. शेणमाती, झाडाचा पाला, काळा रंग, यांचाही या खेळात उपयोग केला जातो. स्त्री-पुरुषांचा एकत्र नाच मात्र दिसून येत नाही.

होळीच्या गाण्याची मजा काही वेगळीच असते. वानगीदाखल पुढे एक गाणे दिले आहे.

" महिन्यामधी गं महिना शिमगा उगवला
सारंग पती गणपती माझा कोन्या वनी गेला
महिन्यामधी ग महिना शिमगा उगवला" '६'

काही पुरुष व स्त्रिया गाणी म्हणतात. त्यात फुगडी देखील खेळतात. फुगडीचे गाणे म्हणतात.

"चांदणारी चांदणा
टिपूस चांदणा
निर्मळ अंगावरी
बारीक लावणी कशाची
रामा बारीक लावणी कशाची ?
बारीक लावणी सुपारीची
सुपाऱ्या लावल्या घरोघरी
आता बया झाल्या घरोघरी" '७'

या गाण्यातून शिमग्याच्या दिवशी पौर्णिमेचा चंद्र असल्यामुळे चांदणे पांढरे शुभ्र पडलेले असते. त्याचे वर्णन आलेले आहे. या चांदण्यात मुले टिपऱ्या खेळत आहेत. दम लागल्यास मध्येच श्रीकृष्ण, रामसीता यांच्या लावण्या म्हणत आहेत. खेड्यांमध्ये अशा लावण्या घरातील प्रत्येक व्यक्तीच्या कानावरून गेलेल्या असतात.

तरुण मुली खेळत असताना त्यात काही चुकले तर म्हातारी माणसे त्यांना शिकविण्यासाठी खेळू लागतात. खेळता खेळता ही म्हातारी एखाद्या तरुणीची नक्कल करते. काही म्हाताऱ्या

अशावेळी कोडे घालताना दिसतात.
उदाहरणार्थ : 'हिरव लुगडं नेसली झाडावर जाऊन बसली' (मिरची)
'उमळ शिरा चोपडा मासा साहेब म्हणतो पकडू कसा' (वीज)
'एका बैलाला बारा नथा' (ढोलकी)
'काळ्या रानात पेरला मका, लागला धक्का तर ओरडू कसा' (विंचू)
'दिवसभर झोपते, रात्रभर उभे राहते' (गुराचे दावे)
होळी पेटवत असताना काही अश्लील गाणी किंवा म्हणी किंवा शिव्याही दिल्या जातात. लहान मुले, मोठे पुरूष एकमेकांना अश्लील म्हणी कोडी म्हणत असतात. उदा. कोणी अशक्त असेल तर त्याला म्हणतात. 'गवरीला गवरी पेटना तुक्याला बायको रेटना'
शब्दाची ही देवाणघेवाण हसण्याखेळण्याच्या वातावरणात चाललेली असते. कुणीही त्याचा रागलोभ मानीत नाहीत.शिमग्याच्या निमित्ताने कोणत्या प्रकारची गाणी म्हणावीत किंवा शिव्या द्याव्यात याला काही बंधन नाही. होळी पेटवतानाच जास्त शिव्या दिल्या जातात. प्राचीन काळी राजरोस शिव्या व गाणी म्हणत. हल्ली मोठी माणसे या गाण्यामध्ये किंवा खेळामध्ये भाग घेण्याऐवजी भजन म्हणताना दिसतात.गोवऱ्या न देणाऱ्याच्या नावाने किंवा होळीला गोवऱ्या न देणाऱ्यांच्या नावाने वाट्टेल ते बोलले जाते.

उदा. "गवरीला गवरी पेटना रामाला बायको रेटना
रामाच्या बैलाला हो हो" '८'

असे म्हटले जाते की, दिपवाळीपासून थंडी वाजण्यास सुरुवात होते आणि वेळ अमावस्येला शेणातून घराकडे येते. थंडी खूप वाजते. त्यानंतर शिमग्याला मात्र होळी पेटवल्यानंतर थंडी कमी होते.

दसरा (विजया दशमी)

दसरा हा सण पारंपारिक पध्दतीने साजरा करतात. सीमोल्लंघनासाठी जात असताना गावातील मानकरी लोकांना बरोबर घेतात. रुढी परंपरेने ज्या घराण्याकडे पाटीलकी चालत आलेली असते, त्याच घराण्यात वडील मुलास मान असतो. सीमोल्लंघनासाठी गावाबाहेरच्या एखाद्या ठरलेल्या शेतात जातात. प्राचीन काळी त्या शेतातील लोकांनी नासधूस केली तर कोणीच काही म्हणू शकत नव्हते. परंतु आता मात्र बंधने आली आहेत. मानासाठी ज्वारीची कणसे, तुरीच्या डहाळ्या, आंबाडी, आपट्याची पाने सोने म्हणून सर्वजण घेऊन येतात. मारुतीच्या पारावर ते टाकतात. अशा प्रकारे हा सण साजरा करतात.

संक्रांत

संक्रांत हा सण या भागात मोठ्या प्रमाणात रुढ आहे. "तीळ घ्या, गुळ घ्या गोड

बोला'' किंवा ''तिळगुळ घ्या गोड बोला'' हे वाक्य प्रत्येकाच्या तोंडी त्या दिवशी असते. वडीलधारी माणसे छोट्यांना तिळगुळ देतात.लातूर, नांदेड या भागात लहान मुले देखील मोठ्यांना तिळगुळ देवून आशीर्वाद घेतात. पण नगर, औरंगाबाद, मालेगाव या भागात फक्त मोठ्या माणसांनीच लहान मुलांना तिळगुळाची देण्याची परंपरा आहे. बायकांनी वाण वाटणे हा प्रकार गोल्लांमध्ये सुमारे दहा वर्षापासून सुरू झाला आहे. भोगीच्या दिवशी तिळगुळ घालून भाकरी करतात. संक्रांतीच्या दिवशी पुरणाच्या पोळ्या करतात. कुरड्या, पापड्या, भजी असे प्रकारदेखील करतात. संक्रातीला बायका नवीन लुगडी नेसतात. गोल्लामध्ये हळदी कुंकू देण्याची पध्दती नव्हती. परंतु इतर समाजाचे पाहून दहा पंधरा वर्षापासून हळदी कुंकू हा कार्यक्रम करतात.

ब्राह्मण घरोघरी जाऊन संक्रांत कशावर आहे हे सांगत असतो, वाण म्हणून काही बायका फळेदेखील देतात. उदा. गाजर,बोरे,तिळगुळ,हरभऱ्याचे घाटे हे पूजा विधीसाठी वापरतात.संक्रांतीपूजन करीत असतात.

सट

सट हा सण सर्वसामान्य लोक साजरा करतात. मार्गशीर्ष अमावस्येला असतो. त्या दिवशी सर्व समाजातील लोक हा सण साजरा करतात. वेगवेगळ्या जातीतील लोक यामध्ये सहभागी असतात. एक महिन्याअगोदरपासून, वाघ्ये खंडोबाचे उपवास धरुन, दर रविवारी खंडोबाच्या नावाने भिक्षा मागतात. 'सट' या सणाला वाघ्ये 'तळी' भरण्याचा विधी करतात. एका ताम्हणात पाने, पैसा, भंडार, खोबरे हे पदार्थ व नैवेद्याचे सामान घेतात व पूजा करतात. त्या ताम्हणाला चार वाघ्ये धरतात. ते ताम्हण उचलतात.

खंडोबाचा येळकोट येळकोट! या नावाने गजर करीत तीनदा ताम्हण उचलतात व खाली ठेवतात. या तळी भरणीनंतर आरती करतात. आरतीनंतर खंडोबाचे दैवत ज्या दिशेला असेल त्या दिशेला चार पावले जातात. देवाला आरती ओवाळतात आणि खंडोबाच्या नावाचा जयघोष करतात. देवाला भंडार उधळून परत येतात.

तेथील सर्व लोकांना भंडार लावतात. गोल्ला समाजात काही ठिकाणी पौष महिन्यात षष्टी 'भांगर सट' म्हणून साजरी केली जाते. या दिवशी गोल्ला लोक इतर समाजातील लोकांना (विशेषत: धनगरांना) खंडोबाचे भक्त म्हणून पूजा करण्यासाठी बोलावतात. त्या ठिकाणी प्रत्येक धरी जेवणाचा आग्रह करीत असतात. काहीजण 'दक्षिणा' देखील देतात. 'भांगर' सटीला मात्र सर्व गोल्ला लोक खंडोबाची पूजा करतात.

'सण शनिवारी आयतवारी नित्य मागतो वारी
नित्य नवरा मल्हारी गळ्यामध्ये घाल भंडारी' '९'

अशा प्रकारे खंडोबाचे नामस्मरण सतत करीत असतात. या दिवशी वांग्याचे भरीत, बाजरीच्या भाकरीचा नैवद्य असतो.

जत्रा व यात्राचे स्वरुप

महादेवाची यात्रा महाशिवरात्र या दिवशी असते. जत्रा म्हणजे लहान खेडेगावातील लोकांना आनंददाय प्रसंग असतो. त्या आनंदाच्या भरात प्रत्येकजण जत्रेस जातो. जत्रेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे लोक येत असतात. शेतीमध्ये दररोज काम करणाऱ्या लोकांना जत्रेच्यानिमित्ताने वेगळे जीवन जगावयास मिळते. त्यामुळे त्यांना आनंद होतो. जत्रेमध्ये अनेक प्रकारचे लोक येतात. कुणी काही खरेदी करण्यासाठी येतात तर काहीजण कुस्त्या खेळण्यास येतात. खंडोबाच्या यात्रेच्यावेळी खंडोबाचे वैभव आणि त्याच्या यात्रेला होणारी गर्दी यांचे वर्णन पुढील गीतात आले आहे.

''खंडेराय देखीला देव । जन-यात्रा मिळेल ।
सर्व काय सांगू । नाना वैभव ॥
लोकांची वाटी । दिंड्यांची दाटी । वाघ्याची वाटी ।
ढोल दनाने । टाळ माघाळ । बुरुग वाके नाना कल्लोळ ।
कर्णे काहळ । मिळवीती मेळ । हत्ती किंकारती । उंट भडकती ।
घोडे हिंसकती । बैल डुलती । नामघोषे गर्जताती ।
कोण कोठे । काही कळेना । यात्रेमध्ये ते आकळेना ।
गर्दी झाली आश्चर्य मना ॥ '१०'

खंडोबाच्या यात्रेला अनेक लोक जातात. खूप मोठी यात्रा भरते. यात्रेला सर्व लोक आनंदाने जातात भक्त खंडोबाला प्रेमाने नारळ फोडतात आणि देवाचं लंगर तोडून देवाची भेट घेतात. जत्रा म्हटली की, तमाशे आलेच, पाळणे, इत्यादी गोष्टी जत्रेला असतात. वेगवेगळे लोक काही विकण्यासाठी, काही घेण्यासाठी येतात. खेडेगावातील जत्रेत कोंबडा, बकरी यासारखे बळी देतात. जत्रेला बैलगाडीत बसून बायका पुरुष येतात. कपडे, खेळणी, फुगे अशाप्रकारची खरेदी करतात. देवाला केलेले नेवस फेडण्यासाठी एकच धांदल उडते. हे नवस कधी कधी कर्ज काढूनही फेडतात. लोटांगण वा दंडवत घालीत देवापर्यंत जाणे. हातावर चालणे नाक घासत चालणे, लोळण घेत देवापर्यंत चालणे, असे अनेक प्रकारचे नवस असतात. या प्रसंगी भगत मंडळींना फारच किंमत आलेली असते. खरे देव जणू तेच असतात. नवस फेडण्यासाठी दिल्या जाणाऱ्या बकऱ्यांच्या बळी देण्यामुळे भगतांच्या घुमण्यामुळे जत्रेचे स्वरुप थोडे भीतीदायक वाटते. हिंसा हा जत्रेचा आत्मा असतो.

जत्रेचे स्वरुप बाजाराच्या बाबतीत जरी यात्रेसारखे असले तरी सुध्दा देवदर्शनाच्या बाबतीत शांतता असते. यात्रेमध्ये काही ठिकाणी तमाशे न नेण्याची प्रथा दिसून येते. खंडोबाच्या जत्रेमध्ये खूप तमाशे येतात. जत्रा ही तमाशाला योग्य ठिकाण असते.

लोकांच्या अंधश्रध्दा

गोल्ला लोक अंधश्रध्दाळू आहेत. त्यांच्या त्या देवतांवर विश्वास असतो.रोगराईपासून ही दैवते रक्षण करतील अशी या लोकांची समजूत असते. या लोकांची एवढी अंधश्रध्दा आहे की, त्यांना वाटते पाऊसदेखील त्यांच्या कृपेनेच पडतो. देवाची जर अवकृपा झाली तर दुष्काळ पडेल असे त्यांना वाटते. त्यामुळे हे सर्वजण देवाची प्रार्थना करतात. मेलेली माणसे भुते होतात असा त्यांचा ठाम समज आहे. हडळ, मुंजाचेडा, भुताळी इत्यादी भुतांचे प्रकार सांगितले जातात. उदा. पुरुषांची वासना अपूर्ण राहिली तर तो खवीस होतो. बाळंतीण मेली तर ती हडळ होते. कामवासनेने पीडलेला तरुण लग्न न होता मेल्यास मुंजा होतो अशा समजूती आहेत. त्यामुळे मेलेल्या माणसापासून त्रास होऊ नये म्हणून मांत्रिकाचे समाजातील स्थान अनेकदा प्रतिष्ठित माणसासारखे असते. ही भुते भर उन्हाच्या वेळेस निघतात. अंधाऱ्या रात्री त्याचप्रमाणे पौर्णिमेच्या रात्री त्यांच्या फेऱ्यात कोणी सापडल्यास ती त्याला झपाटतात. त्यांचे वारे माणसाच्या अंगात संचारते अशा समजुती या बाबतीत आहेत. या भुतांचे सर्व पुरावे मांत्रिक सांगत असतात. त्यांच्या जागादेखील दाखवितात.

चेटूक या गोष्टीवरदेखील या समाजातील लोकांचा पूर्ण विश्वास दिसतो. चेटूकाचा उपयोग शत्रुचा नाश करण्यासाठी होऊ शकतो. ही चेटूक व भानामतीची विद्या मांत्रिकांना ज्ञात असते ही कोकणी विद्या असावी असे बऱ्याच मुलाखतीनुसार समजते. वांझ स्त्रिया, विधवा चेटूकविद्येचे उपयोग करताना दिसतात.

खंडोबाला नवस

खंडोबाच्या नवसाबद्दल काही गाणी म्हणतात.

उदा :

"खंडोबाला नवस केला
चला जाऊ गो जेजोरीला
कडे पठारावर दिसेल शोभा
गडावरती कैसी डोलती मजा
बेल भंडाराचा भडीमार झाला
चला जाऊ गो जेजोरीला ॥१॥

गादी मखमली घोड्यावर
चमके चांदी सोन्याचा पदर
टांगा टाकील वारू जमला
चला जाऊ गो जेजोरीला ॥२॥

कैसे खंडोबा घोड्यावर
त्यांनी घेतली माळसा दूर
आकाशी घोडा उडावेला
चला जाऊ गो जेजोरीला ॥३॥

करा नदीचं पाणी झुळझूळ
देव आंघोळी करतील
तो आंघोळीचा बघु सोहळा
चला जाऊ गो जेजोरीला ॥४॥ " '११'

अशा प्रकारे भक्ताने खंडोबाला नवस केला आहे. तो फेडण्यासाठी जेजुरीच्या खंडोबाला जातो आणि त्या गडावर चढून बेलभंडार वाहतो. त्यामध्ये खंडोबा घोड्यावर बसलेला आहे. त्याने घोड्यावर म्हाळसाला बसवून आकाशात घोडा उडवला आहे आणि तो घोडा नदीच्या कडेला घेऊन जाऊन ते आंघोळी करतात. त्याचा सोहळा हे लोक पाहतात. अशा प्रकारचे गीत आहे.

"पाव शिव लिंगा । प्रेम रगड जेजोरी ॥
हार हार बोला । पाव शिव लिंगा ॥
हाय दिवस । तर पिवळे डाव ।
निळा घोडा । खंडेराव ।
एळकोट एळकोट बोला । पाव शिवलिंगा ॥१॥

माय काठीसन पाणी । तु कारे उभा दैनवरी
हार हार बोला पाव शिव लिंगा ।
पहिले ठाण मैल्हारात ।
मालुची सदर वाड्यात ॥२॥" '१२'

खंडोबाचे महत्त्व सांगणारे एक गीत

"धनी मैराळा आजानीला एक रोकडी नामाची
परचित ऐका मल्हारी देवाची
हर हर महादेव पार्वती भोळा शंकर
दैत्य मारुन जार ेल्ले धन्य हा मल्हार
आळ सत्कीनं असू दे पिऊन केला धुळकार
करी डमरुचा बाजा नाद उठवला अंबर
गळ्यात सेल शिंगी जोगी बुवा सरदार
जोगेश्वरी शेषाची कन्या हिचा भरतार
घेऊन इस्काचा प्याला कालुखा जैराशी चढली
परचित ऐका मल्हारी देवाची जैराशी चढली" '१३'

गोल्ला, गोलेवार समाजाची लोकसंस्कृतीची जडणघडण

गोल्लांची जडण घडण संमिश्र स्वरुपाची आहे. यांची मूळ परंपरा शैव व वैष्णव मिश्र स्वरुपाची आहे. शैव पंथाविषयी वाघ्या आणि खंडोबा दैवत या संदर्भात अगोदर माहिती आली आहेच. येथे वारकरी संप्रदायाचा विशेष परामर्श घेऊ.

वारकरी संप्रदाय प्राचीन काळापासून पंढरीचा पांडुरंग हा देखील या संस्कृतीचा अविभाज्य अंग बनला आहे. तुकाराम, एकनाथ, नामदेव, निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई, जनाबाई. या संत मंडळीचा खूप मोठ्याप्रमाणात प्रभाव या समाजावर पडलेला आहे. गोल्लाजमातीत बरीच पुरुषमंडळी त्याचप्रमाणे स्त्रिया विठ्ठलाचं नामस्मरण करताना दिसून येतात. त्यांच्या काही जात्यावरच्या ओव्या स्त्रिया म्हणत असताना दिसून येतात. पहाटेच्या वेळेस या समाजातील स्त्रिया दळण दळत असतात. ते दळण लवकर व्हावे यासाठी आपल्या गाण्यातून विठ्ठलाचे नामस्मरण करताना दिसतात. त्यामुळे समाजातील वेगवेगळ्या संतांचे कीर्तन ऐकून त्यांना परमेश्वराजवळ जाण्याचा एकमेव मार्ग म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण! त्यावेळेस स्त्रिया पहाटेच्या वेळेस दळण दळत असताना हरिनामाचा गजर त्यांच्या मुखातून बाहेर पडतो. दिवसभराच्या कामानंतर हरिभजनात रंगून जीवनाला विरंगुळा मिळवणे ही गोष्ट सर्वांना हवी हवीशी वाटते. मनोरंजन परमेश्वर चिंतन या साऱ्या गोष्टी यातून साध्य होतात. हे सर्व लोक अडाणी असतात. त्यामुळे त्याचे ते बोल असतात. ते चांगले असतात. गोल्ला लोक वारकरी संप्रदायाचे तत्त्व विचार पाळतात. वारकरी भक्त टिळा लावणे,माळ घालणे,भजन करणे,पंढरपूरच्या वाऱ्या करणे,एकादशी करणे, या सर्व गोष्टी आवडीने करतात. अनेक खेड्याखेड्यातून हरिनामाचा सप्ताह सुरु असतो. वीणा घेऊन परमेश्वरापुढे पहारा करतात. त्याचप्रमाणे रात्री सर्व भजनामंडळी येऊन भजन करतात.

कीर्तन,भजन,भारुड म्हणतात. तेव्हा रात्रीच्या शांत हवामानात ते सर्व आवाज आकाशात मिसळतात. कितीही गरीब असो. वारकरी संप्रदायाचा माणूस पंढरपूरची वारी चुकू देत नाही. आषाढी,कार्तिकी एकादशी अत्यंत भक्तीभावाने करतो. स्त्रिया आपल्या ओव्यातून विठ्ठलाचे नामस्मरण करतात. या ओव्यातून दिसून येते.

''पहिली गं माझी ओवी पहिली राऊळाला
सोनं देऊळा विठ्ठलाच्या
दुसरी माझी ग ओवी दुसरे दुजेभाव
अंतर तुला ठाव पांडुरंगा
तिसरी गं माझी ओवी तीनसे आठवले
सद्गुरु भेटले हो पांडुरंगा
चौथी माझी ओवी चौथरीचा फेरा
कचरीला हिऱ्या विठ्ठलाच्या
पाचवी गं माझी ओवी पाची पांडवाला
द्रौपदी ओव्या गाती बांधवाला'' '१४'

यानंतर आणखी एक ओवी गीत

''पहिली गं माझी प्रदक्षिणा घेता पैशाचा बुका
घालते विठ्ठलाच्या मुखा बोला पांडुरंग
लुटा भोजनाचा रंग बोला पांडुरंग बोला पांडुरंग
दुसरी ग माझी प्रदक्षिणा घेतो पैशाच्या लाह्या
पडते विठ्ठलाच्या पाया बोला पांडुरंगा'' '१५'

वारकरी संप्रदायाचा प्रभाव

गोल्ला जमातीचे लोक महाराष्ट्रात कित्येक वर्षापासून राहात आल्यामुळे महाराष्ट्रातील धर्मसंप्रदायांचा त्यांच्या जीवनावरही खूप प्रभाव पडला आहे. वारकरीसंप्रदाय किंवा विठ्ठल भक्तिसंप्रदायाचा प्रभाव तर विशेषत्त्वाने दिसतो. हे लोक मूलतः खंडोबाचे उपासक असले आणि इतर देवदेवतांना तसेच पीरांना भजत असले तरी विठ्ठलाचीही उपासना करतात. काही लोक पंढरपूरला वारीला जातात. गोल्लांच्या भजन मंडळ्याही आहेत. त्यात ते ज्ञानेश्वर नामदेवांदिकाची भजने म्हणतात.

एकनाथाच्या गवळणी त्यांच्यात विशेष लोकप्रिय आहेत. गावात नाम सप्ताह करतात. त्यास भारुड म्हणतात. ते केवळ भारुडांचे कार्यक्रम पाहतात. त्याचप्रमाणे काही गोल्ला

भारुडे सादरही करतात. त्यांचे हे सगळे कार्यक्रम ते ज्या भाषिक प्रदेशात राहतात तेथील मराठी भाषेत चालतात. घरी तेलगू व बाहेरच्या सामाजिक जीवनात मराठी असा त्यांचा भाषिक व्यवहार असतो.

कला

गोल्ला, गोलेवार समाज दारिद्र्याने पिडलेला असल्याने त्यांच्याकडे कलांची उपासना होऊ शकली नाही. त्यांनादेखील सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करावे लागत असे. त्यांना मोकळा असा वेळ मिळत नसे. तरी गोल्लाच्या स्त्रिया इतर हिंदू स्त्रियाप्रमाणे गोंदून घेत असत. हातावर कोणी पाच गवळणी किंवा कोणी सात, दहा, बारा गवळणी काढीत असत. या गवळणींना श्रीकृष्ण अडवतो असे चित्र काढीत असत. कपाळावर चंद्रकोर किंवा गोल असं गोंदण काढीत असत. काही स्त्रिया हातावर पतीचं नाव काढून घेत कला प्रकारात मोडणारे अनेक प्रकार मात्र त्यांच्याकडे दिसून येतात.

नृत्य

गोल्ला, गोलेवार समाजात नाचणे हा प्रकारदेखील काही प्रमाणातच दिसून येतो. होळीच्या वेळेस किंवा होळीच्या अगोदर पंधरा दिवसापासून टिपरी खेळली जाते. टिपरी खेळत असताना हातात दोन टिपऱ्या घेऊन बरेच मित्र टिपरी खेळतात. टिपरीतील डाव पारंपारिक आहेत. उदा. जोडी, गिरकी, चाल.

विणकाम

या जमातीतील विणकाम जास्त प्रमाणात दिसत नाही. परंतु काही लोक मेंढपाळ व्यवसाय करतात. मेंढ्यापासून लोकर निघते. त्याचे घोंगडी विणण्याचे काम करतात. त्याचप्रमाणे काही शेतकरी गोणपाटीसारखी औत (वकर) चालविण्यसाठी 'शापत्ती' विणून तयार करतात. दररोजच्या जीवनात उपयोगास येणाऱ्या गोष्टी ते स्वतः विणत असत. शिवणकाम देखील करीत असत. उदा. गोधडी शिवणे, घोंगडी विणणे, झाडापासून किंवा वेलीपासून कंणगी करणे. लहान लहान टोपली तयार करणे, आबाड्याचे शिंकाळाचे दोर तयार करणे इत्यादी कामे करीत.

बांधकाम

गोल्ला लोक आपली घरे स्वतःची स्वतः तयार करतात. घरात कणग्या व मातीचे कोथळे यांची भिंत करून घराचे भाग करतात. जास्तीत जास्त लोक काडी पाला, पाचोळा, ऊसाचे पाचट यानेही घरे चांगल्याप्रकारे तयार करतात.

तमाशाची आवड :- तमाशा ह्या महाराष्ट्राच्या पारंपारिक लोककलेचा आनंद गोल्ला मोठ्या प्रमाणावर घेतात. जत्रांमधून जे तमाशाचे फड येतात तेथे गोल्ला जमातीचे लोकही जातात. एवढेच नाही तर काही गोल्ला तमाश्याच्या फडात भागही घेऊ लागले आहेत.

समारोप :- यावरून असे दिसून येते की, गोल्ला ही मूळची तेलगू भाषिक भटकी

जमात असली तरी महाराष्ट्राच्या धार्मिक आणि सांस्कृतिक जीवनात पूर्णपणे एकरूप झाली आहे. लग्नकार्य,जातपंचायत व देवदेवस्की या बाबतीत मात्र त्यांनी स्वतःचे वेगवेगळेपण कायम टिकवले आहे. घरी मात्र गोल्ला आवर्जून तुटकीफुटकी का असेना तेलगू बोलताना आढळतात.

या उल्लेखात आपण गोल्ला, गोलेवार संस्कृतीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या श्रध्दा, अंधश्रध्दा त्यांची दैवते व यात्रा-जत्रा तसेच त्याचे सणोत्सव यातून त्यांची धर्म भावना दिसून येते. धर्माच्या कल्पना स्पष्ट होतात. तर सणोत्सावाच्या संदर्भातील कला अन्य कला यातून त्याचे कलाजीवन स्पष्ट होते. या संस्कृतीचे मूल्यमापन करताना तेथील परिसर आणि जमातीची संमिश्रता दिसून येते यांचा विचार करावा लागतो. हे सारे लोक एकमेकात मिसळून गेले आहेत. गोल्ला, गोलेवार जमातीत वेगळेपणा दाखविण्याचा प्रयत्न केला. या संस्कृतीतील आगळेवेगळेपण जाणवत असले तरी महाराष्ट्राच्या सामान्य मराठमोळ्या संस्कृतीशी ती बरीच सुसंगत आहे. तेथे धर्म ही कल्पना अगदी मर्यादित अर्थनिच मांडली आहे.

उल्लेख तीन (ब) संदर्भ टीपा

१. गोल्लाजमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास. वाडकर (डॉ)डी.एस., टंकलिखित प्रबंध, १९९२-गोल्लाचे सण व उत्सव, पृ.१२०
२. तत्रैव पृ. १२०
३. तत्रैव पृ. १२४
४. तत्रैव पृ. १२४-१२५
५. तत्रैव पृ. १२६
६. तत्रैव पृ. १२७
७. तत्रैव पृ. १२८
८. तत्रैव पृ. १२९
९. तत्रैव पृ. १३२
१०. तत्रैव पृ. १३४
११. तत्रैव पृ. १३७
१२. तत्रैव पृ. १३७-१३८
१३. तत्रैव पृ. १३८
१४. तत्रैव पृ. १४०
१५. तत्रैव पृ. १४३

उल्लेख चार

गोल्ला जातपंचायत

गोल्ला जमातीची जातपंचायत

जातपंचायतीला लग्नकार्यात महत्त्वाचे स्थान असते. जातपंचायतीला लग्नकार्यात व इतर विधी कार्यासाठी बोलावले जाते. त्यांच्या उपस्थितीशिवाय कोणतेही विधी पार पडत नाहीत. नांदेड व लातूर या दोन जिल्हयात जातपंचायतीचे महत्त्व कमी झालेले आहे. साधारणपणे वीस वर्षापूर्वी जातपंचायत आस्तित्वात होती. देगलूर मध्ये आजदेखील जातपंचायत दिसून येते. पण त्यांना कोणी फारसा मान देत नाही.

जातपंचायतीचे पदाधिकारी साधारणतः पुढीलप्रमाणे असतात -

१. चौधरी २. भंडारी ३. इतर पंच, दिवसेंदिवस जात पंचायतीचे महत्त्व कमी कमी होऊ लागले आहे. देगलूरचे संगमकर खंडेराव गुरुजींनी सांगितले की, काही दिवस ही जात पंचायत चांगली चालली नंतर मात्र खूप भ्रष्टाचार वाढू लागला. '१'

लातूर जिल्ह्यातील जातपंचायत पाहणी

गादेवाडी, वंजरवाडी, एकुर्का, सैयदपूर, चाकूर, अलगरवाडी, डोगरज, रुई या गावात देखील जातपंचायत होती. परंतु सध्या मात्र जात पंचायत अस्तित्वात नाही. वायगाव श्रीमान आप्पाराव पाटील, गोदेवाडी- वागजी पाटील, वंजरवाडी- गणपतराव व रामजी आयतलवाड असे दोन सभासद होते. त्यातील एक सभासद रामजी संतोबा आयतलवाड आजतागायत आहेत. त्यांनीच ही सर्व माहिती सांगितली आहे.

प्राचीन काळापासून चालत आलेल्या या जातपंचायतीचे स्वरूप गोलेवार जमातीत आजदेखील कमी अधिक प्रमाणात चालू आहे. ज्याच्याजवळ खूप पैसा आहे असेच अनेक लोक जातपंचायतीचे सभासद झालेले दिसतात. दुसरी गोष्ट म्हणजे निजामशाहीच्या काळात जे लोक 'पोलीस पाटील''माली (मुलकी) पाटील होते तेच लोक हल्ली जातपंचायतीचे सभासद असलेले दिसतात. निजामशाहीच्या काळात गोल्ला जातीतील जे लोक गुमास्ते होते, ते देखील जातपंचायतीचे सभासद असल्याचे दिसून येते. जातपंचांनी सांगितले तसे इतरांनी वागायचे. गोल्ला गोलेवार समाजात शिकलेली माणसे फारशी नाहीत. थोड्या

लोकांना काही लिहीता वाचता येते. चारमाणसात चांगल्या प्रकारे बोलता येते. अशा माणसांना जातीपंच म्हणून निवडत असत. परंतू ही परंपरा काही काळातच बंद झाली व वंशपरंपरेने त्यांनाच जातीपंच म्हणून नेमले जाऊ लागले. जातपंचायतीच्या सभासदाची निवड पैशाच्या जोरावर किंवा मनुष्यबळावर केली जात असे. एखाद्याच नविन सभासदास जातपंचायतीत प्रवेश मिळे '२'

सभासद बदलण्याचे कारण

१. एखाद्यावर अन्याय झाला तर त्या सभासदामध्ये दोन गट पडतात. तरी पण हे जातपंचायतीचे जूने सभासद फुटत नाहीत. परंतू हे भांडण जास्त विकोपाला गेले तर बहुमताने त्यांच्या जवळच्या एखाद्या व्यक्तीची नेमणूक करतात.

२. एखादा सभासद मरण पावला तर त्याच्या जागेवर दुसरा सभासद घेतात.

जातपंचायती पुढील कारणावरून भरविल्या जातात

१. न्यायदान

गोल्ला, गोलेवार समाजात जातपंचायतीचे स्वरूप गुंतागुंतीचे आहे. पंचायतीच्या अधिकार क्षेत्रात सर्व प्रकारचे गुन्हे येतात. जातपंचायतीला वेगवेगळ्या तक्रारी विषयी निर्णय घ्यावे लागतात. किरकोळ गुन्ह्यांपासून मोठ्या गुन्ह्यांपर्यंत सर्व प्रकारच्या गुन्ह्यांची दाद जातपंचायतीत घेतली जाते.

उदाहरणार्थ

व्याभिचार, परस्त्रीहरण, नियमबाह्य वैषयिक वर्तन, खून जाळपोळ, लग्नाचा खर्च न देणे इतर कार्यक्रमात जातपंचाला मान न देणे.

२. कौटूंबिक कारणे

ह्या संदर्भात पुढील माहिती मिळाली. '३'

१. लग्न झाल्यानंतर नवरा-बायको यांचे परस्परात पटत नसल्यास -

२. एखाद्या व्यक्तीने जातपंचायतीचा कोणताही मानपान चुकविला असल्यास -

३. एखादा नवरा,बायकोस नांदवित नसल्यास -

४. स्त्रीने व्याभिचार केल्यास -

दोन्हीही पक्षांचे म्हणणे ऐकून घेऊन पंच न्यायदान करतात.

न्यायमंडळाची बैठक

गोलेवार, गोल्ला जमातीत जातपंचायतीचा नियम असा होता की, एखादा प्रश्न जातीसमोर मांडण्याच्यावेळी त्या व्यक्तीने जातपंचायत भरल्यानंतर चहापाणी इत्यादी सर्व व्यवस्था करावयाची. जातपंचायतीसमोर मांडलेल्या प्रश्नांचा निकाल लागला तरी किंवा नाही लागला तरी जमलेल्या लोकांना दारु पाजावी लागत असे. दारू फुकट मिळते म्हणून खूप लोक जातपंचायतीला यायला लागले. वाटेत जो कोणी भेटेल त्याला देखील

दारू पिण्यास बोलावू लागले. त्यामुळे एखादा प्रश्न कमी किंमतीचा असेल तर त्याच्या किंमतच्या दहा पट दारुची रक्कम होऊ लागली. एवढे करुनही तो प्रश्न सुटेलच असे नाही. त्यामुळे जातपंचायत लयास गेली. नांदेड, लातूर जिल्ह्यातील लोक आता न्यायालयात जात आहेत. जातपंचायतीचा एवढा परिणाम या भागात नाही. सोडमोकळीक घ्यावयाची तरी काही लोक न्यायालयात जात आहेत. जातपंचायतीवर विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे न्यायालयाकडे धाव घेत आहेत.

जातपंचायतीतील नितीमत्ता

१. पंचायत निवाड्यानुसार वागणे.

२. जातीच्या परंपरा पाळणे.(संस्कार विधी दैवते)

३. पंचायतसदस्य

१) सत्यवचनी २) नि:पक्षपाती ३) न्यायप्रिय ४) शूर असे असावेत.

गुन्हे

१. चोरी २. शिंदळकी ३. समाजबाह्य वर्तन इत्यादी गुन्हे मानले जातात.

शिक्षा

गोल्ला, गोलेवार समाजात ज्या व्यक्तीला गुन्हेगार म्हणून समजले जाते त्या व्यक्तीविरुध्द केलेले आरोप सिध्द होणे आवश्यक असते. त्यासाठी दोन मार्गांचा अवलंब करतात. १) शपथ घणे २) दिव्य करुन दाखविणे इ. विषयी माहिती अहमदनगर येथे मिळाली. '४'

शपथ घेणे

अलौकिक शक्ती व तिथे सामर्थ्य या बद्दल गोल्ला, समाजातील लोकांच्या मनात भीतीयुक्त आदर असतो. अलौकिक शक्तीला आवाहन करुन त्या शक्तीच्या नावाचा उच्चार करणे हे त्यांना भयंकर जड जाते. त्यामुळे ते खोटी शपथ घेत नाहीत. आपल्या संसारावर दैवी कोप होईल, आपणास वाईट दिवस येतील असे त्यांना वाटते. त्यामुळे त्यांच्या दैवतांना आवाहन करुन विधीपूर्वक शपथ घेण्यास गोल्ला समाजातील गुन्हेगार तयार होत नाहीत. या अगोदर ते आपला गुन्हा कबूल करतात. गुन्हेगाराच्या सर्व नातेवाईकांना जातपंचायतीसमोर बोलाविले जाते. आपला या गुन्ह्याशी काही संबंध नाही असे शपथेवर सांगावे लागले. आपली बाजू मांडताना वादी प्रतिवादी या दोन्हीही पक्षांना आपापल्या देवतांची शपथ घेऊन निवेदन करावे लागते. मारुतीच्या मंदीरात जाऊन शेंदूर काढणे, स्नान करून ओल्या अंगाने मारुती, श्रीकृष्ण, खंडोबा या देवतांची शपथ घेणे, या देवतांना प्रदक्षिणा घालणे, मांत्रिकाकडून तांदूळ मंत्रून देणे इत्यादी नाना प्रकार होतात. खोटी शपथ घेतल्यास गुन्हेगाराला थंडी वाजून सहा महिन्याच्या आत त्याचा मृत्यू होतो. अशी अंधश्रध्दा या जमातीत आहे. अशा कारणामुळे खोटी शपथ कोणीच घेत

नाहीत. एखाद्यावेळी मृत्यू झाला तरी संसारात वेगवेगळी संकटे येतात. अशी ही समजूत आहे.

उदा. गाई म्हशी मरणे किंवा कुटुंबात कोणते तरी संकट येणे, दैवी शक्ती काही तरी वाईट करते असा त्यांचा विश्वास आहे या कारणामुळे खोटी शपथ घेत नाहीत.

दिव्य करणे

वादी प्रतिवादींना आपले निर्दोषत्व सिध्द करण्यासाठी पंचायतीने दिलेल्या हुकुमाप्रमाणे वागावे लागते. जातपंचायतीच्या या फारच आवघड परीक्षा आहेत. कारण दैवी शक्ती गुन्हेगाराला क्षमा करीत नाहीत, अशी श्रध्दा आहे. आपले निर्दोषत्त्व सिध्द करण्यासाठी संबंधित व्यक्तीला कोणती दिव्य करावी लागतात याचे काही नमुने : १. उकळत्या तेलाच्या भांड्यातील तळाचे पैसे काढणे. २. कोरड्याने मार देणे. ३. विस्तवाच्या आहाळावर (शेकोटीवर) लोळविणे किंवा विस्तवावरून चालवणे. ४. रांजणात भाजणे. ५. दोरी बांधून विहीरीत टाकणे आणि पोहऱ्यासारखे शेंदणे इत्यादी.

शिक्षेविषयी पारंपारिक नियम

गोल्ला समाजातील जातपंचायतीचे कायदे अलिखित स्वरूपात असतात. ज्या पद्धतीने आधुनिक समाजात कायदे केले जातात. त्या पध्दतीने तयार झालेले हे कायदे नसतात. त्यांच्या कार्यवाहीसाठी सुव्यवस्थित शासन यंत्रणा नसते. जातीपंचायतीने कायदे लिखित करण्याचे नियम गोल्ला समाजात नाहीत. कायदे कसे लागू करावयाचे हे काम देखील जातपंचायतीलाच दिलेले असते. त्यांच्या प्रथा परंपराना मान्य असणारे वर्तन करणाऱ्या व्यक्ती गोल्ला समाजापुढे प्रश्न उभे करतात. व्यक्तीचे समाजातील व्यवहार व्यवस्थित चालविण्यासाठी नियम अगर कायदे यांचे पालन करणे आवश्यक असते. समाजात अस्थिरता निर्माण करणाऱ्या व्यक्तींना योग्य मार्गावर आणणे व अस्थिरता निर्माण करु इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या मनात दहशत निर्माण करणे हे उद्दिष्ट साधण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी चांगल्यारितीने होणे आवश्यक असते.

बायको पळविण्याचा परिणाम (घरघुशी)

एखाद्याने दुसऱ्याची बायको पळवून नेली तर त्यांच्याकडून सर्व गावाला किंवा जातीला जेवण द्यावे लागते. विधवा स्त्रीला अनैतिक संबंधातून अपत्य झाले तर त्या स्त्रिच्या आईवडिलांना व त्या स्त्रिलाही जातीबाहेर टाकले जाते. काही सौम्य स्वरूपात गुन्ह्यांना पाच, अकरा, पंधरा रूपये दंड घेतात. मेहूणीशी किंवा आप्त संबंधाच्या स्त्रीशी वैषयिक संबंध ठेवले आणि ते जर उघडकीस आले तर आरोपीकडून एक कवडी किंवा एक पैसा दंड म्हणून घेतला जातो. हा दंड या जमातीत फारच अपमानकारक मानला जातो. सर्वच भटक्या जमातीत हा प्रचलित आहे. आरोपीने कितीही पैसे दिले तरी हाच दंड घेतात. गोल्ला, गोलेवार समाजातील वृध्द मंडळी सांगतात की, हा

दंड निजामाच्या काळात प्रचलित होता. निजाम सरकार गुन्हेगारास एक पैसा दंड किंवा कवडीचा दंड अशी शिक्षा करीत. एखाद्याने विवाहित स्त्रीबरोबर संबंध ठेवले तर जातपंचायत त्याला एक रुपया दंड करते आणि दोषी स्त्रीला पैसा तापवून डाग देते.

गोल्ला समाजात पंचाची मोठी प्रतिष्ठा असते. पंच म्हणजे परमेश्वर अशी भावना असते. एखाद्या पंचाने थोडाबहुत पक्षपात केला तरी त्याला कोणी हरकत घेत नाही. पण त्याने जास्त अन्यायकारक गोष्टी केल्या तर अशा पंचाला पूर्वी जातीबाहेर टाकत असत.

विधवा स्त्रीचा विवाह

विधवा स्त्रीला गंधर्व विवाह करावयाचा तर त्यावेळेस जातीपंच मान म्हणून काही रक्कम घेत असत. त्याचप्रमाणे विधवा स्त्रीसही तशी मान्यता होती. त्याचप्रमाणे सोडमोकळीक ही तरतूद होती. सोडमोकळीक किंवा काडीमोड घेणाऱ्या स्त्री-पुरुषांकडून काही रक्कम जातीपंचायत घेत असे.

गावपंचायतीचा नमुना

मालेगाव येथील श्रीकृष्ण यादव गवळी पंचायत कार्यालयात, दिनांक ८-९-१९८३ रोजी खालील गावचे पंचमंडळी बैठकीला हजर होते.

१) औरंगाबाद प्रतिनिधी - ५

२) हिंगोली प्रतिनिधी - २

३. खंडवा प्रतिनिधी - ५

४) मालेगाव येथील सर्वच प्रतिनिधी हजर होते. वरीलप्रमाणे चार गावचे प्रतिनिधी बैठकीला जमल्याने बैठक सुरु करण्यात आली त्यात खालीलप्रमाणे ठराव मंजूर झाला आहे.

ठराव क्र १

श्री. मल्लेलु सोनू गवळी रा. जळगाव यांनी मुलाच्या पहिल्या पत्नीला फारकत न देता श्री. यदुभुमन्ना गवळी रा. मालेगाव कॅम्प यांचे मुलीशी गांधर्व विवाह केला आहे. ही सामाजिक दृष्टीने चूक झाली आहे. त्याने ही चूक पंचासमोर कबूल केली. याकरिता सदर बैठकीत पंचांनी त्यांच्या झालेल्या चुकीबद्दल दंड १००० रुपये केला. तो श्री. मल्लेलु सोनू गवळी रा. जळगाव यांनी मान्य केला.

ठराव क्र. २

त्याचबरोबर लग्नाच्या पहिल्या पत्नीला (श्रीमती धनाल शांताबाई रा. खंडवा यांच्या मुलीला लक्ष्मीबाईला) रितीरिवाजाप्रमाणे खोळ भरण्यासाठी १५०० रू. श्री. मल्लेलु सोनु गवळी यांनी द्यावेत असा पंचांनी निर्णय दिला. हा पंचांचा निर्णय मल्लेलु सोनु गवळी यांनी सर्वांसमोर मान्य केला आहे.

ठराव क्र.३

श्री. यदू भुमन्ना गवळी रा. मालेगाव कॅम्प, यांनी येथील पंचांना गांधर्वविवाह करण्याबद्दल रितीरिवाजाप्रमाणे काही सूचना न देता गुपचुप जळगाव येथे नेऊन गांधर्व लावले. हे गांधर्वविवाह रितीरिवाजाप्रमाणे मालेगावला व्हायला पाहिजे होते. परंतु तसेच श्री. मल्लेलु सोनु गवळी रा. जळगाव यांनी आपला मुलगा रमेश हा पहिल्या पत्नीला वागवत नाही आणि त्याने फारकतही दिली नाही असे असताना श्री. यदु भुमन्ना यांनी आपल्या मुलीचे गांधर्व सदर मुलीशी लावायला नको होते. हा सामाजिक दृष्टीने फार मोठा गुन्हा झालेला आहे. हा गुन्हा श्री. यदू भुमन्ना गवळी रा. मालेगाव यांनी सर्व पंचासमोर कबुल केला. पंचांनी त्यांना सामाजिक दंड म्हणून रुपये १००० (अक्षरी एक हजार) दंड केला तेव्हा त्यांनी सर्वांसमोर देण्याचे मान्य केले.

ठराव क्र ४

श्री. मल्लेलू सोनू गवळी रा. जळगाव यांचा मुलगा - श्री रमेश याने पहिल्या पत्नीला श्रीमती धनाल शांताबाई रा. खंडवा यांचे मुलीला, श्रीमती लक्ष्मीबाईला, सर्व पंचासमोर फारकत रू १७, अक्षरी सतरा रुपये दोन स्टॅम्पवर लिहून दिली आहे. स्टॅम्पवर नवरा-बायकोच्या सह्या घेतल्या. श्री मल्लेलू सानू यांचा मुलगा श्री. रमेश रा. जळगाव सह्या केल्या आहेत. स्टॅम्पवर पंचांनी साक्षीदार म्हणून सह्या केल्या आहेत.
तसेच श्रीमती धनाल शांताबाई गवळी रा. खंडवा आणि त्यांची मुलगी श्रीमती लक्ष्मीबाई रा. खंडवा या दोघीनी सदर स्टॅम्पवर (दोन्ही स्टॅम्पवर) सह्या केल्या आहेत. फारकती एकमेकाला देण्यासंबंधी एकमेकाला लिहून आणलेल्या नवरा-बायकोचे यापूर्वीचे संबंध आजपासून संपुष्टात आणल्याचे लिहून देऊन फारकत लिहून दिली आहे. पंचात ठरल्याप्रमाणे हा स्टॅम्प सर्व पंचासमोर लिहून घेतला आहे.

ठराव क्र.५

तसे श्री घंटा सोनू मल्लेलू रा. मालेगाव कॅम्प यांनी आपली भाची श्रीमती लक्ष्मीबाई रमेश गवळी रा. खंडवा यांचेतर्फे श्री. मल्लेलू सोनू गवळी श्री. रमेश सोनु गवळी रा. जळगाव यांचेवर कोर्टात फौजदारी केस दाखल केली होती. तसेच श्री. धनाल निगन्ना गवळी रा. खंडवा (मुलीचे काका) यांनी दाखल केलेली फौजदारी केस (जळगावमध्ये दाखल केलेली केस)

वरिल दोन्ही खटले कोर्टातून श्री. घंटा सोनू गवळी रा. मालेगाव कॅम्प यांनी काढून घ्यावे असा सर्व पंचांनी निर्णय दिला आहे. त्याचप्रमाणे श्री. घंटा सोनू गवळी रा. मालेगाव यांनी हा पंचांचा निर्णय मान्य करुन हा खटला कोर्टातून काढून घेण्याचे मान्य केले आहे.

तसेच धनाल निगम्मा गवळी रा. खंडवा यांनी श्री. मल्लेलू सोनू गवळी रा.

जळगाव व मल्लेलू रमेश गवळी रा. जळगाव यांचेवर कोर्टात दाखल केलेला खटला (फौजदारी) मागे काढून घेण्याचा निर्णय पंचांनी दिला आणि हा निर्णय श्री. धनाल निगम्मा गवळी रा. खंडवा यांनी मान्य केला आहे. त्याचप्रमाणे ही केस कोर्टातून काढून घेतली जावी असा पंचांनी एकमुखी निर्णय दिला आहे. आणि दावा स्वखर्चाने काढून घ्यावा असे ठरले आहे. येणेप्रमाणे कामकाज घेऊन मिटींग संपली.

दंडांचे सर्व पैसे पंचांना मिळाल्यानंतर कॅम्प पंचातर्फे दोन प्रतिनिधी जळगाव व खंडवा येथे जाऊन तेथील तेथील केसेस काढण्यास मदत करून केसेस काढून घेण्यात यावे व तिन्ही पार्टीना मोकळे करावे असे ठरले आहे.

वरील तिन्ही पार्ट्यांनी कबूल केल्याप्रमाणे वरील कारवाई करण्यास पंच जबाबदार राहतील.

आजतारीख १२-९-८३ रोजी येथील पंचासमोर खालीलप्रमाणे पैसे मिळणे बाबत:-

१) श्री. मल्लेलू सोनु गवळी रा. जळगाव यांनी २००० रूपये दिले आहेत. पैकी ५०० रु बाकी येणे राहिले (पंचांचे)

२) यदू भुमन्ना गवळी रा. मालेगाव यांनी ५०० रुपये रोख दिले आहेत. पैकी ५०० रू. बाकी येणे राहिले आहेत. (पंचांचे)

३) श्री. मल्लेलू सोनु गवळी यानी मुलीस (खंडव्याचे) दिलेले १५०० रुपये पैकी १००० रू मुलीस, आहेत. (दि. ९-९-१९८३ रोजी दिले) पैकी ५०० रू (पंचांचे) जवळ ठेवले आहेत. मुलीतर्फे कोर्टातील दावा (केस) काढून घेतल्यानंतर त्यांना (मुलीस) ५०० रुपये देण्यात येतील (एक महिन्यानंतर)

४) श्री. मल्लेलू सोनू गवळी रा. जळगाव याचेकडे दंडापैकी राहिलेले ५०० रु. दिले आहेत.

५) श्री. यदू भुमन्ना गवळी रा. मालेगाव कॅम्प यांनी दंडापैकी राहिलेले ५०० रु. दिले आहेत. '५'

६) गरसोळ तोडण्याचा मान

स्त्रीच्या विवाहितपणाची बाह्य खूण म्हणजे तिची गरसोळ (मंगळसूत्र) होय. ही गरसोळ, काळ्या मण्यांची पोत विवाहित स्त्री विधवा झाली अथवा तिला सद्य वैवाहिक संबंध तोडून दुसरा विवाह संबंध जोडावयाचा असेल तर तिची गरसोळ तोडली जाते. ही गरसोळ तोडण्याचे काम सासूला अथवा सासऱ्याला करावे लागते.

धान्य दळताना अथवा काही प्रसंगी गरसोळी (सौभाग्य) गाणी म्हटली जातात. माझी गरसोळी जतन करा अशी विनंती सून सासूला या गाण्यातून करते.

"पाची ग उतरंडी । सासूबाईचा ग ठेवा ।
माझी गरसोळी । जतन ठेवा ॥
सासू माझी मालनी । तू माझी गरसोळी ।
माझी गरसोळी । जतन ठेवा ॥ '६'

अशा स्वरूपाची गाणी म्हणतात.

अनैतिकतेला आळा

एखादी विवाहित स्त्री घरातून न विचारता गेली आणि ती माहेरी नसली तर जातीचे पंच स्त्रीच्या पालकाला दंड लावतात. व तो दंड पालकाकडून घेतात. किंवा तिच्या वडिलांना तुमच्या मुलीस नीट (चांगल) वागण्यास सांगा. एक दोन वेळेस सांगतात. त्या स्त्रीने जातपंचायतीचे ऐकले नाही तर जातीचे लोक तिला वाळीत टाकतात. तिचा पती तिला काडीमोड देतो. एखाद्या स्त्रीने जातीबाहेरच्या पुरुषाबरोबर संबंध ठेवले तर त्या स्त्रीला जातीबाहेर टाकतात. एखादा पती पत्नीस चांगला वागवित नसेल आणि ते खरे असेल तर त्यांच्या कडून जातीचे पंच दंड घेतात व काडीमोड किंवा सोडमोकळीक घेतात.

एखादी स्त्री पळून जात असताना तिला वाटेतून गावातील किंवा नातेवाईकाने पकडून आणली तर तिला नांदवावे लागते. पंच मात्र त्या स्त्रीला ताकीद देतात 'दुसऱ्या वेळेस असे करू नको.'

गोल्हा, गोलेवार समाजातील एखाद्या व्यक्तीने जातीच्या लोकांना एखाद्या कार्यक्रमास बोलवले नाही; तर दुसऱ्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकतात. त्याला दंड देखील करतात.

एखाद्याच्या लग्नासाठी, साखरपुडा झाला की, त्यावेळेस सर्व जातीपंचांना मान-पान करावा लागतो. तो मान-पान झाला नाही तर त्याला बहिष्कारीत करतात. म्हणजे त्यांच्या घरी लग्न, साखरपुडा, मृत्यू अशा प्रसंगी कोणीही जातीचे लोक जात नाहीत.

जातीबाहेर टाकल्यानंतर जातीत घेण्याचा विधी

एखाद्या व्यक्तीस जातीबाहेर टाकले आहे अशा माणसास सर्व जातीतील लोकांची क्षमा मागून सर्व गावास जेवण द्यावे लागते. नांदेड-लातूर जिल्ह्यात ह्याचे प्रमाण आजच्या काळात कमी झालेले दिसते. परंतू नगर, औरंगाबाद हिंगोली, पुणे, मालेगाव, खंडवा, मुंबई या ठिकाणी आज देखील जातीबाहेर टाकतात.

उदाहरणार्थ :- तारीख १२-६-८५ रोजी पंचाची सभा बोलवण्यात आली. '७'

विषय :- औरंगाबाद तारीख ७-६-१९८५ रोजी आलेल्या पत्राबाबत विचार करणे.

ठराव : पंचांनी सर्वानुमते असे ठरविले की, औरंगाबाद येथील पंचाचे प्रश्नानुसार येथील पंच तेथील पंचाशी सहमत आहेत. त्याचप्रमाणे समाजातील प्रत्येक व्यक्तीने पुटलागार

गणपत पापण्णा गवळी आणि केश बोईन पेटन्ना, उस्मानापुरा हे लोक जो पर्यंत पंचायतीत सामील होत नाहीत, तो पर्यंत त्यांच्याशी संबंध ठेवू नये. असे येथील पंचांनी ठरविले आहे.

हजर पंचाच्या सह्या

१. श्रीकृष्ण यादव गवळी. मालेगाव कॅम्प (नाशिक) याप्रमाणे

जातपंचायतीचा प्रभाव

मुंबई, पुणे, नगर, औरंगाबाद, हिंगोली, मालेगाव, खंडवा या ठिकाणी जातपंचायतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आजदेखील दिसतो. वेगवेगळ्या ठिकाणी जातीचे लोक आहेत. जातपंचायतीचे सभासद लिखित स्वरुपात व्यवहार करून तशी पत्रेदेखील सापडली आहेत. '८'

एखाद्या स्त्रीची सोडमोकळीक (काडीमोड) झाली तर या सात ठिकाणच्या जातपंचायतीला लोक पत्राने कळवतात की, 'आमूक आमूक स्त्रीस सोडमोकळीक झाली आहे. त्या नंतर स्त्रीचे गांधर्व करण्यास मान्यता आहे.'

एखाद्या व्यक्तीस जातीबाहेर टाकले किंवा वाळीत टाकले तर या भागातील लोक त्यांच्या दारात जात नाहीत. किंवा त्या व्यक्तीस देखील इतराच्या घरी येऊ देत नाहीत. त्यामुळे या भागात जातपंचायतीचे वर्चस्व खूप आहे. म्हणून लोक जातपंचायतीला खूप भिऊन वागतात. (पंचायत सभा दि. ४.१०.८१)

"धंताव हिरन्ना याला जातीबाहेर करण्यात आले आहे. आणि त्यांच्यावर संपूर्ण बहिष्कार टाकण्यात आला आहे. त्याचेशी संबंध ठेवण्याऱ्या इसमाला ५१ रुपये दंड करण्यात येईल. बाहेरगावी या बाबत कळविण्याचे ठरले आहे. (अ) पो. फौजदार मालेगाव यांचेकडे तक्रारी अर्ज पाठविण्यात आला आहे. (ब) बैठकीत १०१ रुपये दंड घेण्याचे ठरले आहे.

श्रीकृष्ण यादव गवळी

पंचायत कार्यालय, मालेगाव कॅम्प, नाशिक '९'

जातीतील एक ही माणूस बोलत नसल्यामुळे तो माणूस कंटाळतो. त्यांच्या मुलामुलीची लग्न होत नाहीत. जातीच्या जेवणास किंवा कार्यक्रमास त्यांना बोलावले जात नाही. त्यांच्याकडे जर काही कार्यक्रम असेल तर जातीतील एकही माणूस त्यांच्या घरी जात नाही. माणूस समाजप्रिय प्राणी असल्यामुळे तो समाजाशिवाय राहू शकत नाही. तो जातीपंचायतीस शरण जातो. पंचाना विनंती करतो की, "माझी चूक झालेली आहे. मला माफ करा." सर्व पंच मिळून त्या व्यक्तीस दंड लावतात.

एक हजार, पंधराशे, दोन हजार अशा प्रकारचा दंड लावून जातीच्या लोकांना जेवण देण्यास सांगतात. त्याचप्रमाणे पंचांना देखील जेवण 'मान' म्हणून द्यावे लागते.

अशाप्रकारे जातीबाहेर टाकलेल्या व्यक्तीस जातीत घेतात.

जातीत घेतलेल्या लोकांकडून घेतलेला दंड मात्र सात गावांना पाठवितात. तो अशा प्रकारे अकरा, पंचवीस, एकावन्न, एकशे एक, एकशे एक्कावन्न रूपये प्रत्येक जाती पंचायतीत दंड म्हणून पाठवून देतात. जातीच्या प्रमुख व्यक्तीच्या नावावर मनीऑर्डर करतात. त्याची पावती उपलब्ध आहेत. अशा अनेक पावत्या जातीबाहेर टाकल्याचे पुरावे मालेगाव येथे आहेत.

नगरला आलेली एक मनीऑर्डरची पावती अशी आहे '१०' इसलिय खंडवा ग्वाल समाज की ओरसे नगर ग्वाल समाज को ११=०० रुपये भेज रहे है।

सात गाँव ११=०० रु दंड भेजे है।

दि. २४-११-८०

पाठविणाऱ्याचे नाव

लक्ष्मण यादव गवळी

माली कुँवा (खंडवा) म.प्र.

दुसरे एक पत्र खंडवा येथील आले आहे. '११'

श्रीकृष्ण यादव (गोल्ला) समाज खंडवा (म.प्र.)

अध्यक्ष,

अहमदनगर श्रीकृष्ण यादव गवळी गोल्ला समाज भिंगार, अहमदनगर.

श्रीमान निलम मोहन, मनमोहन भुमन्ना आसाराम कावट, प्रभाकर सकने, एवं समस्त नगर की पंच मंडली को खंडवे की यादव पंच मंडली की तरफसे नमस्कार

आगे समाचार यह है की खंडवे मे श्री. रंगेट पापन्ना वल्द सायन्ना का स्वर्गवास दि. ४.९.८९ को हुआ। सर्व पंच मंडळी के द्वारा सर्व कर्म किया। पश्चात रंगेट सम्म के द्वारा सर्व पंच मंडळी को करित कर रंगेट पापन्ना के परिवारवालो को समाज मे लेने का आग्रह किया। इसके पश्चात सर्व पंच एकत्रित होकर इस बारे मे विचार विर्मश करके उनके घर के पूलडके और एवं लडकेकी समाज में मिलाकर उसको दंड लिया गया। यह दंड की राशि सात गाँव की पंच को भेजी है।यह राशी पंच्चीस रुपये मात्र है। यह सूचना नगर की समस्त पंच मंडळीको बताना। यह खंडवे की पंच ने फैसला किया।

अध्यक्ष

श्रीकृष्ण यादव (गोल्ला) समाज खंडवा (म.प्र.)

नगर भिंगार गोल्ला जातपंचायतीचे सभासद :- '१२'

१. आसाराम कावटे

२. दत्तू सकने

३. तुकाराम कावटे

४. अनिल आखमोडे (यादव)

५. अण्णा सकने

६. बबनराव आखमोडे

हे सहा लोक जातीचे पंच म्हणून काम करतात. बँकेत त्यांच्या नावाने जोड खाते आहे. त्या खात्यावर जातीचे पैसे जमा करतात.

जातीबाहेर टाकण्याची कारणे '१३'

१. एखादी व्यक्ती समाजात जात पंचायतीने ठरवून दिलेल्या पारंपारिक नियमाविरुध्द असेल तर -

२. एखाद्याची बायको किंवा बहीण दुसऱ्या जातीतील पुरुषाकडे जात असेल तर-

३. जातपंचायत भरली असता विनाकारण जातीतील लोकांना त्रास देणाऱ्यास-

४. दुसऱ्या समाजाची बायको केली, अगर रांड ठेवली तर-

५. जातपंचायतीने दिलेला निर्णय ऐकला नाही तर जातीबाहेर टाकतात.

जातीत घेण्याची पध्दती '१४'

जातीत घेत असताना सर्व पंच बोलावून त्या पंचासमोर त्यानी माफी मागितली पाहिजे. पंचाना विनंती केली पाहिजे. पंचानी ठरवलेला दंड कबूल केला तरच त्याच्या बरोबर बोलले जाते. अगोदर जातीतील सर्व लोकांना चांगल्याप्रकारे जेवण द्यावे लागते. रोख रक्कम पन्नास शंभर रुपये ते पंधराशे, दोन हजारपर्यंत दंड ते लावू शकतात. आतापर्यंत पाचशे रुपये एक हजार रुपयापर्यंत दंड लावलेला आहे. जातपंचायत भरल्यास त्या पंचायतीत पंच आणि काही म्हातारे लोक असतात. परंतु एखादा निकाल मात्र पंच देतात.

पूर्वी तोंडीच व्यवहार होत असत.परंतु आजच्या परिस्थितीत जमलेल्या सर्व लोकांच्या सह्या घेतात. जातपंचायत बोलावली असताना त्यांचा निकाल कुणाच्याही बाजूने लागो परंतु ज्यांना जातपंचायत बोलावण्याची गरज असते. त्यांनीच अकरा रुपये जातपंचायतीस द्यावे लागतात. एखाद्याने गुन्हा केला तर पंच त्यांना जातीबाहेर टाकतात. पण त्याना जातीत घेत असताना दंड घेतात.

जातीबाहेर टाकलेल्या लोकांबरोबर इतर लोकांचे वागणे '१५'

प्राचीन काळी जातीबाहेर टाकलेल्या लोकांशी इतर लोक बोलत देखील नसत. पण आज मात्र इतर लोक त्यांच्याशी बोलतात. परंतु जातीतील कोणत्याही कार्यक्रमास बोलवत नाहीत. एखाद्याचा मृत्यु जरी झाला तरी त्या व्यक्तीस बोलवत नाहीत. जातीबाहेर असलेल्या व्यक्तीचा नातेवाईक मृत्यु पावला तर त्याला दुरुन सर्व काही पाहता येते. जातीबाहेर असलेल्या लोकांच्या कोणत्याही कार्यक्रमास (लग्न/बारसे) जातीतील लोक जात

नाहीत. किंवा त्यांच्याकडून मानही स्वीकारत नाहीत.

जातपंचायतीच्या सभासदांची निवड '१६'

१. जातीतील पंच हे पद वंशपरंपरेने चालवितात. जातीतील पंचाने गुन्हा केला तर त्याला देखील वाळीत टाकतात.

२. जातीबाहेर टाकलेल्या (वाळीत) माणसाला जातीपंच म्हणून राहता येत नाही. त्या ठिकाणी नविन माणसाची निवड करतात.

३. प्रमुख पाच पंच असतात. त्यात एक प्रमुख असतो. त्यास चौधरी म्हणतात.

४. नवीन पंच निवडतात तेव्हा मात्र जमातीतील सर्व लोक जमतात. त्यांच्या मतानुसार पंच निवडतात.

५. चौधरी पदावरील पंच त्यांच्या मनाप्रमाणे पंच म्हणून एखाद्या व्यक्तीस घेत असे. पण आजच्या काळात मात्र दंडेलशाही चालत नाही. सध्या निवडणूका देखील घेतात. जातीतील सर्व कार्यक्रमाची व्यवस्था जातीतील प्रमुख चौधरी करतात. उदा. साखरपुडा, लग्नाचा कार्यक्रम, मृत्यु ही कामे अगोदर चौधरीस सांगितल्यास तो जातीतील एका पंचास सर्व काही सांगून व्यवस्था करतो. जाती पंच निवडताना फक्त पुरुषांना प्राधान्य आहे. सर्व पुरुष मतदान करतात. स्त्रीयांना मात्र कोणतेही स्थान जातीपंचायतीत राहत नाही.

जाती पंचायतीच्या सभेचा खर्च '१७'

जातीतील आवश्यक गोष्टी देणे-घेणे उदा. भांडी, कढई, ग्लास, ताट सर्वांना त्याचा उपयोग होतो. ते देणे, घेणे एखाद्या व्यक्तीस कोणी वारसदार नसल्यास अशा माणसाच्या अंतयात्रेसाठी लागणारा खर्च जातीपंचायतीतील पैशातून करतात. परगावचे जातीपंच बोलवतात. त्याचा खर्च जातीने जमा केलेल्या पैशातून करतात. उदा. बाहेरगावच्या पंचाचा खर्च दि. ८.९.८३

१. खंडवा :- पाच प्रतिनिधीना भाडे खर्च १५० दिले.

२. औरंगाबाद :- पाच प्रतिनिधीना प्रवास भाडे १०० दिले.

३. हिंगोली :- दोन प्रतिनिधीना प्रवास भाडे ६५ दिले.

जेवण खर्च - १५० रुपये

गादी-चादरी, तक्की, भाडे - ४०

(दोन दिवसांचे भाडे)

चहा पाणी खर्च ४३.५०

२३३=००

भाडे खर्च ३१५=००

५४८=५०

१=५०

श्री बालन्ना यादव जमा ४५०=५०

१०००=००

पंचायती भांडी रिपेअर्स २२०=००

अशा प्रकारे जमा ठेवित असतात. ते उदाहरणादाखल दिले आहे. हे सर्व मालेगाव

श्रीकृष्ण यादव गवळी

पंचायत कार्यालय गवळीवाडा

मालेगाव कॅम्प, नाशिक. '१८'

उल्लेख चार

मुलाखती : संदर्भ टीपा

१. संगमकर खंडेराव गुरुजी देगलूर. जि. नांदेड
२. रामजी संतोबा, संभाजी गणपत आयतलवाड वंजरवाडी ता. उदगीर, लातूर
३. संगमकर खंडेराव गुरुजी देगलूर. जि. नांदेड
४. आसाराम कावट झेंडेगेट अ. नगर
५. नागन्ना लक्ष्मण, मालेगाव कॅम्प,मालेगाव जात पंचायत,नाशिक
६. पार्वतीबाई संभाजीराव आयतलवाड वंजरवाडी उदगीर, लातूर
७. दत्तू सकने,भिंगार, अ. नगर
८. आसाराम कावट झेंडेगेट अ. नगर
९. नगर जात पंचायतीला आलेले मूळ पत्र
१०. मनिऑर्डर पावती आसाराम कावट झेंडेगेट अ. नगर
११. पत्र आसाराम कावट झेंडेगेट अ. नगर
१२. नगर भिंगार जातपंचायत सभासद आसाराम कावटे झेंडेगेट अ. नगर
१३. सोनू यादव मालेगाव कँम्प, नाशिक
१४. नागन्ना लक्ष्मण यादव मालेगाव कॅम्प, नाशिक व आसाराम कावट झेंडेगेट अ. नगर
१५. दशरथ यादव, बाबुलाल यादव औरंगाबाद कँम्प.
१६. खंडेराव गुरुजी देगलूर जि. नांदेड.
१७. मालेगाव कॅम्प जातपंचायतीचा जमाखर्च नागन्ना लक्ष्मण यादव मालेगाव कँम्प नाशिक.

वर उल्लेखित व्यक्तींच्या संग्रही असलेली माहिती समक्ष भेटी व मुलाखतीतून मिळाली आहे.

. उल्लेख पाच

गोल्ला लोकसाहित्य

गोल्ला जमातीच्या, मराठवाड्यातील लातूर, नांदेड या भागातील लोकसाहित्याचा प्रामुख्याने अभ्यास केला आहे. नांदेड व लातूर जिल्ह्यात मराठवाड्यातील इतर जिल्ह्यांपेक्षा गोल्लांची वस्ती जास्त आहे. गोल्लांच्या लोकगीतांचे वाङ्मयीन विशेष सांगण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. हे करताना लोकगीता मागील प्रेरणा त्यांची रचना, भाषा, वाङ्मयीन सौंदर्य, त्यापासून मिळणाऱ्या आनंदाचे स्वरुप गोष्टींची चर्चा केली आहे. या लोकगीतांचे स्वरूप आणि त्यांचे वेगळेपण कशा पध्दतीने अनुभवास येते.ते सांगण्याचा प्रयत्न केला आहे.


लोकगीते मराठीतून का ?

गोल्ला जमातीमध्ये जी लोकगीते विशेषकरून म्हटली जातात. त्यात स्त्रियांच्या ओव्या, जात्यावरील गाणी, पाळणे, डोहाळे, विवाहाच्या प्रसंगी म्हटली जाणारी गाणी आहेत. गाणी मराठी भाषेत आहेत. एखाद्या गावात एक-दोन कुटुंब गोल्ला समाजाची असल्यामुळे बहुसंख्य मराठी बोलणाऱ्या लोकांचा त्यांच्यावर परिणाम झालेला आहे. त्यामुळे त्यांची गाणी, सन, उत्सव सर्व काही मराठी पध्दतीने होत आहेत.

लोकगीतांचे प्रमुख प्रकार

लोकगीतांची विपुलता पाहता, त्याची प्रकारानुसार मांडणीकरणे कसे शक्य आहे, हे पाहणे योग्य होईल. लोक गीतांचे प्रकार किती व कसे करता येतील हा एक चर्चेचा विषय आहे. अनेकांनी या संदर्भात चर्चा केलेली आढळते. सर्वसाधारणपणे लोकगीताचे प्रकार पुढील पडतात.

तक्ता पुढीलप्रमाणे '१'



डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. सराजिनी बाव्रर व दुर्गा भागवत यांनी आपापल्या परीने लोकगीतांचे प्रकार पाडले आहेत.

लोकगीताचे प्रकार काटेकोरपणे करता येतील का ?

लोकगीतात ओवी, गीते, फार मोठ्या प्रमाणात आढळतात. अर्थ असा की, ओवीचा उपयोग लोकगीतातील सर्व प्रकारच्या गीतात केलेला आढळतो. तसेच प्रादेशिक उल्लेख संतसंदर्भ, रामायण, महाभारत संदर्भ हे वरील सर्व प्रकाराच्या गीतात सापडतात. रचनेवरून प्रकार करावे म्हटले तर पुन्हा ते स्वरूप सर्वांगपरिपूर्ण होणार नाहीच. वरील प्रकारे स्थूल स्वरूपात वर्गीकरण करून सुद्धा काटेकोरपणे ते एक दुसऱ्यापासून वेगळे करता येईल का याची शंकाच आहे. एकूण पाहता अशा प्रकारे काटेकोर प्रकार करण्याचा प्रयत्न पूर्ण सफल होत नाही. असे म्हणावेसे वाटते. त्याच्या प्रकाराविषयी किती ही काटेकोरणा आणण्याचा प्रयत्न केला तरी ते शक्य होणार नाही. ही लोकगीतांची असलेली मुक्तता हेच लोकगीताचे खरे स्वरुप होय. या संदर्भात काही विचार पुढीलप्रमाणे -

१) ग्रिम (Grimm)

"लोकगीत बनत जाते" हे श्री ग्रिम यांचे प्रसिध्द सूत्र आहे. "लोकगीते हे व्यवहारज्ञानावर व वास्तव घटनांवर आधारित आहे. लोकगीते हे काही भावनेच्या आवेगात तयार झालेले अंधुक अस्पष्ट साहित्यचित्र नव्हे" असे लोकगीताबद्दल सांगितले जाते. (A Trasurary of American song Vol.36 Music for the Millovns Series) '२'

२) शल्फ विलियमस्

हा लेखक म्हणतो,"लोकगीतात नवे आणि जुने असे नसते. लोकगीत हे

एखाद्या जंगलातील मोठ्या वृक्षासारखे आहे. त्यांची पाळेमुळे भूतकाळात खोलवर रुजलेली असतात.पण त्याला नित्यनवी पालवी फुटत असते. फांद्या येत असतात. आणि ते नित्य नवी फळे धरत राहते. '३'

३) डॉ. यदूनाथ सरकार

यांनी लोकगीतांची वैशिष्टये सांगितलेली आहेत. ती अशी गीतांची द्रुतगती, भाषेची सुलभता, सुबोधता, प्राथमिक स्वरुपाच्या पण सर्वस्पर्शी भावना, सूक्ष्ममार्मिक, गूढ, प्रभावी, विश्लेषणापेक्षा कृतीवर भर असलेले स्थूल स्वरुपाचे साहित्यिक संस्कार नसलेले, ही खऱ्या लोकगीताची प्रमुख आवश्यक लक्षणे आहेत. '४'

४) श्री देवेंद्र सत्यर्ती

यांनी 'फोक साँग' यासाठी ग्रामगीत आणि 'फोक-लोअर' यासाठी गीतकथा असा शब्दप्रयोग केला आहे.'५'

५) श्रीराम नरेश त्रिपाठी

यांनी 'ग्रामगीत' हा शब्द अधिक चांगला पसंत केला आहे. 'रूरल साँग' आणि 'फोक साँग' ही दोन्ही त्याच्या मते ग्रामीण गीतेच होत. '६'

६) श्री. कृष्णनंद गुप्ता

यांच्या मतानुसार 'ग्रामगीत' छोटे असू शकते, आणि रचनेच्य दृष्टीने त्याची रचना आधुनिक असू शकते. 'ग्रामगीते' छोटे होते है।और रचनाकाल की दृष्टीसे आधुनिक भी हो सकते है । '७'

७. डॉ. सत्येंद्र

या विधानाशी सहमत नाहीत. त्यांच्या मते 'ग्रामगीत छोटा ही नही, बडा भी हो सकता है ।" ग्रामगीते लहानच काय, दीर्घ पण असू शकते (भारतीय लोकसाहित्य शाम परमार पृ. ७४) '८'

१९२६ साली डॉ. केतकरांनी 'जानपद गीते' असे शब्दे वापरले आहेत. (लोकसाहित्याची रुपरेखा दुर्गा भागवत पृ. ४९८) डॉ. कमलाबाई देशपांडे यांच्यामते मराठी लोकगीते, जानपदगीते तथा ग्रामगीते हे सर्व शब्द एकार्थीच आहेत. तथापि लोकगीत हा शब्द अधिक वापरात आहे. '९'

एकूण वरील लोकसाहित्याविशारदांनी केलेले प्रकार व चर्चा लक्षात घेता, लोकगीतांचे प्रकार किती कोणते व कोणत्या सूत्राने केले असता पूर्ण सशास्त्र व सर्व समावेशक होतील. हे निःसंदिग्धपणे सांगणे कठीण आहे. अगदी स्थूल मानाने रचनेनुसार व आशयानुसार वर्गीकरण करणे इष्ट होईल असे वाटते. स्त्रीयांची गीते पुरुषांची गीते, मुलांची गीते व गोंधळी वासुदेव इ. लोकजातीची गीते. आदिवासी गीते कोकणी, खानदेशी, गोल्ला इत्यादी प्रादेशिक तत्त्वानुसार देखील वर्गीकरण करणे शक्य आहे.

परिसरातील लोकगीतांचे प्रकार

या लोकगीताचे प्रकार १. रचनेनुसार २. आशयानुसार हे प्रकार अर्थात अभ्यासाच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून केलेले आहेत. ते अगदी स्थूल स्वरुपात आहेत. ते देखील लक्षात ठेवले पाहिजे.

१. रचनेनुसार :-

१) ओवीगीते २) तालबध्द गीते, बडबडगीते ३) ओवीगीते सदृश्यगीते

२. संदर्भ व आशयानुसार :-

१) जात्यावरच्या ओव्या २) सण उत्सवांची गाणी ३) देवतांविषयी गाणी ४) पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ ५) लग्न पाचवी बारसे इ विधीसंबंधी गीते ६) श्रमगीते असे प्रकार करुन त्याचे स्वरुप पुढेच स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

गोल्हा, गोलेवार परिसरात म्हणजे लातूर, नांदेड जिल्ह्यात आढळणाऱ्या गीतांपुरतेच मर्यादित आहेत. हे ध्यानात घेतले पाहिजे. यातील सर्व गीते अगदी नेमकी त्याचवेळी म्हटली जातात. असेही आढळत नाही. अंगणात बसले की या सर्व प्रकारची गाण्याची उजळणी होत असते. आठवून ती गाणी गायिली जातात. मुलेही गाणी अंगणातच शिकतात. नवीन तयार करण्याचा प्रयत्न करतात. जुन्यांना उजाळा देतात. रोज सायंकाळी अंगणाअंगणातून लोकसाहित्याची जणू शाळाच भरते. हीच गोष्ट चांदण्या रात्रीची आणि हीच मारुती मंदिरातील. त्या त्या प्रसंगी तर ती मोठ्या उत्साहाने म्हटली जातात. परंतु खरे पाहता या गीतांना काळ, वेळ लागत नाही. मनात आले की, मनमुरादपणे गायची. ही गीते मनमुरादपणे म्हटली जातात. म्हणूनच त्याचे प्रकार करताना संभ्रम निर्माण होतो.

प्रत्येक प्रकारचे स्वरूप स्पष्ट केले आहे. स्वरूप स्पष्ट करताना आवश्यक तेथे उदाहरणे देण्याचा प्रयत्न केला आहे. यावरून प्रकारांचे स्वरूप स्पष्ट होते.

१. जात्यावरच्या ओव्या

जात्यावरच्या ओव्या असे म्हटले असले तरी वस्तूतः त्यात स्त्रियांची श्रमगीते अभिप्रेत आहेत. स्त्रिया दळण-कांडण करताना, निंदणी खुरपणी, कापणी करताना एकीकडे कामाचा झपाटा चालू असतो. आणि दुसरीकडे मुखातून या ओव्या दळताना किंवा अन्य कामे करताना म्हटते असे दिसते. परंतु जोडीदारीणी असल्या म्हणजे या गीतांना उधाण येते. ओव्या म्हणताना चढाओढ लागते. या गीतांमधून सारे स्त्रीजीवन उभे राहिलेले असते. श्रध्दा, राग, लोभ, सुख-दुःख या भावना आपोआप व्यक्त झालेल्या असतात. मराठी लोकसाहित्यात ओवी गीताची चर्चा फार मोठ्या प्रमाणावर झालेली आहे.

"पहिली माझी ओवी । दशरथ राजाच्या कडेला ।
सीता घेऊन कडेला ।राम भवला चढला ॥ १०

माझ्या जीवाला वाटतं ।
बाई देव बालाजीला जावं ।
गोविंद पटण्यांमधी ग रहावं ।
पुढं लक्ष्मीचं गावं ॥ '११'
देवाला ग मागितले । पाची पुत्राची पंगत ।
भोळ्या राजाची संगत ॥१॥

आम्ही तिघी ग बहिणी । तिन्ही गावच्या वांझरा ।
मधी राघुचा पिंजरा ॥२॥ '१२'

२. सण-उत्सवांची गाणी

ही गाणी विशेषत: मुले व मुली म्हणताना आढळतात. दिवाळी सणाला मुले गवताच्या दिवट्या करुन घरोघरी गाणी म्हणताना तेल मागतात. ही गाणी बडबडगीतांच्या स्वरूपाची असतात.दिवाळीत मुलीची गाणी फारशी ऐकू येत नाहीत. नागपंचमीला मुलींची गाणी स्वतंत्रपणे ऐकू येतात. स्त्रिया देखील त्यात मोठ्या प्रमाणात सामील होतात.
उदा.

आला ग सण पंचमीचा ।
छंद लागे माहेरचा ॥१॥ '१३'

"दिन दिन दिवाळी । गायी,म्हशी ओवाळी ।
गायचा चारा बैल मोरा ।
बैलांच बाशिंग किकऱ्यान तासीन ।
किकर कुणाच लक्ष्मणाचं ।
लक्ष्मण कुणाचा आईबापाचा ॥ '१४'

नागपंचमीच्या, दिवाळीच्या वेळेस अनेक बायका एकत्र येऊन अनेक गाणी म्हणतात.

३. देवतांविषयी गाणी

देवतांविषयी गाणी मुख्यत्वे करून स्थानिक देवताविषयी आढळतात.अन्य देवतांचे संदर्भ गाण्यातून आढळतात. काही वेळा राम, कृष्ण, खंडोबा, मारुती याच्या गाण्यांना

मंत्रसामर्थ्य आहे. अशा श्रध्देने म्हणतात. एकीकडे देवतांचे विधी चालू आणि दुसरीकडे बायका मोठ्या श्रध्देने ही गाणी म्हणतात. ते विशेष वाटते.

''बाण मागी बाई बाण । बाण शिरले भुईत ।
राम कुणाचा वईत ॥१॥
बाण मागी बाई बाण । बाण लागले चळक ।
नव्हती रामाची वळक ॥२॥
बाणा मागे बाण । बाण येऊद्या सोईचा ।
अंकुश रामाच्या वईचा ॥३॥'१५'

या गीतांचे स्वरूप जात्यावरच्या ओवी गीतासारखे आहे. या वरून कोणत्या वेळी कोणत्या स्वरुपाची गाणी म्हणावित यां विषयी काहीही निर्वंध नाहीत असे दिसते.

२.

''नादाने जीव माझा घाबरला हो घाबरला ।
चला वेणू कोठे वाजला ॥१॥

करीत होते घरी कामधंदा ।
शेणाने हात माझा भरलेला ।
चला वेणू कोठे वाजला ॥२॥

३.

सखा सहाजणी देवाच्या गवळणी ।
खडा गोटा नसू दे अंगणी ।
खडा रुतला हरीच्या चरणी ।
सखा सहाजणी देवाच्या गवळणी ॥१॥

४. पांडुरंगाची भक्ती व संतसंदर्भ

पांडुरंगाची भक्ती व संदर्भ यांची तर विपुल गाणी सापडतात. त्यात जात्यावरच्या ओव्यांचा भरणा अधिक असतो.केवळ सोयीच्याच दृष्टीनेच एक स्वतंत्र प्रकार म्हणून याकडे पाहता येईल. या दृष्टीने अनेक उदा. देता येतील.

उदा.

'पहिली ग प्रदक्षणा । लुटा भोजनाचा रंग ।
बोला पांडुरंग । बोला पांडुरंग ॥१॥

घेत पैशाचा बुका । घालते विठ्ठलाच्या मुका ।
बोला पांडुरंग । बोला पांडुरंग ॥२॥

घेत पैशाचा माळा । घालते विठ्ठलाच्या गळा ।
बोला पांडुरंग । बोला पांडुरंग ॥३॥ '१८'

पंढरपूरापासूनी । आळंदीचा दिवादिस ।
इंद्रायणी समाईक । तुका आंघोळीला बस ॥१॥

पंढरपूरापासूनी । आळंदी ऐंशी कोस ।
देवा या विठ्ठलाच्या । विन्याला मोती घोस ॥२॥

''दुसरी माझी ओवी । दुसरे दुजेभाव ।
अंतर तुला ठाव । पांडुरंगा ॥१॥

तिसरी माझी ओवी । तिनशे आठवले ।
सद्‌गुरु भेटले । पांडुरंगा ॥२॥'' '२०'

लग्न, पाचवी, बारसे इ. विधी संबंधी गाणी

यांना विधीगीते असे देखील म्हणता येईल. लग्न समारंभाच्या बाबतीत तर प्रत्येक विधीच्या वेळेस स्वतंत्र असे गीत आढळते. पाचवी,बारसे या प्रसंगी 'कृष्णजन्म' कथागीत विशेष गायिले जाते. या गाण्यामध्ये विविधता आहे. पुरुष मात्र अशी गाणी म्हणताना दिसत नाहीत ही पूर्णत: स्त्रीगीतेच आहेत. उदा.

''शेरभर सोन्याचं बाशिंग ।
नवरा निघाला शिवबंदी ।
तिथ अडवला मारुती ।

तुज तुला शेला देईल । मज म्या नवरी नेईल ॥
शेरभर सोन्याचं बाशिंग ॥१॥

नवरा निघाला शिवबंदी ।
तिथं अडवली धुव्रपदमाय ।
तुज तुला काकन देईन ।
मजमला नवरी नेईल ।
शेरभर सोन्याचं बाशिंग ॥२॥

"मात्र म्हणूनी म्या माय ।
होईन लग्नाची वरमाय ।
लगीन माझ्या चिनबाईच ।
वऱ्हाड कोण कोण ॥१॥

भाऊ म्हणूनी मी भाऊ ।
आणीन लग्नाचे गहू ।
लगीन माझ्या चिनबाईच ।
वऱ्हाड कोण कोण ॥२॥

एक महिना झाला हो सासऱ्या ।
चंद्र सभेहून आणाव्या उसऱ्या ।
जू बाळा जू जू रे ॥१॥

दोन महिने झाले हो सासू ।
इंद्रसभेत जावून बसू ।
जू बाळा जू जू रे ॥२॥

तीन महिने झाले हो दिरा ।
थंड पाण्याचा खांदावा हिरा ।
जू बाळा जू जू रे ॥३॥

चार महिने झाले हा जावे ।
कच्च्या दूधातला करंज्या खावे ।
जू बाळा जू जू रे ॥४॥ '२३'

भलरी गीते किंवा श्रमगीते

शेतात कामे करताना विशेषत: कापणी,निंदणी करताना व पडत्या पावसात काम करताना स्त्रिया मोठ्या प्रमाणावर ओव्या गाताना दिसतात. पुरुष क्वचित एखादी लावणीच गुणगुणताना दिसतात. म्हणूनच भलरी गीतांची जी चर्चा इतरत्र झालेली आहे तशा स्वरूपाची गाणी आढळत नाहीत.

१.

माझ्या जिवाला बाई वाटतं ।
देव बालाजीला जावं ।
गोविंद पटण्यामधी ग रहावं ।
अन् पुढ लक्ष्मीचं गाव ॥ ॥ '२४'

२.

सखा सहाजणी देवाच्या गवळणी ।
खडा गोप नसू दे अंगणी ।
खडा रुतला हरीच्या चरणी ।
सखा सहाजणी देवाच्या गवळणी ॥१॥ '२५'

७. संकीर्ण

या प्रकरणात कूटरचना, गावांची नावे एकत्र गुफणारी गीते, नव्याने आढळणाऱ्या रचना, इत्यादी गीतांचा समावेश केला आहे. शिवाय लावणी गवळणी सदृश्य रचना स्वतंत्र गटाने दिल्या आहेत. तमाशातील गीते असे त्यांना म्हणावे लागेल. परंतु लोकगीताचे ते एक जवळचे अंग आहे. कर्ता न आढळणे हे लोकगीतांचे वैशिष्टये त्यात आढळते.

तीच गोष्ट भारूडातून आढळणाऱ्या कथागीताची आहे. ती कथा गीते याच भागात परिचित केली आहेत. अगदी मर्यादित अर्थाने याचा लोकगीतात समावेश केला आहे. अशा गीतांचे संकलन करता आलेले नाही.

रचनेनुसार प्रकारांचे स्वरुप

आशयानुसार गोल्हा, गोलेवार जमातीचे लोकगीताचे कोणते प्रकार करता येतील हे पाहण्याचा प्रयत्न केला आहे. आता रचनेनुसार कोणते प्रकार आढळतात. ते पाहू या.

१. ओवी

या भागातील गीते ही मुख्यत्वेकरुन स्त्रियांनी गायिलेली ओवी गीतेच आहेत. ही ओवी पूर्णत: मुक्त स्वरूपाची दिसते. काही ओव्यांचा आधार घेऊन त्यांचे स्वरूप समजावून घेऊ व त्याचे प्रकार कसे पडतात ते पाहण्याचा प्रयत्न करु.

मांडवाच्या दारी । पळाटाचा भारा ।
विठाबाईच्या केशा । खराट्यानं वारा ॥ '२६'

येथे सर्वसाधारणत: या ओवीत चारही चरणांत सहा किंवा सात अक्षरे येतात. दुसऱ्या व चवथ्या चरणात यमक साधले आहे. कधी कधी अक्षरांची अनियमितता आढळते.

"पंढरपूरापासुनी । आळंदीचा दिवा दिस ।
इंद्रायणी समाईक । तुका आंघोळीस बस ॥१॥ '२७'

अक्षराचा अनियमितपणा असला तरी लयबध्दतेत तो कळत नाही. अक्षरावरून मात्रांची संख्या मोजल्यास त्यातील अनियमितता तर फारच जाणवेल. अक्षर संख्येत मात्र थोडी समानता दिसते. ह्या साऱ्या समानता असमानतेला एक लय असते.

सकाळी उठून । बघते खालतं ।
जहाज मोत्याचं हालतं ॥१॥ '२८'

या प्रकारच्या ओवीत तीन चरण असून पहिल्या दोन चरणात साधारणत: समान अक्षरे असतात. शेवटच्या चरणात त्या दोन चरणातील अक्षरांचा साधारणत: निम्मी किंवा एखादे दुसरे अधिक अक्षर असते.

भाजी मधी गं भाजी । एवढा आंबाडाचापाला ।
रावणाच्या बागामधी । मोसंबीचा झाठा झाला ॥१॥ '२९'

या चार चरणाच्या ओवीत प्रत्येक चरणांत साधारणत: असमान अक्षरे असतात. परंतु दुसऱ्या आणि चवथ्या चरणात यमक असते. पहिल्या व तिसऱ्या चरणात वरीलप्रमाणे समान अक्षरे आढळतात.

सकाळी उठून । रामाचं सपर ।
अंगण माझ वावर । धरण्यामातेवर ॥१॥ '३०'

या चार चरणाच्या ओवीत अक्षरांची असमानता असली तरी पहिल्या तीन चरणापेक्षा चवथ्या चरणात अक्षरे कमी अधिक असतात. दुसऱ्या व तिसऱ्या चरणात यमक साधण्याचा प्रयत्न दिसतो.

मराठी छंदोरचनेचे अभ्यासक ना.ग.जोशी यांनी ओवीसंबंधी बरीच चर्चा केली आहे. ही चर्चा विचारात घेता असे म्हणावेसे वाटते की, या लोकगीतांतून परंपरेने चालत आलेल्या लयबध्द ओवीगीतांतून संवाद कवीच्या ओवी रचनेचा ग्रंथिक ओवीचा विकास झाला असावा. या साऱ्या ओव्या,गेय, लयबध्द असून त्या गाताना परंपरेने मात्र सरत्यापुरत्या केल्या जातात. त्यामुळे ग्रांथिक ओवीप्रमाणे तंत्रदृष्ट्या त्यांच्या मात्रा किंवा लयक्रम मांडून दाखविणे अत्यंत कठीण व अपूर्णच वाटणारे काम दिसते. केवळ रचनेची स्थूल कल्पना यावी म्हणून येथे ओवी प्रकार मांडून दाखविण्याचा ढोबळ असा प्रयत्न केला.जेथे ठेका येतो किंवा थांबावे लागते अशा ठिकाणी दंड दिला आहे. प्रत्यक्ष ऐकताना तो दंड कदाचित आगेमागे होण्याची शक्यता आहे. साधारणत: स्वरुप काय, एवढेच दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. '३१'

२. खेळगीते किंवा बडबडगीते

स्त्रियांची खेळगीते प्रत्यक्ष फेर धरून नाचताना हातात हात घालून तंगड्या उडवून म्हणावयाची गाणी उत्सवाची गाणी, अर्थाच्या दृष्टीने आज जी दुर्बोध वाटतात. किंवा निरर्थक वाटतात. अशी बडबडगीते यांचा समावेश या प्रकारात केला आहे.

या गीतांच्या रचनेच्या दृष्टीने वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे दिसतात.

१. यात ताल, ठेका यांना अत्यंत महत्त्व असते. अर्थापेक्षाही ते अधिक असते. असे दिसते.

२. यमक मात्र साधले जावे याकडे विशेष कल आहे.

३.या गीतांना एक प्रकारची द्रुत अशी गती भासते.

४. नृत्य आणि वाद्यांचा ठेका कधी कधी या गाण्याना लाभतो टाळ्याचा ठेका तर या गीताना लागतोच. विशिष्ट मात्रांचे आवर्तन यात आढळते. परंतु तांत्रिक चर्चा येथे करण्याचा प्रयत्न केलेला नाही.

उदा.

"दिनदिन दिवाळी गायी म्हशी ओवाळी ।
गायीचा चारा । बैल मोरा ।

बैल कुणाचा । लक्ष्मणाचा ।
लक्ष्मण कुणाचा । आईबापाचा ॥ '३२'

३. ओवी आणि लावणी - यांशी सदृश्य रचना

या गीतात रचनेच्या दृष्टीने तालबध्दता, यमक साधण्याची वृत्ती, अक्षर संख्येची आवर्तने व चरणांची संख्या ही ओवी व लावणी यांशी सदृश्य वाटते. लावणी सदृश रचना ते म्हणताना आढळतात. लावणी आणि पोवाडा इ. लौकीक गीतांचे प्रकार अशा प्रकारच्या लोक वाङमयातून विकसीत झाले आहेत. असे विचार लोक साहित्याचे अभ्यासक डॉ. गं. ना मोरजे यांनी मांडलेले आहेत. '३३'

''पळू नको थांब गवळिया तू ॥धृ॥
जाते येशोदेच्या पाशी तुला बांधविते खांबाशी ।
कोठे जाशी चोरा किती लांबरे । पळू नको थांव रे॥१॥

असा का रे मस्तवाला बोलुनिया घेशिला बाला ।
जळो तुझा मेवा नको जा बरे । पळू नको थांबरे ॥२॥

मला वाटे आईबाला । देउनिया जाशी बाला ।
कविराया तुला बरे । पळू नको थांबरे गवळिया तू ॥३॥

(रामशास्त्री कृत लावणी संपा. गं. ना. मोरजे, प्रकाशन, चित्रशाळा प्रेस पुणे ३०. १९७३)

येथपर्यंत या आशयानुसार व रचनेनुसार गोल्ला, गोलेवार जमातीतील लोकगीतांचे प्रकार केल्यास त्याचे स्थूल स्वरूप काय दिसले ते पाहाण्याचा प्रयत्न केला. या प्रकारांना सशास्त्रता कितपत असू शकते. याचा विचार करावयास हवा.

गोल्ला गीत प्रकार

अगदी कोटेकार असे प्रकार जरी करता येत नसले तरी त्यात जाणवण्याजोगे वेगळेपण असते. त्या वेगळेपणामुळे असे प्रकार करणे योग्य होईल. हेच सूत्र याठिकाणी देखील लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. या भागात जी लोकगीते आढळतात त्यांच्या पुरते मर्यादित हे प्रकार आहेत. आतापर्यंत लोकसाहित्य विशारदांनी जे लोकगीताचे प्रकार केले आहेत त्यांशी सुसंगत हे प्रकार आहेत असेच म्हणावे लागेल.

या भागातील विशेषत्वाने गोल्ला जमातीची ही लोकगीते आहेत. काही जमातीत

स्त्री-पुरुष संयुक्त नृत्यांचा जो प्रकार आढळतो तशा प्रकारची लोकगीते येथे उपलब्ध नाहीत. दुसरी गोष्ट पुरुषांची अशी गाणी येथे समूहाने आढळत नाहीत. सण-उत्सवांच्या गाण्यात गुराखी यांच्या रानातील गीतांत विशेषत्वाने मुलांचा सहभाग असला तरी लहानपणापासून म्हाताऱ्या पर्यंत लोक भाग घेतात. त्या दृष्टीने ती पुरुषगीते आहेत. एकूण पुरूषांच्या गीतापेक्षा स्त्री-गीते अधिक उपलब्ध आहेत. त्यात देखील ओवीचा भरणा जास्त आहे. आतापर्यंत केलेल्या चर्चेतून पुढील निष्कर्ष काढता येतील.

काही ठळक निष्कर्ष

१. या लोकगीतामागे संपूर्ण लोकजीवनाचीच प्रेरणा असते. त्यात अद्‌भुततेची प्रेरणा देवा धर्माची प्रेरणा. कौटुंबिक प्रेरणा कृतीमधील तालमयता व नादमयता आणि कलात्मकताकृती किंवा लतिकृती या प्रेरणा महत्त्वाच्या आहेत असे म्हणता येईल.

२. या लोकगीतांना फार जुनी परंपरा असावी.

३. लोकगीतांचे प्रकार काटेकोरपणे करता येणे आवश्यक वाटते.

४. आशयानुरुप व रचनेनुरुप प्रकार करणे योग्य होईल.

५. गोल्लांच्या लोकगीतातून आशयानुसार जात्यावरच्या ओव्या दिवाळी, पंचमी, इतर सण उत्सवांची गाणी देवतांविषयी गाणी, पांडुरंग भक्ती संतसंदर्भ, लग्न,बारसे इत्यादी विधीसंबंधी गीते. असे प्रकार केले आहेत.

६. रचनेच्या दृष्टीने ओवी गीते तालबध्द गीते, बडबडगीते, ओवी, लावणी, सदृश्य गीते असे प्रकार पडतात.

७. ज्या परिसरात गोल्ला राहतात तेथील रामराजाची गीते. त्यांनी स्वीकारली आहेत. त्यांची जमात विशिष्टता त्यात अभावानेच दिसते.

गोल्लांच्या लोककथाचा अभ्यास

पूर्वसुरींनी लोककथाचा अभ्यास करुन प्रकार करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यात दुर्गा भागवत अग्रेसर दिसतात.

परिसरातील गोल्ला लोककथाचे वर्गीकरण

१. अद्‌भूत कथा २. प्राणी कथा ३. आख्यायिका ४. दैवतकथा ५. हास्यकथा ६. संकीर्ण (यात नितीकथा, चातुर्यकथा, जातिकथा, भयकथा येतील) या सर्व कथाचे तीन प्रकारात मुख्य वर्गीकरण करता येईल.

१) कल्पित कथा २) दैवत कथा ३) अद्‌भुत कथा या तीन प्रकारांत सर्व लोककथांचा समावेश दुरान्वयाने करता येणे शक्य आहे.

वर स्थूल स्वरुपात केलेल्या वर्गीकरणानी थोडक्यात ओळख करुन घेणे सोईचे होईल. वास्तविक पाहता हे वर्गीकरण काटेकोर नाहीच. कथाचे स्वरुप व आशय यामुळे वर्गीकरणाच्या बाबतीत संभ्रम निर्माण होतो खरा.

कथा प्रकाराचे स्वरुप

१. अद्‌भुत् कथा

यात राक्षस, चमत्कार, मंत्र, तंत्र, साधू, शाप, पऱ्या आदिपासून ज्या अद्‌भुत गोष्टींमध्ये आहेत अशा सर्व कथा एकत्र केलेल्या आहेत. यात शेवटी नेहमी नायकाच्या बाजूने सुखावह शेवट झालेला असतो. या काही कथा परिशिष्टात दिलेल्या असल्याने येथे केवळ त्यातील कल्पनाबंध मांडल्यास त्याचे स्वरूप स्पष्ट होईल.

१) शापाने सर्वनाश देखील होऊ शकतो. शाप निरनिराळ्या प्रकारचे असू शकतात. मन दुखावले गेले की शाप दिला जातो.

२) गोसाव्याच्या प्रसादाने मूल होणे. भक्तापासून मूल होणे.

३) शापामुळे माणसाचे जनावर किंवा दगड होणे, जनावराचे, दगडाचे, माणसात रूपांतर होणे. हा प्रकार जादूने किंवा राक्षसाच्या मायेने होणे.

४) मंत्राच्या छडीचा किंवा काठीचा वापर.

५) राक्षसराजकन्या- नायकाला नेहमी मदत करतात.

६) मायावी स्त्री किंवा यक्षीण यांनी नायकाच्या चातुर्याची परीक्षा पाहणे.

७) मायावी स्त्री किंवा यक्षीण रुप पालटते.

८) तपस्व्याची किंवा साधूची नकळत सेवा केल्यास साधू सहाय्य करतो.

९) राक्षस नेहमी बारा माणसांची मोळी बांधतो.

१०) राक्षसाचा जीव पक्षात विशेषतः पोपटात असतो हा पक्षीगुप्त ठिकाणी ठेवलेला असतो.

११) नावडतीचा मुलगा हाच कथानायक असतो.

१२) नावडतीच्या मुलाचा छळ केला जातो.

१३) राजा आपली इच्छा पूर्ण केल्यास पण जिंकल्यास स्वप्नपूर्ती केल्यास अर्धीकाठी राज्य किंवा आपली कन्या देतो.

१४) सावत्र मुलाचा छळ होतो.

१५) शंकर पार्वती सहाय्य करतात. दुःखहरण करण्यासाठी अद्‌भूत असे काही साधन देतात. उदा. जादूचे खडे इत्यादी.

१६) राजकन्या नेहमी अनपेक्षित व चमत्कारिक असा पण करते.

१७) अद्‌भुत गोष्टी सात डोंगराच्या पलीकडे असतात. यात सात हा आकडा महत्त्वाचा असतो.

२. प्राणी कथा

प्राणी कथांचे काही पर्याय येथे सापडतात. कदाचित त्या जंगलाशी व डोंगरदऱ्यांशी व त्यामुळे तेथे असलेल्या प्राण्यांशी आलेल्या संबंधामुळे हे पडले असावे प्राण्यांचा

संबंध या कथामध्ये आढळतो. अशा कथा येथे एकत्रित करुन त्यांना प्राणीकथा असे म्हटले आहे. अशा काही कथा आहेत. अशा काही कथा परिशिष्टांत दिलेल्या असल्यामुळे त्याचा उल्लेख न करता त्यात आढळणाऱ्या या कल्पनाबंधशचा उल्लेख केला आहे.

१) कोल्हा सर्वात चतुर प्राणी आहे.

२) प्राण्यात माणसांसारखे हेवेदावे असतात.

सर्व प्राणी माणसांसारखे बोलतात. प्राणी कथा या बहुदा बोलक्या असतात. म्हणूनच प्राण्यांना वाचा फुटलेली असते.

आख्यायिका

यात विशेषत: ऐतिहासिक उक्तीचा व घटनांचा संबंध असलेला वर्ग भुताखेतांच्या झपाटलेल्या घराच्या, झाडांच्या,विशिष्ट घराण्यांच्या आख्यायिकांचा वर्ग-असे चार वर्ग, श्रीमती दुर्गा भागवत यांनी स्थानिक कथा मध्ये दिलेल्या आहेत. '३४'

गोल्ला दूर का गेले ही आख्यायिका येथे परिशिष्टात दिली आहे.

दैवतकथा आणि आख्यायिका किंवा दंतकथा यातील सीमारेषा दाखविणे कठीण जाते. हे म्हणणे देखील योग्यच वाटते. या स्थलांना एक प्रकारचे देवत्व प्राप्त झालेले असते. येथे (१) ऐतिहासिक व्यक्तींचा संबंध असलेल्या आख्यायिका येतात. वास्तविक पाहता प्रत्येक गावात अशा प्रकारच्या आख्यायिका असतात. प्रत्येक शेतास, दरीस, ओढयास, मैदानास नाव असतेच. यापाठीमागे आख्यायिका दडलेली असते. विस्तारभयास्तव अशा आख्यायिका परिशिष्टात संग्रहित करणे योग्य वाटत नाही. या कथांचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) रामायण-महाभारत यातील व्यक्ती डोंगरदऱ्या यांच्या रूपाने आपले अस्तित्व कायम ठेवतात.

२) इतिहासाशी संबंध जोडल्याने स्थळाला महनियता येते.

३) भूंताखेतांचे त्या विशिष्ट स्थलावर अधिराज्य असते.

४) नद्या काही विशिष्ठ अडचणीमुळे आपले मार्ग बदलतात.

५) प्रत्येक देवताच्या ठिकाणी यात्रेच्या दिवशी विशिष्ट चमत्कार घडतात.

अशा प्रकारे कल्पनाबंध यात असतात. त्या अख्यायिका एकाच गावात वेगवेगळ्या स्वरुपात ऐकावयास मिळतात. त्यामुळे त्या 'भाकडकथा' वाटण्याची शक्यता असते. परंतु यापाठीमागे वास्तविक निश्चित अशी परंपरा असते. त्यांच्या मुळाशी काही सत्यता असण्याची शक्यता नाकारता येत नाही. काही शिकार कथाही अशा स्वरुपात चालत आलेल्या असतात.

स्पष्टीकरणासाठी देखील या सांगितल्या जात असतील

४. दैवतकथा

या कथाचां आख्यायिकांशी अतूट संबंध असतो. तेथे त्या ठिकाणच्या दैवतामागे काही कथा असतात. त्या अवतारकथा मानल्या जातात. त्याच्या मागे एक अद्‌भूततेचे वलय असते. लोकांची त्यावर पूर्ण श्रध्दा असते. ही दैवते येथे कशी आली त्याचे महत्त्व काय त्यांचा या लोकांशी संबंध कोणता याचा विचार त्या कथात असतो. या कथा पूर्णत: ज्यांना देव म्हणून मान्यता मिळाली आहे अशा देवताच्या आहेत. वास्तविक डोंगर, दऱ्या, नद्या, विशिष्ट झाडे या सर्वांना देवत्व बहाल करण्याची या लोकांची प्रवृत्ती आहे. या दैवत कथांमध्ये पुढील कल्पनाबंध आढळतात.

१) दैवतांची जत्रा किंवा यात्रा कराव्या लागतात.

२) देवतांना बळी आवश्यक असतात. ते ठराविक प्रकारचे देखील असतात.

३) देवता नवसास पावतात.

४) देवतांना कौल लावल्यास भविष्य कळते.

५) देवतांचा कोप होतो. त्यामुळे रोगराई इ. गोष्टी होतात.

६) देवतांच्या सानिध्यात लग्न, जावळ असे विधी केल्यास त्यातून पुण्य लागते.

७) देवतांची प्रत्येक घराण्यात काही व्रते असतात. त्यांचा प्रसाद ठराविक असतो.

८) देवता या पार्वतीचे अवतार असतात.

९) दैवते क्षेत्ररक्षण, वंशरक्षणाचे काम करतात.

१०) देवतांचे बोहाडे किंवा आखाड्या असतात. त्यांना विधीनाट्य म्हणता येईल.

११) काही क्रूर वृत्तीच्या देवता त्यांना प्रसन्न ठेवल्यास आपले रक्षण करतात.

१२) देवतांची स्थाने ही बहुधा डोंगरवर असतात. या कथा कधी कधी कहाण्याच्या स्वरुपात असतात. या कथा सांगताना देवतातील कडकपणा वर्णन करण्याची प्रथा आहे. या देवतांचा वनातील प्राण्यांशी जीव्हाळ्याचा संबंध असल्याने मानवांचे संरक्षण अशा या देवता करतात. अशा कथांना एक प्रकारचे पावित्र्य असते. या कथा सांगतांना लोक त्या देवतांचा विधी कसा करायचा हे देखील सांगतात. अशा कथांवर प्रादेशिकतेचा पगडा अतिशय असतो.

कथेच्या आशयावरून वर्गीकरणाचे महत्त्व

लोककथांचे स्थूलपणे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला असला तरी त्यांचे स्वरूप संमिश्र असते. जसे काही प्राणिकथा, अद्‌भूतकथा-स्वरूप किंवा आख्यायिका असूनसूध्दा त्या बोधकथा, नीतीकथा, चातुर्यकथा विशिष्ट जातीविषयक कथा, चोरकथा, भयकथा, असू शकतील कथांचे वर्गीकरण करताना निरनिराळ्या प्रकारे केले तरीसुध्दा ते पूर्णपणे करता येईलच असे वाटत नाही. फार तर अधिकाधिक सूक्ष्म भेद होऊ शकतील. काही वेळा दैवतकथेतून अद्‌भूतकथा निघते किंवा अद्‌भूत कथेतून दैवतकथा साकार होते.

तेव्हा असे वर्गीकरण करणेदेखील कठीण आहे. लोककथा हे एक लोकांचे शिक्षणाचे माध्यम समजले तर आशयावरून वर्गीकरण महत्त्वाचे ठरते. डॉ. प्रभाकर भांडे यांनी आपल्या ''लोकसाहित्याचे स्वरूप'' या पुस्तकात वर्गीकरणातील अडचणी मांडल्या आहेत. त्या ध्यानात घेण्यासारख्या आहेत. तसेच प्राणिकथा आणि बोधकथा यांचे संबंध वगैरे गोष्टीचे विवेचन केले आहे. '३५'

लोककथामागील प्रेरणा व हेतू

गोल्ला लोककथांच्यामध्ये इतर ठिकाणच्या लोककथांपेक्षा काही वेगळ्या प्रेरणा असतील असे नाही. चोहीकडे त्याच प्रेरणा असतात. त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील -

१) अद्‌भूताची प्रेरणा
२) आत्मनिवेदन व प्रकटीकरण
३) स्पष्टीकरणात्मक भूमिका
४) श्रद्धा, कौटुंबिक,जिव्हाळा
५) अनुभवाचे प्रसारण व संकलन
६) निवेधाची प्रेरणा
७) नावीन्याचा अनुभव
८) निसर्गातील चक्रनेमिक्रमातून मिळालेली प्रेरणा.

अशा निरनिराळ्या प्रेरणा या कथांमागे असतात. असे एकंदर कथांवरून दिसून येते. याच प्रेरणा लोकगीतांमध्ये आहेत. ही गोष्ट जाणवते. निसर्गातील चमत्कार मानवाने जेव्हा पाहिले तेव्हा त्याने तर्क करावयास सुरुवात केली असेल परंतु या सर्व प्रेरणांमध्ये अद्‌भुततेची जी प्रेरणा आहे ती अगदी बलिष्ट दिसते. अन्न, वस्त्र, व निवारा यांतील अन्न व निवारा हे मिळविताना आलेले अनुभव व त्याचबरोबर मानवी शरीर हाच एक मोठा चमत्कार माणसाबरोबर होता. या कथांच्या मागे परंपरा असल्याने अगदी सुरुवातीला जेव्हा कथा सांगितली गेली त्यावेळची त्याची प्रेरणा आणि वर्तमानकाळातच तीच कथा पुनः सांगण्याची प्रेरणा भिन्न असू शकते. प्रेरणा आणि हेतू यात सीमारेषा आखणे कठीण आहे. परंतु या गोष्टी सांगण्यामागील काही हेतू स्पष्टपणे जाणवतात ते पुढीलप्रमाणे :-

१) मनोरंजन करणे.
२) ज्ञानार्जन, ज्ञानदान कळत-नकळत.
३) स्पष्टीकरण.
४) महिमाकथा.
५) प्रौढपणाचे प्रदर्शन.

६) भक्ती, प्रेम,आदर भय यांचे प्रदर्शन प्रेरणांप्रमाणे एकाचवेळी एकच हेतू असेल असे म्हणता यावयाचे नाही.

लोककथांचे वैफल्य

प्रत्येक गावात मारुतीचे मंदीर असतेच किंवा शेकोटीची जागा व चावडी असतेच ती सार्वजनिक झोपण्याची जागा, मेंढपाळ करीत असताना रात्री जागे राहण्यासाठी म्हणून कथा सांगतात. गाई, म्हशी शेतात बांधल्या की, त्यांना राखण्यासाठी जागतात. तेव्हा कथा सांगतात. जागरकथा, जागर घातल्यानंतर शेकोटीसमोर बसल्यास सहज गप्पा सुरु होतात. यातच कोणीतरी कथा सांगायला सुरुवात करतो. अशा गोष्टी अनेकदा सुरु झाल्या की, काहीवेळा रात्ररात्र चालतात. काही नेमके लोक गोष्टी सांगतात. सुगीच्या दिवसात शेतात ज्वारीची रास पडली की, ढवारा असतो म्हणजे त्या खळ्यास किंवा त्या राशीची पूजा करतात. लोकांना रात्री जेवणास बोलवतात आंबील, खिचडा, भाकरी, भाजी, वरण असे खूप पदार्थ करतात. गोष्टी सांगतात.

लोककथांचे अस्थिरतेतील स्थिर स्वरुप

वर उल्लेखिलेल्याप्रमाणे अगदी व्यक्तीपरत्वे कथा बदलतात. गावोगाव या कथांना किंवा कथातील घटनांना अगदी वेगळे असे पर्याय सापडतात. कोल्हा आणि वाघ, बोकड आणि वाघ यांच्या गोष्टी जवळजवळ सारख्याच स्वरुपात किंवा एकाच कल्पानबंधातून निर्माण झालेल्या आढळतात. या त्या कथा अर्थाने एकच असतात. हीच गोष्ट वनगाईंची गोष्ट, गुराख्याची कथा यांच्या बाबतीत आहे. डॉ. सरोजिनी बाबर यांनी संग्रहीत केलेल्या कथा, श्रीमती दुर्गा भागवत यांनी दाखविलेले पर्याय हे देखील यांशी जुळणारे दिसतात. प्रादेशिकतेच्या दृष्टीने किंवा व्यक्तीपरत्वे जरी कथांचे पर्याय आढळले किंवा अगदी वेगळ्या अशा कथा आढळल्या तरी त्यांतील कल्पनाबंधांचा विचार केला, तर असे आढळेल की देशोदेशीच्या कथामध्ये एक प्रकारची रचनेची स्थिरता आहे. याच खऱ्या अर्थाने परंपरा आहेत. एवढेच नव्हे तर हेच कल्पनाबंध रामायण, महाभारत इ. मध्ये आढळतात. सीता, जमिननांगरतांना पेटीत पुरलेली आढळली. तोच कल्पनाबंध उकीरड्यात पुरलेले मूल यात आढळते. अशी किती तरी उदा. देता येतील. राक्षसाचा जीव पक्षात असतो. हा कल्पनाबंध अनेक अद्‌भूत कथांतून सापडतो. प्राणी बोलतात. व माणसांप्रमाणेच त्यांचा स्वभाव व भावना असतात. कथांमध्ये प्रचंड गोंधळ, अस्थिरता आढळली तरीसुध्दा त्यात एक सुत्ररूप अशी स्थिरता असते असे म्हणता येईल.

गोल्ह्याच्या मौखिक वाङमयाचे विशेष :- वरील गोष्टी ध्यानात घेता गोल्हा लोककथेतील वेगळेपण प्रादेशिक परिस्थितीनेच घडलेले आहे असे आढळेल. ते पुढील विशेषातून जाणवते.

१) या भागात प्राणीकथा अधिक प्रमाणात आहेत त्यात कोल्ह्याच्या वाट्यास कथेचा मोठा प्रांत आला आहे.

२) देवता डोंगरावर आहेत.

३) डोंगराना रामायण -महाभारतातील व्यक्ती मानले आहे.

४) साता समुद्राच्या पलीकडे, सप्तखंडात याऐवजी सात डोंगराच्या पलिकडे असे म्हटलेले आढळेल.

५) वाघ, रान, तळी, नदी यांचे उल्लेख विशेषत्वाने आहेत.

६) गुराखी, शेतकरी व राजा यांच्याशी संबंधित कथा आढळतात.

७) वातावरण निर्मितीमध्ये तांदूळ, गवत या भागातील झाडे, खेकडी वगैरेचे उल्लेख आधिक आढळतात.

८) स्थानिक स्वरुपाच्या आख्यायिका तर पूर्ण याच भागातील आहेत.

९) येथील चालीरितींचा त्या कथांवर परिणाम झालेला आहे. कथानायक या भागातील लोकांच्या चालीरिती पाळताना आढळतात.

एकंदरीत पाहता वर म्हटल्याप्रमाणे प्रादेशिक वेगळेपणा हेच या गोल्ला लोककथांचे वेगळेपण, त्यातील रामायण-महाभारतातील व्यक्ती, डोंगर,शिखर रुपाने वास्तव्य करतात. ही कल्पना अधिक वेगळी व क्वचित इतरत्र आढळणारी आहे.

गोल्ला लोककथांचे वाङमयीन सौंदर्य

लोककथांचे वाङमयीन सौंदर्य अभ्यासावयाचे म्हणजे काय? याविषयी मतभेद होण्याची दाट शक्यता आहे. हे अभ्यासताना कथा-घटकाचा विचार व त्या अनुषंगाने विवेचन करणे शक्य वाटते. 'रिचर्ड टेंपलने' कथेची प्रमुख चार अंगे सांगितली आहेत. त्याचबरोबर डॉ. प्रभाकर मांडे यांनी नऊ अंगांनी या घटकांची चर्चा केली आहे ती त्यादृष्टीने उद्‌बोधक आहे. येथे काही घटकांच्या अधारे वाङ्मयीन सौंदर्याचा अभ्यास करावयाचा आहे. अभ्यासासाठी पुढील गोष्टींचा विचार करू.

१) कथा निवेदक - कथन शैली व कथा निवेदन वेळ

२) कथानक - घटनामाला - संघर्ष

३) कथाबीज- कल्पनाबंध

४) वर्णनातील सुसंगती, स्थलवर्णन व संवाद

५) ऐकणारे श्रोते.

या पध्दतीने महादेव कोळी व ठाकर यांच्या डांगणातील लोककथांविषयी डॉ. सहस्त्रबुध्दे अनिल यांनी चर्चा केली आहे. '३६'

या पाच गोष्टींचा या संबंधात विचार करावा लागेल कथा म्हटली की, मुख्य दोन घटक आलेच १) सांगणारा - निवेदक आणि २) ऐकणारा - श्रोता. त्याखेरीज

कथा होऊ शकणार नाही. त्यात पुन्हा आणखी एक गोष्ट लक्षात घेणे जरुर आहे की, ऐकणारा हा घटक अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण निवेदकाला त्या कथेत नाविन्य नसते. त्यातील अद्‌भूत चमत्कारिक मात्र, विनोद, संकटाची मालिका या साऱ्या गोष्टी त्यास ज्ञात असतात. ह्या त्या श्रोत्यास ऐकावयाच्या असतात. त्यांच्या भावना जागृत करणे. त्यास बोध करून देणे हा कथाविनोदाचा मुख्य हेतू असतो. म्हणूनच निवेदक कुशल असला पाहिजे.

१. कथानिवेदक कथनशैली व कथानिवेदनाची वेळ

वर सांगितल्याप्रमाणे कथानिवेदक कुशल असला पाहिजे हे अर्थातच त्याचा अनुभव त्यांच्या बुध्दीची प्रगल्भता त्याची कल्पनाशक्ती, त्यांच्यातील नाट्याभिनयाचा गुण व त्याचा खेळकर स्वभाव यावर अवलंबून असेल. म्हणूनच कथांचे वैफल्य पुष्कळ असले तरी प्रत्येक गावात कथा निवेदनात निपुण असलेले लोक फारच कमी असतात. त्यांना या गोष्टी सांगण्यापुरते तरी बरेच महत्त्व असते. कथानिवेदन ही एक स्वतंत्र कला आहे. सर्वच लोक गोष्टी सांगताना आढळतात असे नाही. कारणपरत्वे प्रत्येकजण गोष्टी सांगण्याचा प्रयत्न करतो किंवा त्याला सांगाविशी वाटते. कथा निवेदकाचे कौशल्य स्थल व वेळ यावर अवलंबून आहे.

१) रात्री मारुतीच्या देवळात गप्पा सुरु झाल्या की मनोरंजनार्थ गोष्टी सुरु होतात.

२) रानात गुरांबरोबर सबंध दिवस गुरे राखताना अधून मधून गुराखी अनेक ठिकाणी जातात. हे ठिकाण दुपारच्या वेळेस जनावरांना पाणी पाजविण्याचे ठिकाण असते. तसेच काही वेळा गुरे घेऊन दोन किंवा तीन गुराख्यांना रात्र-रात्र- रानात डोंगरमाथ्यावर वा डोंगरावरील दऱ्यांमध्ये रहावे लागते. अशावेळी त्यांच्यातील कोणीतरी गोष्टी सांगतात. हेच गुराखी निरनिराळ्या ठिकाणाहून गुरांना घेवून जात असाताना अनेक ठिकाणांविषयी आख्यायिका सांगताना आढळतात.

३) गावातील म्हाताऱ्या माणसाजवळ पोरे गोळा होतात. आणि त्यांच्या मनोरंजनासाठी म्हातारा त्यांना गोष्टी सांगतो. अशावेळी ती मुले त्याला खूप विचारतात आणि हा म्हातारा त्यांच्यासमोर सर्वज्ञ असल्यासारखा त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देताना कथा सांगतो. हीच गोष्ट घरातील म्हाताऱ्यांच्या बाबतीत अंगणात संध्याकाळी पोरांना जवळ घेऊन बसल्या की, गोष्टी सांगाव्या लागतात. मुलांचे आजी-आजोबा मुलांना झोपविण्यासाठी देखील कथा सांगतात.

जत्रेच्या निमित्ताने लोक एकत्र येतात. देवदर्शन जेवणखाणे चालू असताना क्षेत्र महिमा, स्थान महिमा सुरु होणे, नवखी माणसे गावात आली की, लोक हळूहळू त्यांच्याजवळ जमतात. मग आख्यायिका सांगणे सुरु हाते. याशिवाय खेड्यामध्ये सुगीच्या दिवसात शेतातील अन्न धान्ये राखण करीत असताना गोष्टी सांगतात. अन्नाची रास

पडली असता त्याचे राखण करीत असताना गोष्टी सांगतात. राखणही होते व करमणूकही होते. त्यादिवशी गावातील बऱ्याच लोकांना जेवणास बोलवतात. जेवण झाल्यानंतर बरेच जण तेथेच झोपतात. त्या राशीचे पूजन करून जमलेल्या लोकांना जेवण देतात. व ते अन्नधान्य राखण्यासाठी गोष्टी सांगतात. बरेचजण गोष्टी ऐकत असतात.

कथाकथनास लागणारे वर उल्लेखलेले गुण ज्या व्यक्तीच्या अंगी आहेत. त्यादृष्टीने विचार करणे योग्य होईल. कथाकथन शैलीची वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत :-

१) कथाकथन करणारा सर्वांचे लक्ष आपल्याकडे खेचून घेण्यासाठी कथा सांगण्यास सावरून बसतो.''त्याचा का असा झाला एकदा का लई दिवसामागं त्या त्याच्यावाणी झाला.'' अशी सुरवात करतो आणि सर्वांना पुढे काय सांगणार याविषयी उत्सुकता निर्माण करतो.

२) चेहऱ्यावर गांभीर्य, भय, दु:ख, हास्य आदी भाव व्यक्त करतानाच आवाजात विशिष्ट चढ-उतार असतो आणि श्रोत्यांना रंगविण्याचा प्रयत्न करतो.

३) रामाचे, राक्षसाचे, राजाचे, देवतांचे त्यातील अद्भूत गाष्टींचे तो यथोचित वर्णन करताना आपल्या पदरचे भरपूर घालतो.

४) इतर कोणाची दुरुस्ती तो कथेला सहन करीत नाही. ''त्या दुसऱ्या ह्याच्यात आहे. ह्या असाच'' असे सांगून तो आपलेच घोडे पुढे दामटतो.

५) कथाकथन करीत असता नं! मग, अन, क्याला, तिकडं, हीकडं, पुढं इत्यादी पालुपदे वापरली जातात असे सामान्यपणे दिसत.

हे सारे करीत असताना एक गोष्ट प्रामुख्याने लक्षात येते की कथन करणाराचे, लोक रंगले आहेत, कंटाळे आहेत. याकडे नेहमी लक्ष असते. गोष्टीतील कथानक आणि भावविश्व यात श्रोता अगदी रंगून जातो. निवेदकाला निवेदनाचे बंधन असते. श्रोता रंगला की तो कधी पोट धरधरुन हसतो, संकटाच्या भावनेने दु:ख व्यक्त करतो. राग आला की शिवी हासडायला देखील मागे पुढे पहात नाही.

२) कथानक :- घटना माला - संघर्ष

लोककथेतील कथानक हे परंपरेने चालत आलेले असते असे म्हणता येईल. कथा कोणतीही असली तरी त्यात एक प्रकारची घटना मालिका असते आणि त्या मालिकेतून कथानक तरी तेच असले तरी अनेक वेळा निरनिराळ्या कथेतील सरस घटना कथा सांगताना घुसडून दिल्या जातात. आणि कथा खूप लांबविली जाते. तर काही वेळ मोजक्याच महत्त्वाच्या घटना सांगून कथा सरती केली जाते. असे होत असताना घटनामालेच्या बाबतीत पुढील बाबी अढळतात.

१) कथानक ठराविक असले तरी त्यातील घटना ठराविक नसतात.

२) या घटना निवेदकांच्या मानाने व श्रोत्यांचा कल पाहून वाढविल्या वा कमी केल्या

जातात.

३) कथानकामध्ये जे फरक आढळतात व त्यामुळे कथा दुसऱ्या कथेपासून वेगळी वाटते किंवा एका कथेतून दुसरी कथा एकाच नामकाच्या पाठोपाठ आलेल्या कथा या घटनामान्य आणि त्यातील संघर्षाच्या तीव्रतेवर आणि नायकाच्या पराक्रम वर्णनावर अवलंबून असतात.

एकूण कथानक आणि कथानकातील घटना, संघर्षावर अवलंबून दिसतात. या भागातील कथांमध्ये संघर्षावर विचार करताना येथील कथेतील संघर्ष पुढीलप्रमाणे आढळतो.

१) हा संघर्ष तात्विक स्वरुपाचा बहुदा नसतो तर तो ऐहिक स्वरुपाचा असतो. छळ, नैसर्गिक घटनांची भिती, पण, अटी, पैज यातून पराक्रम दाखविण्यासाठी तो जाणीवपूर्वक ओढवून आणलेला असतो. हास्यकथांमध्ये हा संघर्ष फजितीच्या स्वरुपात आढळतो. प्राणीकथा किंवा अन्य मानवी जीवनातील संघर्ष हा मूर्खपणा लुच्चेगिरी, दारिद्र्य, राजाचा हुकुम, फसवेगिरी, चोराची कृत्ये, रानटी जनावरांची शिकार व त्यांचे मानवावरील आक्रमण यातून उभा झालेला आढळतो.

२) हा संघर्ष बहुदा सुखपर्यावसायी असतो. असंख्य संकटानंतर, भीतीनंतर, गांभिर्यानंतर, कथेचा शेवट सुखात होतो. कथानक, घटनामाला, आणि त्यातील संघर्ष या सर्वांच्या मागे मुख्य सूत्र असते. ते कथाबीज किंवा कल्पनाबंधाचे असे तेथील कथांवरून देखील जाणवले.

३) कल्पनाबंध किंवा कथाबीज

प्रत्येक प्रकारच्या कथात कोणत्या प्रकारचे कल्पनाबंध येतात. ते अगोदरच्या चर्चेत पाहिले आहेच. या कल्पनाबंधाचाच वापर वरचेवर कथा व आख्यायिकांमधूनच झालेला आढळतो. त्यामुळे कथांमध्ये तोचतोपणा जाणवतो. कथा निवेदकाला कथा सांगताना हे कल्पनाबंध स्मरत असतात. एखादी अद्‌भूतकथा ऐकताना हे विशेषत्वाने जाणवते. अमूक प्रकारचे संकट आपल्या कथानकावर आले नाही हे जणू निवेदकाच्या किंवा श्रोत्यांच्या मनाला पहत नसावे. तेव्हा अन्य कथांत घटना असल्यातरी त्या आवर्जून पुन्हा सांगितल्या जाणाऱ्या कथेत येतात. म्हणून मूळ बीजे आधारास घेऊन कथानक कितीही लांबविण्यात. किंवा कथानकातून कथानके गुंफत जाण्यात गावातील गोष्टी वेल्हाळ पटाईत होतात. निरनिराळ्या कथांमधून जे कल्पनाबंध वापरले जातात. त्यांचे विशेष पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) कल्पनाबंध अनाहुतपणे न ठरविता वापरले जातात.

२) अनेक कल्पनाबंध एकाच कथेमध्ये वापरले जातात.

३) कोणतीही कथा त्यातील कथानक प्रसंग एखादया कल्पनाबंधाभोवती गुंफलेले असते.

४) वर्णनातील सुसंगती - व्यक्तिचित्रण व प्रसंगवर्णन, स्थलवर्णन आणि

संवादात्मकता

या लोककथा सांगितल्या जात असताना वर्णनामध्ये सुसंगती साधण्याचा प्रयत्न आटोकाट केला जातो. व्यक्ती, स्थल, प्रसंग, वेळ यांना अनुसरुन येथोचित वर्णन म्हणजे वर्णनातील सुसंगती होय. राक्षसाचे राहण्याचे ठिकाण गुहा, पाताळ, जंगल यांचे वर्णन राक्षसासारखे भयानक, त्याचे माणसे तळण्याचे भांडे म्हणजे प्रचंड कढई, सावत्र आईने केलेला छळ म्हणजे कोंड्याची भाकर.

वर्णनातील विशेष पुढीलप्रमाणे दाखविता येईल.

१) व्यक्तीचित्रण अत्यंत थोडक्यात आटोपले जाते.

२) वर्णनात तोचतोचपणा आढळतो.

३) ग्राम्यतेची काळजी घेतली जात नाही.

गोल्ला लोककथांच्या संदर्भात ज्या विशिष्ट घटकांची चर्चा केली त्याचबरोबर आणखी एका घटकाचा विचार करणे आवश्यक वाटते तो घटक म्हणजे श्रोता.

१. श्रोते

लोकगीत ऐकावयास श्रोते आहेत किंवा नाहीत याचे भान गाणारास असत नाही. लोककथेत मात्र समोर ऐकणारे बसले आहेत व त्यांनाच आपण कथा ऐकवत आहोत. याचे नेहमी भान सांगणाऱ्याला ठेवावे लागते. शेकोटीजवळ किंवा मारुतीच्या देवळात किंवा सुगीच्या दिवसात खळ्यावर चालणाऱ्या कथांच्या बाबतीत आणखी एक विशेष दिसतो. तेथे ऐकणारे काही आणि झोपणारे बरेचजण असतात. अशावेळी ऐकणाराचे रंजन करण्याची जबाबदारी निवेदकावर येते. श्रोत्यांच्या बाबतीत एक महत्त्वाचा भाग असतो तो म्हणजे कधी त्यांना देखील कथा येत असते. परंतु मनोरंजनासाठी म्हणून ते स्वत: अमूक कथा सांग अशी मागणी करतात. अशा परिस्थितीत ती कथा आख्यायिका अधिक रंगवून सांगण्याची जबाबदारी त्यांच्यावर येते. या कथा ऐकणाऱ्याचा असा विशिष्ट वर्ग करता येणे कठीण आहे. असे असले तरी त्याचा हेतू मनोरंजन आणि माहिती संपादन किंवा कुतुहलपूर्ती हाच असतो. हेतूची समानता असल्याने त्यांचा स्वतंत्र वर्ग करण्याचे कारण नाही. श्रोते आणि वक्ता यांचे ज्ञान कमी अधिक प्रमाणात असले तरी ते त्या एकाच प्रदेशाशी अत्यंत निगडीत असते. कथा म्हटली की, ती कोणत्याही प्रकारची असली तरी तीस निवेदक व श्रोते त्याच्याशिवाय अस्तित्वच असू शकत नाही ही या लोककथांची खरी अवस्था आहे. म्हणून निवेदक व श्रोते यांच्या लहरीनुसार ती प्रगट होते. लांबते, अखूड होते, बदलते तरी तिच्यात अखंडता असते. कथामध्ये नवीन खूप गोष्टी येऊन मिसळल्या जातात. जुन्या काही गळून जातात. काळाला, परंपरेला, लोकमाणसाना या लोककथा उजाळा देतात. वर्तमान दर्शन त्यात अनाहुतपणे घडते आणि अशा रितीने संपूर्ण लोकजीवनाशी त्यांचे अतूट नाते जोडले जाते.

या साऱ्या कथा केवळ तोंडी स्वरूपात आहेत. हे सांगावयास नकोच. शिवाय व्यक्तिपरत्वे या कधी बदलल्या तरी त्या शुध्दच म्हणाव्या लागतील. मुक्तता हेच लोककथांचे मुख्य वैशिष्टे म्हणून या कथा केव्हा उत्पन्न झाल्या आणि किती काळ त्यांची परंपरा आहे. हे सांगता येत नाही. त्यामुळे त्यांचे महत्त्व वाढते.

गोल्ला लोककथांच्या अभ्यासाची दिशा

गोल्लांच्या लोककथा वेगळ्या नाहीत. त्या प्रदेशातील इतर जातीमध्ये प्रचलित कथांसारख्या काही कथा दिसून येतात. एकास दुसरी कथा जातीची आहे. संस्कृतीचे, लोकजीवनाचे चित्र या गोल्ला लोककथांतून कसे उभे राहते? त्यातून लोकजीवनाचे दर्शन कितपत घडते? या प्रश्नांची चर्चा गोल्लांच्या सांस्कृतिक अभ्यास या प्रकरणातून झाली आहे. तेथे घडविलेले लोकजीवनाचे चित्र लोकगीते व लोककथा यांच्या आधारानेच उभे केले आहे. दुसरा दृष्टीकोन वाङमयीन समालोचन कसे करता येईल? यामध्ये एक कथा आहे. गोल्लांची पांगापांग कशी झाली त्याबद्दल ही कथा आहे.

एका गावात खूप गोल्ला रहात होते. त्यांच्या घरात म्हैशामा दैवत होते. एक गोल्ला म्हैशमाची पूजा करताना ती गोल्लांशी बोलू लागली की मला लहान मुलाचे मासभक्ष म्हणून पाहिजे ते देखील गोल्लांच्या गावच्या पाटलाच्या मुलाचे पाहिजे. गोल्ला चिंतेत पडला. विचार करीत बाहेर आला तर पाटलाचा मुलगा रस्त्यात खेळत होता. गोल्लाने कोणताही विचार केला नाही. त्या मुलास घरात घेऊन आणून म्हैशमासमोर कापून त्या मुलाचे डोके टोपलीखाली झाकून ठेवले. तेवढ्यात पाटील मुलाचा शोध घेत गोल्लाच्या घरी आला. पाटलाने म्हैशमासमोरची टोपली उचलून पाहिले. तेव्हा त्याला बोकडाचे डोके (बकरीचे मुंडके) दिसले. गोल्लाला खूप आनंद झाला. पण पाटलाच्या भितीने सर्व गोल्ला रातोरात वाट मिळेल तिकडे पळून गेले अशी ही कथा आहे. '३७'

श्रीकृष्णाबद्दल एक कथा आढळते. गोल्लांचे दैवत श्रीकृष्ण होते. श्रीकृष्ण आणि गोल्ला म्हणजे गोपाळ किंवा गाई राखणारा असे म्हणतात. गोल्लांच्या घरी गाई, म्हशी असल्यामुळे श्रीकृष्णाला नैवेद्य दाखविल्याशिवाय ते जेवण करीत नसत. दररोज श्रीकृष्णाला गोल्लांचे नैवेद्य मिळत असत. दररोजप्रमाणे एक गोल्ला नैवेद्य घेऊन श्रीकृष्णाकडे गेला तर श्रीकृष्णाने गोल्लाला सांगितले की,"आज दूध बाटलेल आहे तुझ्या दूधात आज कोंबडा पडलेला होता. तो कोंबडा कोणी मुद्दाम टाकला नाही. तरी तुझ्या सुनेला त्रास देऊ नको" त्या दिवसापासून श्रीकृष्णाने गोल्लांचे दूध घेतले नाही. अशी कथा दिसून येते.

काही निष्कर्ष

१) लोककथाच्या वर्गीकरणाचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झालेला आहे असे दिसते.

२) गोल्ला, गोलेवार लोककथांचे अभ्यासाच्यादृष्टीने

१. अद्‌भूत कथा २. प्राणीकथा ३. आख्यायिका ४. दैवतकथा ५. हास्यकथा ६. संकीर्णकथा असे स्थूल वर्गीकरण केले आहे.

३) या सर्व लोककथांचे तीन प्रकारात वर्गीकरण करता येणे शक्य आहे.

१. कल्पितकथा २. दैवतकथा ३. अद्‌भूतकथा.

४) अनेक कल्पनाबंध अनेक कथांमधून किंवा अनेक कल्पनाबंध एकाच कथेत अंर्तभूत असणे शक्य असते.

५) गोल्ला लोककथा कमी प्रमाणात आहेत. कथा सांगणारेच लोक खूप कमी असतात.

६) लोककथामध्ये स्थल, काल यांच्यादृष्टीने बदलतें स्वरुप दिसले व त्यात अस्थिरता भासली तरी कल्पनाबंधाच्या दृष्टीने त्यात स्थैर्य असते.

७) कथा निवेदक त्याची शैली व कथांची वेळ यावर कथेचे सौंदर्य अवलंबून असते. वेळेनुसार कथेत फरक होतो.

८) कथांचा अभ्यास करताना निवेदक व श्रोते हे महत्त्वाचे घटक त्यात अंतर्भूत आहेत. हे लक्षात घेऊनच अभ्यास करावा लागतो.

उल्लेख ५ संदर्भ-टीपा

१. लोकसाहित्याचे अंत:प्रवाह : माडे (डॉ)प्रभाकर./कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे ३०./प्र. आ. १९७५.
२. महाविदर्भातील लोकगीताचे संगीत : चोरघडे (डॉ)विमल(केळकर)/मनोहर ग्रंथमाला प्रकाशन पुणे/प्र. आ. १९
३. तत्रैव
४. तत्रैव
५. तत्रैव
६. तत्रैव
७. तत्रैव
८. तत्रैव
९. तत्रैव
१०. गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास : वाडकर (डॉ) डी एस./टंकलिखीत प्रबंध/मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद. १९९२-जात्यावरच्या ओव्या, पृ.१७७.
११. तत्रैव
१२. तत्रैव पृ. १७८
१३. तत्रैव पृ. १७८-७९
१४. तत्रैव पृ. १७९
१५. तत्रैव पृ. १८०
१६. तत्रैव पृ. १८०
१७. तत्रैव पृ. १८१
१८. तत्रैव पृ. १८२
१९. संग्राहक : राजाबाई मारुती घंटेवाड. मु.खेरकावाडी, ता.मुखेड, नांदेड. संपादक, वाडकर (डॉ)डी.एस.
२०. तत्रैव
२१. गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास : वाडकर (डॉ) डी एस./टंकलिखीत प्रबंध/मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद. १९९२-लग्न, पाचवी, बारसे पृ. १८३.

२२. तत्रैव पृ. १८३
२३. तत्रैव पृ. १८४
२४. तत्रैव पृ. १७७
२५. तत्रैव पृ. १८१
२६. तत्रैव पृ. १८६
२७. संग्राहक : राजाबाई मारुती घटेवाड, मु.खेरकावाड्री, ता.मुखेड, जि.नांदेड., संपादक, वाडकर (डॉ) डी. एस.
२८. तत्रैव पृ. १८६ गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास: वाडकर (डॉ)डी.एस./टंकलिखीत प्रबंध/मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. १९९२-ओवी गीत.
२९. तत्रैव पृ. १८६
३०. तत्रैव पृ. १८६
३१. चाळीस गाव डांगण परिसर : सांस्कृतिक वाङमयीन व भाषिक अभ्यास- सहस्त्रबुध्दे (डॉ)अनिल/टंकलिखित प्रबंध पुणे विद्यापीठ,पुणे १९७९. पृ.२१०
३२. गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास: वाडकर (डॉ) डी.एस./टंकलिखीत प्रबंध/मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद. १९९२-पृ. १७९
३३. चाळीस गाव डांगण परिसर : सांस्कृतिक वाङमयीन व भाषिक अभ्यास- सहस्त्रबुध्दे (डॉ) अनिल/टंकलिखित प्रबंध पुणे विद्यापीठ, पुणे १९७९. पृ.२१०
३४. लोकसाहित्याची रुपरेखा - भागवत दुर्गा, मुंबई. मराठी ग्रंथसंग्रहालय. प्र. आ. १९५६
३५. लोकसाहित्याच स्वरूप - मांडे (डॉ) प्रभाकर., परिमल प्रकाशन औरंगाबाद. प्र. आ. १९७७
३६. चाळीस गाव डांगण परिसर : सांस्कृतिक वाङमयीन व भाषिक अभ्यास- सहस्त्रबुध्दे (डॉ) अनिल/टंकलिखित प्रबंध पुणे विद्यापीठ, पुणे. १९७९.
३७. परिशिष्ट क्र. दोन
३८. गोल्ला जमातीचे लोकजीवन व लोकसाहित्याचा अभ्यास: वाडकर (डॉ)डी. एस./टंकलिखीत प्रबंध/मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. १९९२-पृ. २०९

परिशिष्ट क्रमांक - १

लोकगीते

परिसरातील गोल्लांची अनेक लोकगीते अभ्यासाच्या दृष्टीने जमा केली आहेत. त्यातली चर्चेच्या दृष्टीने घेतलेली काही गीते वानगी दाखल येथे समाविष्ट केली आहेत.

१. कांकनं गिरी गीरी	सौ. राजाबाई मारुती घंटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
२. औरंगी घोडा	सौ. राजाबाई मारुती घंटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
३. मांडवाच्या दारी	सौ. शकुंतला धो. वंजरवाडी
४. शिपी शिपी सोनं देते	सौ. राजाबाई मारुती घंटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
५. खारकीतला राघोबा	सौ. राजाबाई मारुती घंटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
६. आलुरे राजे	सायनलु यादव मालेगाव जि. नाशिक
७. आनंद माँ आनंद माँ	सायनलु यादव मालेगाव जि. नाशिक
८. वरच्याने दिल्याने	सायनलु यादव मालेगाव जि. नाशिक
९. गुरुबिजा गुरुमुलु	सोनुभाऊ मलुअण्णा यादव मालेगाव जि. नाशिक
१०. बाईला मागु आला	शकुंतला धो. वंजरवाडी जि. लातूर
११. मैना रडू नका गं	लक्ष्मीबाई व्यकंटी वंजरवाडी जि. लातूर
१२. हिणी आली घरा	लक्ष्मीबाई व्यकंटी वंजरवाडी जि. लातूर
१३. शेरभर सोन्याचं भाषीण	सौ. राजाबाई मारुती घंटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड

१४. आज्या म्हणूनी मी आज्या	सौ. राजाबाई मारुती घटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
१५. बधू म्या तर सखानो	सौ. राजाबाई मारुती घटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
१६. घरामध्ये होती जाई	सौ. राजाबाई मारुती घटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
१७. का हो रुसलो	सौ. राजाबाई दत्ता खेरकावाडी मुखेड-नांदेड
१८. हिणी नो विनंती तुम्हाला	सौ. राजाबाई दत्ता खेरकावाडी मुखेड-नांदेड
१९. नवरी माय म्हणे	सौ. राजाबाई मारुती घटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
२०. एक महिना झाला हो सासऱ्या	सौ. राजाबाई मारुती घटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
२१. जाऊत पाहून	सौ. राजाबाई मारुती घटेवाड खेरकावाडी मुखेड-नांदेड
२२. गंगेच्या पल्याड	सौ. राजाबाई दत्तात्रय खेरकावाडी मुखेड-नांदेड

लग्नातील गाणी

(नवरानवरीला हळद लावल्यानंतर हे गाण म्हणतात)

१.

सौ. राजाबाई मारुती घंटेवाड, खेरकावाडी

कांकन गीरी गीरी विजयापूरी
तिथला मुनीस कारागीर
उठा उठा हो भागियावंता
शेले अणिले तुमच्या करीता
पंजन लाविले मोतीयाची, मोतीयाची
कपडे भरले रेशमाची, रेशमाची
पंजन लाविले मौतीयाचे
उठा उठा हो भागियावंता
धोतर आणिले तुमच्याकरीता
कांकन गिरिगिरि विजयापुरी
पांजन भरिला मोतीयाची मोतीयाची
कांडी भरीला रेशमाची रेशमाची
उठा उठा हो भागियवंता
कुडते आणिले तुमच्या करिता तुमच्या करिता
कांकन गिरीगिरी विजयापूरी
तिथला मुनिम कारागीर
उठा उठा हो भागियावंता

२.

सौ. राजाबाई मारुती घंटेवाड

औरंगी घोडा चौरंगी गुंफिला
लेव लेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार
तेथी घोडा गंगीयाची थडी गंगीयाची थडी
आमच्या घरी रामया सोनार
त्यानं घडविला मंगळसूत्राचा जोड
लेव लेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार
औरंगी घोडा चौरंगी तेबी घोडा गंगीयाची थडी ॥१॥

आमच्या घरी रामया सोनार
त्यानं घडविला जोडव्याची जोड
लेव लेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार
आमच्या घरी रामया सोनार
त्यानं घडविला दंडकाचे जोड
लेव लेव रुक्मीणीबाई विठ्ठल भ्रतार

३.

सौ. शकुंतला

मांडवाच्या दारी आळ राखावं
हळू बसा हिनबाई लुगड लोकाचं
मांडवाच्या दारी करीन म्हणले धिरंड्या
हिनी मिळाल्या थेरड्या तर राहून गेल्या धिरड्या
मांडवाच्या दारी करीन म्हणाले धपाट्या
हिनी मिळाल्या सपाट्या राहून गेल्या धपाट्या
मांडवाच्या दारी पडलं उलतानं
सत्यबताला पाहून हिनी नाचल्या तणतणा

४.

सौ. राजाबाई घंटेवाड

शिपी शिपी सोनं देते हिनी दाराई लेक द्या
हिणी दाराई लेक द्या
तुमच्या शिपीवर बसला पाखरु उठल पाखरु
लऊ लाहाचं, दुरल्या देशाचं, कुरळ्या केसाचं
न्हाय माय मी लेक द्यायची
न्हाय माय मी लेक द्यायची

५.

सौ. राजाबाई घंटेवाड

खारीकवाला राघोबा खारीक कसा कोरीतो
घोड्यावरला विठ्ठलराव चौरी कशी डुलतो
पालकीतल्या रुक्मीणीबाईचा पदर कसा झळकतो

बदामातला राघोबा बदाम कसा कोरीतो
बदाम कसा कोरीतो
घोड्यावरल्या विठ्ठलरावाची चौरी कशी डुलते
पालखीतल्या रुख्मीणीबाईचा पदर कसा झळकतो.

लग्न सुरवात होण्यापूर्वी म्हणावयाचे गाणे

६.

कोट नामू (तेलगू) सायनलू यादव मालेगाव

आलुरे डलो आलला नरे आडू आलले नरे आडू
आलुरे डलो चेती गुंतबेशी चबलेब किडी लिलओसी
कानी गुंतले जेशी कडवाली लबोशी आलूर डेलो
आलुरे डलो आम्हानी काय आलू
आम्हानी काय आलू पिनली पोकाणू
आलेरेड डलो आम्हानी चकालु पिनली पिटाळू
आलोरे डलो आल्ला नवरे आडू आलले नरे आडू
आलोरे डलो आम्हानी आकुलू
शिरीदोर नालू आलोरे डलो
पोकना रगडीची पोनमतालू
अलो रे पोटू शेटे सुकालू पोमुनवालु
अलोरे डलो अदमामना सदमाना
ऐरानी कडवा आलोरे डलो
आलोरे डलो आजूनी रगडीची
ऐरानी कडवा अलोरे डलो

(लग्न लावल्यानंतर म्हणावयाचे)

७. तेलगू

सायनलू यादव मालेगाव,वय ८५ वर्षे

आनंद माँ आनंद मों आयना
(आनंद झाला की सगळ्यांना)
आनंद मो आनंद मों आयना
सारजजला को संतोष आयना

(सर्वांना आनंद झाला आहे)
तलू तलू तजूरकू मुडीली
आनंद लगालू सेशीरी
(आई-वडिलांनी मिळून लग्न केले)
आतानी मामानी गोडरी
वालू आनंद लगालू सेसीरी

(सासू-सासरे, मामा-मामी मिळून आनंदाने लग्न केले)
बाबालू मरदूलू गुडीरी
आयतीत लगालू चेशारी
(सारे मेव्हुणे एकत्र येऊन अतिशय आनंदाने लग्न केलेत)
आयली तमूलू गुडीरी
तुलशीला लगालू चेशरी
वदन्यालू मरदुरलू गुडीरी
वर्षालू लगालू चेशरी
आक्यानी चलेलु गुडीरी
देवाना लगालू चेशिसीरी
आनंद आती इडेकी आमना
वाडू सदा वेबि - पेनली केडूकु आयना

(भाऊ बहिणी सर्वमिळून दीर, भावजय मिळून लग्न पार पाडतात)

८.
मंगाली न्हावी
सायनलू यादव मालेगाव
वरचाने ठिय्याने स्वच्छाने दंडोरा मिटला
उरू उरू मंगली हुगराला जोडू
तनवरू मंगाली दंडगडयालू
कोऊरी मंगाली कुडपंगाली
कोऊरी मंगाली कोलको पोगळू
उरू उरू मंगाली उगरालू जोडू
इदेवरी पोलू आम्मा इंत्या सोध्याना

मंचीदी उनादी पेला पोलू
पेरपना मेला पौलू अडैले मुतालू
आली मुतालु मुतालु पोलराशासे

९. तेलगू गाणी
सोनभाऊ मलुअण्णा यादव, मालेगाव

गुरुबिजा गुरुमालतू नाशेय
पक्कू नेपकू मंदा
नाभार रगलडू गुरुबीज गुरुमलकू
मी मामा नाकू तनवरी कावाले
(माझा बाप तुझा सासरा लागतो)
ना आता रागरलली नेपकू मंदा
गुरुबीन गुरुमलाडू

नवरा म्हणतो

मी आता याकू तल्ली गावाले
गुरुबीज गुरुमाल्लू

ती

गुरुबीज गुरुमललू ना मोगडू
शगाललू नेपकू मंदा गुरुबीज गुरुमललू
ना मोगोडू नी फाटा लिबडकू गुरुबीज गुरुमललू

१०.
सौ. शकुंतला

बाईला मागू आला गंगथडीचा राजा
बोले ना र तुझ्या आज्या
बाईला मागु आले कुणाची ग कृष्णदेव
मावळ्याची पुस घ्याव
साळीचे तांदूळ एवडे आदनी ग खुलले
दादा सोयऱ्या माझ्या दारी उमराव बोलविले

११.

सौ. लक्ष्मीबाई

मैना रडू नको गं मनामंधी
तुला नाही दिलं ग वनामधी
सासू तूझी आईवाणी
वागवील तुला लेकीवाणी
मैना रडू नको गं मनामंधी
तुला नाही दिलं ग वनामधी
सासरा तुझा बापावानी
वागविल तुला लेकीवानी
मैना रडू नको गं मनामंधी
तुला नाही दिलं ग वनामधी
भाया तुझा देवावाणी
वागवील तुला बहिणीवाणी
मैना रडू नको गं मनामंधी
तुला नाही दिलं ग वनामधी
जाऊ तुझी देवीवाणी
वागविल तुला बहिणीवाणी
मैना रडू नको गं मनामंधी
तुला नाही दिलं ग वनामधी

१२.

सौ. लक्ष्मीबाई

हिनी आली घरा नथ देते लेवया
नकट मुकट कान हिणी कशी मिरवती
हिनी आली घरा वाळे देते लेवया
मोडका तुकडा पाय हिण कशी टाकती
बघ बरं दादा हिणं कशी मिरवती
हिनी आली घरा कोपऱ्या देते लेवया
खुळा मुळा हात हिणं कशी मिरवीती
हिनी आली घरा जोडवी देते लेवया
मोडका तुकडा पाय कशी टाकती

बघ बरं दादा हिणं कशी मिरवीती
हिनी आली घरा टाप्स देते लेवया
मोडका तुकडा कान घेऊन हिणं कशी मिरवीती
बघ बरं दादा हिणं कशी मिरवती

१३.

सौ. राजाबाई घंटेवाड

शेरभर सोन्याचं भाशिंग, नवरा निघाला शिवबंदी
तिथ आडविला मारुती
तुज तुला शेला देईन मज म्या नवरी नेईन
शेरभर सोन्याचं भाशिंग, नवरा निघाला शिवबंदी
तिथ आडविला पौचमा
तुज तुला पातळ देईन मज म्या नवरी नेईन
शेरभर सोन्याचं भाशिंग, नवरा निघाला शिवबंदी
तिथ आडविली ध्रुपद माता
तुज तुला कांकन देईन मज म्या नवरी नेईन
शेरभर सोन्याचं भाशिंग, नवरा निघाला शिवबंदी
तिथ आडविली खोकलमा (पोचम्मा)
तुज तुला करदोज देईन मज म्या नवरी नेईन
शेरभर सोन्याचं भाशिंग, नवरा निघाला शिवबंदी
तिथ आडविले लक्ष्मी
तुज तुला लिंब देईन मज म्या नवरी नेईन
शेरभर सोन्याचं भाशिंग, नवरा निघाला शिवबंदी

१४.

सौ. राजाबाई घंटेवाड

आज्या म्हणूनी मी आज्या मी आज्या
होईन गणपतराजा माझ्या चिनबाईचं
लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥१॥

आजी म्हणूनी मी आजी मी आजी
खाईन साखर सोजी

माझ्या चिनबाईचं वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥२॥

बाप म्हणूनी मी बाप मी बाप
होईल लग्नाचा ताप माझ्या चिनबाईचं
लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥३॥

माय म्हणूनी मी माय मी माय
होईन लग्नाची वरमाय
लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥४॥

भाऊ म्हणूनी मी भाऊ मी भाऊ
आणिन लग्नाचे गहू लगीन माझ्या चिनबाईचं
लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥५॥

चुलता म्हणून म्या चुलता म्या चुलता
मांडव घालीन पुरता माझ्या चिनबाईचं
लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥६॥

चुलती म्हणूनी म्या चुलती म्या चुलती
हळद लावीन पुरती माझ्या चिनबाईचं
लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥७॥

आत्या म्हणूनी मी आत्या मी आत्या
येईन सारी रात माझ्या चिनबाईचं
लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥८॥

मामा म्हणूनी मी मामा मी मामा
येईन लग्नाच्या कामा माझ्या चिनबाईचं
लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥९॥

मावशी म्हणूनी मी मावशी मी मावशी
बसेन रुखवता पाशी माझ्या चिनबाईचं

लगीन वऱ्हाड कोण कोण माझ्या चिनबाईचं ॥१०॥

१५.

सौ. राजाबाई घंटेवाड

बंधू म्या तर सखानो बंधू इवाई म्या तर केले
सखारे बंधू इवाई केले
मी तर बंधू इवाई केले बरे सखानो
तुमच तबकभर मीठरे सखानो तबकभर मीठ
वर बापाला छत्री पटका
हिनबाईला तानवड
ताण वडाची साखळी
अशी साखळी लावली
गावा खालत अंबराई
पाणी घ्यायला बागशाई
बंधू इवाई म्या केला
वर बापाला छत्री पटका
हिणबाईला तानवड

१६.

सौ. राजाबाई घंटेवाड

घरा मागे होती जाई त्यावर चोरटा जावई ॥१॥
आता धाऊन काही नेले मुक्ताबाई
घरा मागे होती जाई त्यावर चोरटा जावई ॥२॥

नेले मुक्ताबाई नेले मुक्ताबाई
घरा मागे होती जाई त्यावर चोरटा जावई ॥३॥

आता धाऊन काही नेले मुक्ताबाई
घरा मागे होती जाई त्यावर चोरटा जावई

१७.

सौ. राजाबाई घंटेवाड

का हो रुसलो पलंगी बसंलो
तुम्हा देऊ केले खोबर बन, खोबर बन
का हो रुसलो पलंगी बसलो
तुम्हा देऊ केले सुपारी बन, सुपारी बन
का हो रुसलो पलंगी बसलो
तुम्हा देऊ केले खारीक बन, खारीक बन
का हो रुसलो पलंगी बसलो
तुम्हा देऊ केले बदामी बन, बदामी बन
का हो रुसलो पलंगी बसलो
तुम्हा देऊ केले इलायती बन, इलायती बन
का हो रुसलो पलंगी बसलो
तुम्हा देऊ केले लवंगी बोंड, लवंगी बोंड
का हो रुसलो पलंगी बसलो

१८.

सौ. राजाबाई घंटेवाड

हिणी नो विनंती तुम्हाला रितीनं वागवा मुलीला
नऊ महिने वागविले बारा वर्षाची केले
बारा वर्षाची केले ज्याची होती त्याने नेले
आमची माया व्यर्थ गेली
लेक गेली घरातूनी बाप बघे सोबण्यातूनी
हिणीनो विनंती तुम्हाला रितीनं वागवा मुलीला
नऊ महिने वागविले बारा वर्षाची केले
बारा वर्षाची केले ज्याची होती त्याने नेले
आमची माया व्यर्थ गेली
भाऊ बघे खिडकीतूनी बहीण गेली दारातूनी
नऊ महिने वागविले बारा वर्षाची केले
आमची माया व्यर्थ गेली
माय बघे सोबण्यातून लेक गेली घरातून
ज्याची होती त्याने नेली आमची माया व्यर्थ गेली.

१९.

सौ. राजाबाई मारुती घंटेवाड

नवरीची माय म्हणे पर घरी लेक दिले
कले दान केले कले दान केले
चांदणी रात्र चांदणी रात्र
नवरीचा बाप म्हणे पर घरी लेक दिले
कले दान केले कले दान केले
चांदणी रात्र चांदणी रात्र
नवरीचा मामा म्हणे पर घरी भाची दिले
भाची दिले कले दान केले कले दान केले
चांदणी रात्र चांदणी रात्र
नवरीचा भाऊ म्हणे पर घरी बहिण दिले
कले दान केले कले दान केले
चांदणी रात्र चांदणी रात्र
नवरीची बहिण म्हणे पर घरी बहिण दिले
कले दान केले कले दान केले
चांदणी रात्र चांदणी रात्र

२०.

सौ. शकुंतला आयतलवाड

एक महिना झाला हो सासऱ्या
चंद्र सभेहून आणावे उसरे
जू बाळा जूरे जू
दोन महिने झाले हो सासू
इंद्र सभेत जाऊन बसू
जू बाळा जूरे जू
तीन महिने झाले हो दिरा
थंड पाण्याचा खोदावे हिरा
जू बाळा जूरे जू
चार महिने झाले हो जावे
दुधातल्या करंज्या खावे

जू बाळा जूरे जू
पाच महिने झाले हो बहिणी
येणी उकलून घालावे पाणी
जू बाळा जूरे जू
सहा महिने झाले हा नंदा
हिरव्या चुळीवर काढावे गेंद
जू बाळा जूरे जू
सात महिने झाले हो भाया
घोडी शिंनगारुन न्यायला यावा
जू बाळा जूरे जू
आठ महिने झाले रे माये
खोली सारवून सावूत राहे
जू बाळा जूरे जू
नऊ महिने झाले रे बापा
सरीबिदीले घडवावे नाता
जू बाळा जूरे जू
दहा महिने झाले हो कंता
पाळणा बांधावे पलंगाच्या वरता
जू बाळा जूरे जू

२१.

सौ. राजाबाई घंटेवाड

जाऊत पाहून गोडाच्या बागात
नारळ तोडून दूरड्यात भरून
माळ आईला चढवूत
आईला चढवूत देवाला वाहूत आईला चढवूत
जाऊन पाहूत गोडाच्या बागात
लिंबोणी तोडूत दूरड्या भरूत
दूरड्या भरूत देवाला वाहूत
जाऊत पाहूत गोडाच्या बागात
बदाम तोडून दूरड्या भरुत
माळ आईला चढवूत

जाऊत पाहूत गोडाच्या बागात
खारका तोडून दूरड्या भरूत
माळ आईला चढवूत देवीला वाहूत
सुपाऱ्या तोडून देवीला वाहूत देवीला चढवूत

२२.

सौ. राजाबाई घंटेवाड

गंगेच्या पल्याड सोनार दादा
मंगळसूत्र घडवा बडव्या रात्री
कृष्णदेवाच्या नवरीसाठी
कृष्णदेव नवरा झाला
गंगेच्या पल्याड सोनार दादा
जोडवे घडवा बडव्या रात्री
कृष्णदेवाच्या नवरीसाठी
कृष्णदेव नवरा झाला
गंगेच्या पल्याड सोनार दादा
चैन घडवा बडव्या रात्री
कृष्णदेवाच्या नवरीसाठी
कृष्णदेव नवरा झाला
वाळे घडवा बडव्या रात्री
कृष्णदेवाच्या नवरीसाठी
कृष्णदेव नवरा झाला
दंडकडे घडवा बडव्या रात्री
कृष्णदेवाच्या नवरीसाठी
कृष्णदेव नवरा झाला
कांड्या घडवा बडव्या रात्री
कृष्णदेवाच्या नवरीसाठी
कृष्णदेव नवरा झाला

परिशिष्ट क्रमांक - २

लोककथा

सर्वदूर आढळणाऱ्या लोककथांचे पर्यायच येथेही आढळत असल्याने नमुन्यासाठी केवळ दोन तीन कथा येथे दिल्या आहेत. त्यावरून स्वरूप लक्षात घेण्यात मदत होईल.

१. जातीचा फरक का संगतीचा फरक?

एक धनगराचा मुलगा होता. तो मेंढ्या राखीत असे. एकदा तो मेंढ्या चारीत नदीच्या काठी आला. राजा राणीने ते पाहिले. राजाची नजर धनगराच्या मुलावर गेली. तो मुलगा तोंडाने पाणी पीत होता. तेव्हा राजाने म्हटले,"बघ तो जातीचा फरक आहे" पण राणी म्हणाली,"तो जे करतो आहे तो जातीचा फरक नाही. संगतीचा फरक आहे." या मुद्यावर राजा आणि राणी या दोघांमध्ये वाद झाला. हे जर तू खरे करशील त्याच दिवशी माझ्या घरी ये म्हणून राजाने राणीला जंगलात नेऊन सोडण्यास प्रधानास हुकुम दिला.

राणी घरी होती त्यावेळेस प्रधानाने सांगितले की,"राणीसाहेब, महाराजांची आज्ञा तुम्हांस जंगलात नेऊन सोडण्याची आहे." तेव्हा राणी म्हणाली, "काही हरकत नाही" मग प्रधानाने राणीला खूप द्रव्य देऊन आरण्यात आणून सोडले. राणीला सोडून प्रधान घरी आला.

राणी एका झाडाखाली बसली होती. एक मोळक्या रोज नियमित तेथून लाकूड नेत होता. त्या बाईला पाहून मोळक्या दचकला. एका जागेवर उभा राहिला. पुढे येईना. राणीने हे सर्व पाहिले नंतर राणीने बोलावयास सुरुवात केली. "तू भिऊ नकोस. मी माणूसच आहे. तू अलीकडे ये" मोळी वाल्याला जवळ बोलावून ती म्हणाली,"मी राजाची बायको आहे. पण मला राजाने या डोंगरात सोडले आहे. तू काय धंदा करतोस." मोळक्या म्हणाला,"मी दररोज लाकूड विकून माझ्या मुलाबायकांना जगवतो. माझा दररोजचा धंदा हाच आहे."" ह्या धंद्यातून तुला किती कमाई होते?" राणीने विचारले. मोळक्या म्हणला,"मी दररोज दहा रुपये कमवतो." राणी

म्हणते,''मी तुला दहा रुपये देते आणखी चार माणसे घेऊन ये. त्यावेळेस मोळक्याने घरी जाऊन बायकोला दिले व दुसरी चार माणसे घेऊन तो आला, त्यांनी सर्वांनी एक झोपडी तयार केली. संध्याकाळच्या वेळेस त्यांना सांगितले की, दहा आंधळे आणि दहा चांगले लोक घेऊन लवकर या. ते दहा आंधळे आणि दहा चांगली माणसे घेऊन आले. त्यानंतर राणीने विचारले की,'' माणसे आणली का?'' ''हो आणली.'' दहा आंधळी आणि दहा चांगली. राणी म्हणाली,''दहा लिहीणारे आणि दहा न लिहीणारे असे म्हटले होते. तुम्ही तर चक्क आंधळेच आणलेत.'' त्या आंधळ्यांना घरी नेऊन सोडले व लिहिणाऱ्यास घेऊन आले. मग नियमाप्रमाणे त्या दहा जणांना प्रधान म्हणून नेमले, मग राजाचा वाडा जसा होता तसाच बांधण्यास राणीने सांगितले. त्या प्रधानाने खूप दूरवर जाऊन फिरून काही गवंडी आणले. वडारी आणले. देशातील सर्व कामगार घेऊन आले. वाड्याच्या बाहेरच्या बाजूचे बांधकाम केले. सात दरवाजे त्या वाड्यास राखण्याची तयारी केली. वाड्यात वेगवेगळी बांधकामे केली. मध्यभागी बैठक बांधली.

बांधकाम सर्व काही व्यवस्थित झाले. वाड्याला रंग दिला. राजाच्या वाड्याहून चांगला रंग दिला. मग प्रधानाला बोलावून सांगितले की,''हलकी मध्ये एक धनगराच पोरग आहे. त्याला आपल्या अक्कल हुशारीने आपल्या वाड्यात घेऊन या. धनगराच्या डोक्यातील वेड काही सकाळी अकरा वाजेपर्यंत जात नाही अस म्हणतात. तरी त्याला खूप सावधगिरीने आणले पाहिजे. आम्ही सांगितल्याप्रमाणे तू काही तरी करुन त्याला घेऊन आले पाहिजे.रिकाम्या हाताने येऊ नका.'' पण तो प्रधान होता. त्याने धनगराच्या पोराला म्हटले,''आमची मालकीन तुला बोलावत आहे. तू चल'' त्याला तो दोष देऊ लागला. पण धनगराचं पोरगं धीट होते. त्याने प्रधानालाच काठी मारली. प्रधान पळू लागला. व तो परत आला. प्रधान राणीला म्हणाला,''त्याने मलाच मारलं, मला त्याला आणता येणार नाही. मग त्या राजाच्या राणीने एक माणूस पाठवून दिला. तो खूप हुशार होता.''प्रधानजी तुम्ही जाऊन त्या धनगराच्या पोराला घेऊन येण्याचे करा.'' राणी म्हणाली.

मग तो प्रधान धनगराच्या पोराजवळ गेला व तेथे गुपचुप बसला.

त्या पोराचे सकाळचे काम चालू होते. मेंढ्याच्या पिलांना पाजविण्याचे झाल्यानंतर धनगराचा पोरगा जवळ येऊन बसला. म्हातारा प्रधान फारच हुशार होता. तो त्याला फारच विचारपूर्वक बोलू लागला. आमची मालकीण क्षणाक्षणाला तुझी आठवण करते. तुझं भाग्य उदयाला आलं. तुझ्या घरी मेंढरं किती आहेत? तुझी मुर्ती सावळी आहे. तू एखाद्या राजाच्या पोटाला जायचा. पण तू धनगर झालास. तरी आमची मालकीण क्षणोक्षणाला तुझी याद करते. तुझी मेंढरं किती खंड्या आहेत? ती ओळखण्यास (राखण्यास) माणसं किती लागतील? माझ्या मेंढ्या चार खंड्या आहेत. त्याला चार माणसे राखण्यास लागतात. प्रधानाने म्हटले चार चांगली माणसे आपण मेंढरं राखण्यास ठेवू. तुझी मेंढरं जर गेली तर आम्ही तुला ती देऊ मग त्या चार माणसांना बोलावून आणले व मेंढर राखण्यास ठेवले. त्यानंतर धनगराचं पोरग म्हणालं,"माझ्या माईला विचारल्याशिवाय येत नाही." तर प्रधानाने त्याच्या माईला बोलावून आणले. प्रधान तिला म्हणाला या मुलाचं भाग्य उदयाला आलं त्याची चिंता तू करु नकोस. पण तो त्या आईचा एकुलता एक मुलगा होता. त्यामुळे ती आई आपल्या मुलास सोडण्यास तयार होईना. त्यामुळे प्रधान त्या दोघांसही घेऊन आला. मग तिथे गेल्यावर राणीने ताबडतोब आज्ञा दिली की, त्याला ताबडतोब आंघोळ घाला. नंतर अत्तर लावून आंघोळ घाला. चांगल्या प्रकारचे जेवण त्याला दिले. सात गाद्या झोपण्यास दिल्या. थाट पाहून म्हातारी घरी आली. म्हातारी घरी येताना तिला खूप धान्य दिले. त्या पोराचा सोहळा तसाच चालू राहिला.

सहा महिन्यापर्यंत तोच पाहूणचार राणीने केला. सहा महिन्यानंतर तिने दासीला सांगितले की, सात गाद्याच्या खाली सरक्या वा त्यावर सतरंज्या टाका. तो रुतला असे म्हणाला तर पुन्हा गाद्या टाकून द्या. आंघोळ करुन त्याने गाद्या रुतल्या असे म्हटले. तिने दासीला शिव्या देऊन गाद्या काढण्यास सांगितले. त्या धनगरास वेडे केले. मग दुसऱ्या दिवशी आई मला घोड्यावर बसावेसे वाटते, असे म्हणू लागला. एक चांगला घोडा आणला. दोन लाखाचा मग दुसऱ्या दिवशी जेवण झाल्यावर तो घोड्यावर बसून पाच फेरे घालण्यास तयार झाला. पण हा धनगराचा पोरगा राणीला

आई म्हणत असे. मग तो सारखाच घोड्याला मार देऊन वेडा होऊ लागला. पळून पळून घोड्याच्या तोंडास फेस आला तेव्हा त्या आईने व घोडा थांबविला.

दुसऱ्या दिवशी त्याला हुकुम दिला की, तिचा नवरा ज्या नगरीत होता तेथे जाऊन न भिता राजवाड्यात राजाजवळ बसायचे. कोणालाही घाबरायचे नाही. मग तो घोड्यावर स्वार होऊन तेथे दररोज जाऊ लागला. राजाजवळ जाऊन बसत असे.असे तीन महिने झाले. पण राजाने त्याला तू कोण, को येतोस याची विचारणा देखील केली नाही. त्या मुलानेही राजाला विचारले नाही. सभा भरेपर्यंत राजवाड्यात बसत असे. असे तीन महिने झाले की, राजा एकवेळेस शिकारीला जात असे. अशी माहिती राणीने दिली होती. पंधरा किंवा सोळा दिवसानंतर शिकारीला जावयाचे आहे. तेव्हा ते अगोदरच सर्वांना सांगत. त्या दिवशी धनगराचा पोरगा त्यांच्याजवळ होता. तेव्हा त्यांनी सर्वांना हुकुम दिला की, दहा दिवसानंतर दहा वाजता शिकारीला जावयाचे आहे. मग त्या दिवसापासन गज्याच्या बायकोने स्वयंपाक करण्यास सुरुवात केली. त्या स्वयंपाकाचा खूप दूरवर वास जात होता. तिने धनगराच्या पोरास हुकुम दिला की,''राज्याच्या घोड्याच्या पुढे घोडा जाऊ देऊ नको. माझी तुला शपथ आहे.'' ताबडतोब सभे पोहचल्यानंतर राजाच्या मागे मागे लागला. राजा खूप मोठ्या अरण्यात डोंगरात सर्व सैनिक सोडून पुढे डोंगरात गेला. पण या मुलाचा घोडा त्याच्या मागेच होता. पण डोंगरात जाऊन राजा घोड्यावरून पडताच. त्याच मुलाने त्याला वाचवले व राजाला सावलीत नेले. त्यांच्याजवळ पाणी होते. तोंडावर पाणी मारले राजा सावध झाला. राजा सावध झाल्यानंतर राजा म्हणतोय की, ''तीन महिन्यापासून माझ्याकडे तू येतोस. पण मी तुला काहीच विचारले नाही. तू माझा प्राण वाचविलास'' तो मुलगा म्हणाला महाराज, थोडेसे भोजन करा. राजा म्हणातो, या डोंगरात भोजन कुठलं? तरा तो धनगराचा पोरगा म्हणतो. मी जेवण आणलेले आहे. मग दोघांची ताटे तो मांडतो. उत्तम स्वयंपाक झाला आहे. असाच स्वयंपाक माझी राणी करीत होती. हा मुलगा म्हणतो असा स्वयंपाक करणारी राणी होती

का? पण हा स्वयंपाक माझ्या आईने करून दिला. दोघांनीही जेवण केले. घोड्यावर बसून राजा घराकडे निघून आला. त्या सैन्याला घेऊन आला नाही. राजा घराकडे येऊन त्या मुलाला म्हणाला की, काहीही कर पण तू माझा प्रधान म्हणून रहा. तो मुलगा म्हणाला की, माझ्या आईला विचारल्याशिवाय काहीही करणार नाही. मग तो मुलगा घरी आला. राणीने विचारले काय झाले? मुलगा म्हणाला राजा घोड्यावरुन खाली पडला मी त्यांना पाणी पाजलं जेवण दिलं. तेव्हा राजा म्हणाला की असा स्वयंपाक माझी राणी करीत होती. पण मी तीला आरण्यात सोडलं पण राजा मला म्हणाला की प्रधान म्हणून रहा, पण मी सांगितले राहणार नाही म्हणून परत आलो.

राणी म्हणते,"तू राजाला म्हण की, माझी एक गोष्ट मान्य केली तर मी प्रधान म्हणून राहिन. नंतर मी उद्या सांगेन, त्यामुलाने राजापाशी जाऊन सर्व काही सांगितले तर तो राजा म्हणाला, "मला सर्व काही मंजूर आहे.

दुसऱ्या दिवशी आई सांगते, नऊ खंडाच्या पृथ्वीला राजा जेवण देतो. मग राजाला जेवण देण्याचे वचन मागून घे. मग राजाला धनगराचा मुलगा म्हणाला,"आमचं तुम्हाला जेवण आहे. हे जर तुम्हाला मान्य असेल तर मी प्रधान होतो." ओ हो! नऊ खंड पृथ्वीचं मीच जेवण देतो. पण तू म्हणतोस ते मला खूप जड जातंय." राजाला अचंबा वाटला. मुलगा म्हणतो, "महाराज, तुम्ही मला वचन दिलंय आणि आम्हास स्वयंपाकासाठी एका महिन्याची मुदत द्या. महिना झाल्यावर दुसऱ्या दिवशी घोडे, हत्ती, सैन्य सर्वांना एक दिवस जेवण देणे आणि मग दुसऱ्या दिवशी आठ वाजेपर्यंत सर्व लोकांना जेवण देणे आणि नंतर राजा व धनगराचं पोरगं यांनी जेवण करावे. नंतर मला प्रधान म्हणून नेमा."

जेवणाचा दिवस उगवला. दिवस निघाल्यापासून दिवस मावळेपर्यंत जनावराचा चारा चालला. आठ वाजेपर्यंत लोकांचे जेवण झाले. वाटेने मंडप घालून लाई[illegible]वले होते. हा धनगराचा मुलगा राजाला विचारतो,"तुमची काही सभा [illegible]ची राहिली का?" पण राजा म्हणतो. कोणी राहिले नाही.

राजा एका घोड्यावर व मुलगा एका घोड्यावर बसून राजवाड्यात जात होते. राजा सारखा मंडपाकडे पाहतो. पण राजा त्या वाड्याकडे पाहून त्याचा कमीपणा वाटत होता. असा भाग्यवान पुरुष असताना, मी त्यास तीन महिने बोललो नाही. पण ते तेथे जाऊन स्वयंपाक घरात दोघे येऊन बसले. त्या दोघांना राणी जेवायला वाढीत होती. जेवायला येताना प्रत्येक वेळेस नवा शृंगार करुन वाढीत होती. राजाला वाटले,''त्याच्या घरी बायका किती आहेत? जेवण झाल्यानंतर पानाचे तबक देताना राणीला राजाने हाकलून दिले तेव्हाचे कपडे घातले होते. राणीने तबक आणल्यावर राजाने विचारले,''राणी हा काय प्रकार आहे? तो मला कळू शकणार नाही तरी तू मला हा प्रकार सांग.'' मग राणी सांगते की, तुमच्या बरोबर बसलेला माणूस कोण आहे त्यालाच तुम्ही विचारा. राजा, मी धनगराचा मुलगा आहे. मी काहीच केले नाही. त्यावेळी राजाला राणीला म्हणतो,''हे झालं कसं?'' राणी म्हणते, ''जातीवर फरक की संगतीवर? फरक हा संगतीमुळेच होतो.'' राजा म्हणतो राणी तुझेच बरोबर माझे चुकले. असे म्हणून राजाने राणीचा स्वीकार केला. त्या धनगराच्या मुलाला गादीवर बसवले आणि तो बायकोबरोबर जंगलात निघून गेला.

२.

एक होता राजा. त्याला एक मुलगा होता. तो एके दिवशी बाहेर जात होता. तेवढ्यात त्याला एक सुंदर मुलगी दिसली. तेथेच तो तिला पहात थांबला. ती ब्राम्हणाची मुलगी होती. ती न्हात होती. ती रुपवान होती. त्या मुलीला पाहून राजकुमाराने रथ थांबवला. पण त्या मुलीने म्हटले की तू राजाचा मुलगा आहेस. त्यामुळे तू पुढे जा. तुझा हुशारपणा मी ओळखते. अरे तुझी नजर दुष्ट, पापी आहे. तुझा रथ माघार हाकल. राजाच्या मुलाला खूप राग आला. त्याने लवकर रथ राजवाड्यात नेला.

राजकुमार राजवाड्यात जाऊन प्रधानाला म्हणाला, ''रामू नावाच्या ब्राम्हणाला बोलावून आणा. मला त्यांच्या मुलीबरोबर लग्न करायचे आहे. त्यामुळे ताबडतोब ब्राम्हणास बोलावून आणावे. तो ब्राम्हण भीतीने थरथर कापत होता. त्यानंतर राजा ब्राम्हणास म्हणाला, ''तुझी मुलगी मला पत्नी म्हणून करावयाची आहे.'' ब्राम्हण म्हणाला, मी मुलीस विचारुन सांगतो. ब्राम्हण मुलीला म्हणतो. तू राजाला काही म्हटलीस का? राजाने तुला पत्नी म्हणून स्वीकारण्याचा हट्ट केलाय. ब्राम्हणाची मुलगी म्हणते की, राजा माझ्याशी लग्न करतोय म्हणतोय तर तुम्ही द्या. त्यानंतर त्याचे लग्न झाले.

राजाने त्या मुलीला वाईट बोलली म्हणून तिला जंगलात ठेवण्याची तयारी केली. जंगलात मोठा वाडा बांधला. त्या वाड्यातून तिला खाली उतरता येऊ नये असा वाडा बांधला. मग प्रधान राणीस त्या वाड्यात सोडण्यास निघाला. तेव्हा तिच्या बापाचं घर जवळ येताचं ती भेटण्यासाठी म्हणून गेली. तेव्हा आईबापाची आठवण म्हणून मला काहीतरी आठवण द्या. तेव्हा तिच्या बापाने तिला एक पुस्तक दिले. तेव्हा मुलगी म्हणते, मला ते काही नको. मला आंबाडीचे व भोपळ्याचे बी द्या. तिच्या बापाने बी दिले. प्रधान राणीला घेऊन वाड्यापाशी गेला. तेथे गेल्यावर त्याने शिडी लावून मुलीला वर चढवले व प्रधान खाली उतरला. तेव्हा मुलीने लवकर शिडी वर घेतली. कित्येक दिवस ती तिथेच राहिली. पण तिने आंबाडी आणि भोपळे लावले. व शिडी खाली पाण्यात घेऊन पाण्यात पोहत होती. पण एकेदिवशी गारूडी लोक वाट चुकून आले होते. वाड्यासमोर

ढोल वाजवित उभे होते. मग ती राणी म्हणते की माझ्याजवळ शिडी नाही. तुमच्या जवळ शिडी असेल तर मला वर घ्या मी तुम्हास खाण्यास देईन.

त्यावेळीस त्या गारुड्याने तिला खाली घेतले. त्यांना तिने भरपूर खाण्यास दिले. राणी त्यांना म्हणते,"मी तुमच्या बरोबर कार्यक्रम करते. पण मी परपुरुषाची संगत करणार नाही. आणि तुम्ही सर्वजण बापा, भावाप्रमाणे वागले पाहिजे. त्याने तिला वचन दिले. त्यांच्याबरोबर खेळ करीत ती निघाली. त्या टोळीच्या मालकाने तिला लेकीसारखं सांभाळले. त्यांच्या बरोबर खेळत खेळत कित्येक दिवस गेले. एके दिवशी ती त्या राजाच्या नगरीत आली. पण त्या राज्याच्या नगरीत खेळ चालू होता. राजादेखील खेळ पाहात होता. पण त्या राजास ती मुलगी खूप आवडली. तिथल्या एका माणसाला तिची चौकशी काय म्हणून करीत होते. तेव्हा त्या माणसाने लहान तोंड करून त्या मुलीकडे आला. त्यावेळी तो मुलीला म्हणू लागला की, आपल्यावर खूप मोठे संकट आलेले आहे. त्यावर मुलगी म्हणू लागली कोणते संकट? तर तो म्हणाला मुली राजा तुझी चौकशी करतोय. काय सांगावं? ती मुलगी म्हणते मला देखील याची चौकशी घ्यावयाची आहे. आणि तिने चौकशी परत केली.राजाने तिला खेळ बंद करून राजवाड्यात घेऊन गेला. तेव्हा ती मुलगी म्हणते. माझ्या बरोबर कर्मयोग करावयाचे असेल तर एक पत्रिका लिहून दे. तेव्हाच माझ्याबरोबर कर्मयोग कर. आणि तुझ्या पत्रावर मागणार नाही. त्यावर तारीख घाल. त्यानंतर एवढ्यावर भागणार नाही. तुझी आंगठी व दस्ती (रुमाल) मला दे. तर मी तुला सहभोग देते.राजाने सर्व मान्य केले. त्यांचा संभोग झाला. तेवढ्या रात्रीची रात्र करमवणूक करुन सकाळी गारूड्याजवळ आली. त्या मुख्य मालकाला ती म्हणाली की माझं काम झालं आता मला माझ्या ठिकाणी नेऊन सोडा. पुन्हा तुमचं तुम्ही काम करा. मग त्या मुलीने गारुड्याला खूप धन द्रव्य दिले. बाई तिथेच राहिली. नऊ महिने नऊ दिवस झाले. नंतर तिला छान मुलगा जन्माला आला. पाच वर्ष त्या मुलाला झाली. एके दिवशी राजाला त्या मुलीची आठवण झाली. प्रधानाला राजा म्हणाला ती मुलगी

सोडून बारा वर्षे झाली. ती मेली की जिवंत आहे ते तरी पाहू. सैन्य तयार करा. राजा प्रधानाने सैन्य घेऊन ते महालाजवळ आले. प्रधानाने त्या बाईला हाक मारण्यास सुरुवात केली. बाईने लेकराला चिमटी घेतली. ते लेकरू रडू लागले. तेव्हा प्रधानाला व राजाला ऐकू जावे म्हणून तिने मुलाला चिमटा घेतला होता. त्यावेळेस राजाला भयंकर राग आला. मी बारा वर्षे या वाड्यात कोंडून ठेवलं पण हे लेकरू कोणाचं? राजाला खूप राग आला. प्रधानाला राजा म्हणू लागला तिला लवकरच मुक्त करा. त्या मुलीला खाली घेतले. त्यावर राजाने तलवार उपसली त्यानंतर त्यामुलीने ते पत्र, दस्ती, आंगठी त्यांच्यासमोर टाकली. ते पत्र वाचून राजाने मान खाली घातली. अस्तूरीला जवळ घेऊन मुलाला जवळ घेतले. तू सर्व तुझे खरे केलेस म्हणून राजाने तिला घरी नेले आणि आनंदाने राज्यकारभार करू लागले.

२.

आख्यायिका

गोल्ला दूर का गेले ?

एका गावात गोल्लांची वस्ती खूप मोठ्या प्रमाणात होती. तेथे सर्व गोल्ला सुखाने जीवन जगत होते. पण एके दिवशी गोल्ला, गोलेवार म्हैशमाची पूजा करीत होते तेव्हा देवी एकदम बोलू लागली. 'माझी सेवा तू खूप केलीस. मी प्रसन्न झाले. पण माझी एक इच्छा आहे. मला नरबळी दिला पाहिजे. तोही पाटलाचा मुलगा. गोल्लाला विचार पडला. आपण गरिब माणूस. काय करावं? तेवढ्यात बाहेर आला तर पाटलाचं पोरगं फिरत चाललेलं दिसलं. गोल्लाने त्याला पळवून घरात आणून, ठार मारलं. शरीर पुरून टाकलं. आणि त्याचं मुंडकं तेवढं देवीपुढे ठेवून पूजा करु लागला. तेवढ्यात पाटील पोराला शोधत आला. गोल्लाच्या घरात शिरला. तेथे पाहू लागला.

गोल्ला देवीची पूजा करत होता. टोपली खाली पाटलाच्या पोराचं मुंडकं झाकून ठेवलेले होते. पाटलाने टोपली उचलून पाहिली. पण देवीची कृपा! ते मुंडकं बोकडाचे झाले. पाटील पाहून गेले. पण गोल्लाला त्याची भीती वाटू लागली. तेथील गोल्ला रात्री वाट फुटेल तिकडे पळू लागले अशी आख्यायिका आहे.

परिशिष्ट ३

यदुवंश परिवार में प्रान्तीय विभिन्न नाम-

श्री सरनामसिह यादव
भारतिय स्टेट बैंक
सैदपूर (उ.प्र)

आसाम - ग्वाल, घोप, गाल, गोलगोप, अहीर ।

अरुणांचल - अहीर, गोप, ग्वाल, घोप, गौवला, यादव ।

अंदमान निकोबार - यादव, अहीर, रोरल, केलूबथव, कोनार ।

उडीसा - प्रधान, गाला, गोप, सदगोप, अहीर, गौड, गौला, गोडा, मेकलागोल्ला, पन्ना, गोल्ला, यादव, ग्वाल, पाल, भूतिया ।

उत्तरप्रदेश - यादव, अहिर, गोप, ग्वाल, गोपाल, यदू, यदूवंशी, घोपी, सिह, ढढोर, चौधरी, रावत, आभीर, राऊत ।

कर्नाटक - गोल्ला, गौली, गोपाल, हनबीर, अनुबारू, यादव, स्थानागोल्ला, अदाबीगोल्ला, गोपाली, कृष्णगोल्ला अटंम्बरु, अडयार, कोन्नार, गौडा ।

केरला - यादव, एरुमन, कोलान, कोलायन, मनियानी, अय्यर, मैय्यर, अर्ली, कोनार, पिट्टै, कृष्णवाहा ।

गुजराथ - अहीर, सिह, गोपाल, राव, यादव, गोप, आभीर, चंद्रवंशी, यदुवंशी, ग्वाल ।

गोवा - यादव, ग्वाल्लीग्वाल, अहीर, गोप ।

जम्मू-कश्मीर - अहीर, यादव, गोप, गोपाल, ग्वाल, ग्वाला ।

तमिलनाडु - एडोवार, कोनार, कोने, मिल्ले, मन्थी, दास, करायालव, नम्बीयार, अम्बालम्, सरये, अयार, बडुगा, अयार, कृष्णवाहा, कृष्णा, करम्बे, दोदाज, गोप, यादव, अहीर, ग्वाल ।


दिल्ली - अहीर, यादव, गोपाल, गोप, सिह, ग्वाल ।

पश्चिमी बंगाल - अहीर, मोल्ला, गोप, सदगोप, मण्डल, (अहीर) घोष, पाल, ग्वाल ।

पंजाब - ग्वाल, गजाला, सिह, अहीर, यदुवंशी, घार, यादव ।

पॉडीचेरी - यादव, पिल्ले, एडीयार, अय्यर, कोनार, अहीर, ग्वाल ।
बिहार - यादव, गोपाल, गोप, चारी, मण्डल, सिह, राय, सदागोप, खिरहरी घोप, रावत, चंन्द्रवंशी, कृष्णऊत, मभरऊत, ढरोरा, ग्वाल, भगत ।
मध्य प्रदेश - अहीर, ग्वाल, यादव, गोल्ला, यादव, सिह, गवली ।
महाराष्ट्र - अहीर ग्वाल, यादव, गोल्ला, यादव, सिह गवली,गोलेवार ।
मणिपुर - अहीर, यादव, गोल्ला, घोष, ग्वाल ।
मेघालय - घोप, गोप, गोपाल, ग्वाल, यादव, अहीर ।
राजस्थान - अहीर, यादव, गोप, ग्वाल ।
हरियाणा - अहीर, सिह, गोपाल, गोप, राजयादव, आभीर ।
हिमाचल प्रदेश - गोपाल, गोल्ली, घार, यादव, अहीर, ग्वाल ।
सिक्कीम - अहीर, घोप, गोप, ग्वाल, यादव ।
त्रिपुरा - गोल्ला, गोप, यादव, घोप, यादव, मण्डल(अहीर), अहीर ।





REFBK-0026939



डॉ. धोंडीराम संभाजीराव वाडकर (ऐतलवाड)

जन्म : ५ एप्रिल १९५५.
मूळगाव - वंजरवाडी, ता.उद्‌गीर, जि.लातूर
प्राथमिक शिक्षण व माध्यमिक शिक्षण - वायगाव (अहमदपूर, लातूर)
महाविद्यालयीन शिक्षण : श्री.हावगी स्वामी महाविद्यालय, उद्‌गीर
पदव्युत्तर शिक्षण : महाराष्ट्र उदयगीरी महाविद्यालय, उद्‌गीर
पीएच्.डी. : ''गोल्ला जमातीचे लोकजीवन व
लोकसाहित्याचा अभ्यास'' या विषयावर
गुरुवर्य डॉ. प्रभाकर मांडे (प्रपाठक, मराठवाडा विद्यापीठ, मराठी विभाग)
यांच्या मार्गदर्शनाखाली १९९२.
वर्तमानपत्रे, नियतकालिके यातून स्फुट लेखन,
''लोक साहित्य परिषद'' व
अन्य चर्चासत्रे यातून शोधनिबंध सादर.
आकाशवाणी आणि अन्य सभा संमेलनात व्याख्याने.
लोकसाहित्याचा विशेष अभ्यास

मोरया
प्रकाशन